**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक - ३५.**

**सभावृत्तांत**

दिनांक - २०.०९.२०१४ वेळ - दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे सप्टेंबर २०१४ ची मासिक मा.महापालिका सभा शनिवार दि.२०.०९.२०१४ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.भालेकर अरुणा दिलीप
६. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
८. मा.जाधव साधना रामदास
९. मा.जाधव राहुल गुलाब
१०. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
११. मा.बाबर शारदा प्रकाश
१२. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१३. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
१४. मा.बो-हाडे शुभांगी संजय
१५. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर
१६. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
१७. मा.भारती फरांदे
१८. मा.आर.एस.कुमार
१९. मा.जावेद रमजान शेख
२०. मा.चारुशीला प्रभाकर कुटे
२१. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

२२. मा.पांढरकर निलेश शंकरराव

२३. मा.तरस बाळासाहेब जयवंत

२४. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

२५. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

२६. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

२७. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

२८. मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे

२९. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

३०. मा.अपर्णा निलेश डोके

३१. मा.अनंत सुभाष को-हाळे

३२. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

३३. मा.जयश्री वसंत गावडे

३४. मा.प्रसाद शेट्टी

३५. मा.अविनाश (दादा) टेकावडे

३६. मा.काळभोर वैशाली जालिंदर

३७. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

३८. मा.शेख अस्लम शैकत

३९. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

४०. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

४१. मा.सुपे आशा रविंद्र

४२. मा.मोहिनीताई विलास लांडे

४३. मा.गोफणे अनुराधा देविदास

४४. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

४५. मा.महेशदादा किसन लांडगे

४६. मा.लोंढे शुभांगी संतोष

४७. मा.सावळे सिमा रविंद्र

४८. मा.भोसले राहूल हनुमंतराव

४९. मा.पालांडे सुजाता सुनिल

५०. मा.बहल योगेश मंगलसेन

५१. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

५२. मा.कदम सदगुरु महादेव

५३. मा.गिता सुशील मंचरकर

५४. मा.कैलास महादेव कदम

५५. मा.छाया जगन्नाथ साबळे

५६. मा.आसवाणी सविता धनराज

५७. मा.वाघेरे सुनिता राजेश

५८. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

५९. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

६०. मा.काळे विमल रमेश

६१. मा.विनोद जयवंत नढे

६२. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

६३. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

६४. मा.विमलताई सुरेश जगताप

६५. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

६६. मा.बारणे निलेश हिरामण

६७. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

६८. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदू बारणे

६९. मा.बारणे माया संतोष

७०. मा.यमुनाताई रमणनाना पवार

७१. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

७२. मा.कलाटे स्वाती मयुर

७३. मा.नांदगुडे विलास एकनाथ

७४. मा.चौंधे आरती सुरेश

७५. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

७६. मा.बोकड रामदास गेणभाऊ

७७. मा.जवळकर वैशाली राहुल

७८. मा.जगताप राजेंद्र गणपत

७९. मा.शितोळे शैलजा बाबुराव

८०. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

८१. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

८२. मा.जम सोनाली पोपट

८३. मा.प्रशांत शितोळे

८४. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

८५. मा.गायकवाड संध्या सुरदास

८६. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

८७. मा.शेंडगे आशा सुखदेव

८८. मा.मोटे किरण बाळासाहेब

८९. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

९०. मा.संजय केशवराव काटे

९१. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

९२. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

९३. मा.पाटील सुजित वसंत

९४. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

९५. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव - आयुक्त, मा.डोईफोडे, मा.दंडवते, मा.गावडे, मा.दुरगूडे - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.चव्हाण - सहशहर अभियंता, मा.भोसले- मुख्यलेखापाल, मा.भदाणे - उपसंचालक (नगररचना), मा.दुधेकर, मा.काची, मा.साळवी, मा.पठाण, मा.बरशेट्टी, मा.कांबळे - कार्य.अभियंता, मा.कांबळे - प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.पवार - प्र.कायदा सल्लागार, मा.इंदलकर - कामगार कल्याण अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर** - उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.अरुण बो-हाडे** - मा.महापौर साहेब, जम्मू आणि काश्मिर येथील महाप्रलयात मृत्यूमुखी पडलेले नागरीक व शहिद झालेले सैनिक यांना तसेच बी.के. अय्यंगार - योगाचार्य, मोहंमद फजल - प्रसिद्ध अर्थतज्ञ, महाराष्ट्र आणि गोवा राज्याचे माजी राज्यपाल, सर रिचर्ड अँटनबरो - सुप्रसिद्ध दिग्दर्शक, मेजर इंद्रजितसिंह ग्रोव्हर, मंगला जोशी - माजी नगरसेविका, रमेश दत्तात्रय साठे - मनपा कर्मचारी यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.गोरक्ष लोखंडे** - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर** - श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

( सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली )

**मा.मोहिनीताई लांडे** - मा.महापौर साहेब, सोमवार दि.१०/११/२०१४ रोजी दुपारी २.०० पर्यंत सभा तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडते.

**मा.शमीम पठाण** - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

**मा.महापौर** - उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीप्रमाणे सोमवार दिनांक १०/११/२०१४ रोजी दुपारी २.०० पर्यंत सभा तहकूब करण्यात येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक - ३५.**

**सभावृत्तांत**

**(दिनांक २०/०९/२०१४ ची तहकूब सभा)**

दिनांक - १०.११.२०१४ वेळ - दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची (माहे सप्टेंबर २०१४) दिनांक २०.०९.२०१४ ची तहकूब मा.महापालिका सभा सोमवार दि.१०.११.२०१४ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.थोरात वनिता एकनाथ
१०. मा.सायकर अजय शंकरराव
११. मा.जाधव साधना रामदास
१२. मा.जाधव राहुल गुलाब
१३. मा.आल्हाट मंदा उत्तम
१४. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१५. मा.काळजे नितीन प्रताप
१६. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१७. मा.जगदीश शेट्टी

१८. मा.बाबर शारदा प्रकाश

१९. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव

२०. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

२१. मा.उल्हास शेट्टी

२२. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

२३. मा.पवार संगीता शाम

२४. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२५. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२६. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२७. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२८. मा.आर.एस.कुमार

२९. मा.जावेद रमजान शेख

३०. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

३१. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३२. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३३. मा.राजू मिसाळ

३४. मा.नंदा विकास ताकवणे

३५. मा.नेटके सुमन राजेंद्र

३६. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३७. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३८. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३९. मा.लोंढे गणेश नारायण

४०. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

४१. मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे

४२. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४३. मा.अपर्णा निलेश डोके

४४. मा.अनंत सुभाष को-हाळे

४५. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४६. मा.जयश्री वसंत गावडे

४७. मा.पवार मनीषा काळूराम

४८. मा.प्रसाद शेट्टी

४९. मा.काळभोर वैशाली जालिंदर

५०. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

५१. मा.शेख अस्लम शैकत

५२. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५३. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५४. मा.मडिगेरी वर्षा विलास

५५. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५६. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५७. मा.सुपे आशा रविंद्र

५८. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५९. मा.मोहिनीताई विलास लांडे

६०. मा.अजित दामोदर गव्हाणे

६१. मा.गोफणे अनुराधा देविदास

६२. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

६३. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

६४. मा.महेशदादा किसन लांडगे

६५. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

६६. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६७. मा.लोंढे शुभांगी संतोष

६८. मा.ननवरे जितेंद्र बाबा

६९. मा.सावळे सिमा रविंद्र

७०. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

७१. मा.भोसले राहूल हनुमंतराव

७२. मा.पालांडे सुजाता सुनिल

७३. मा.बहल योगेश मंगलसेन

७४. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

७५. मा.कदम सदगुरु महादेव

७६. मा.गिता सुशील मंचरकर

७७. मा.कैलास महादेव कदम

७८. मा.छाया जगन्नाथ साबळे

७९. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

८०. मा.आसवाणी सविता धनराज

८१. मा.वाघेरे सुनिता राजेश

८२. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

८३. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

८४. मा .ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

८५. मा.काळे विमल रमेश

८६. मा.पाडाळे निता विलास

८७. मा.विनोद जयवंत नढे

८८. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८९. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

९०. मा.विमलताई सुरेश जगताप

९१. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

९२. मा.बारणे निलेश हिरामण

९३. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

९४. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदू बारणे

९५. मा.बारणे माया संतोष

९६. मा.ओव्हाळ शेखर अशोक

९७. मा.यमुनाताई रमणनाना पवार

९८. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

९९. मा.कलाटे स्वाती मयुर

१००. मा.नांदगुडे विलास एकनाथ

१०१. मा.चौंधे आरती सुरेश

१०२. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१०३. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

१०४. मा.बोकड रामदास गेणभाऊ

१०५. मा.जवळकर वैशाली राहुल

१०६. मा.जगताप राजेंद्र गणपत

१०७. मा.शितोळे शैलजा बाबुराव

१०८. मा.जगताप नवनाथ दत्तु

१०९. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

११०. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

१११. मा.जम सोनाली पोपट

११२. मा.प्रशांत शितोळे

११३. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

११४. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

११५. मा.गायकवाड संध्या सूरदास

११६. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

११७. मा.शेंडगे आशा सुखदेव

११८. मा.मोटे किरण बाळासाहेब

११९. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

१२०. मा.संजय केशवराव काटे

१२१. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

१२२. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१२३. मा.पाटील सुजित वसंत

१२४. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

१२५. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव-आयुक्त, मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त, मा.डोईफोडे, मा.गावडे, मा.दंडवते, मा.माने, मा.कुलकर्णी, मा.गायकवाड, मा.फुंदे, मा.दुरगूडे, मा.माछरे-सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर- मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.चव्हाण, मा.पाटील, मा.तुपे-सहशहर अभियंता, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.भदाणे-उपसंचालक(नगररचना), मा.दुधेकर, मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे, मा.काची, मा.तांबे, मा.साळवी, मा.पठाण, मा.कुलकर्णी, मा.पिरजादे, मा.बरशेट्टी, मा.कांबळे-कार्य.अभियंता, मा.उबाळे-प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.सातव-

प्र.शिक्षणाधिकारी(माध्यमिक), मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.बोदडे-प्रशासन अधिकारी (जनतासंपर्क) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर** - उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, सुंदरराव सोळंके-माजी उपमुख्यमंत्री तथा ज्येष्ठ नेते, सदाशिव अमरापूरकर-ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक, रंगकर्मी व सामाजिक कार्यकर्ते, गोविंद राठोड-मुखेड विधानसभेचे नवनिर्वाचित आमदार, श्री.संजय जाधव, सौ.जयश्री जाधव व सुनिल जाधव-जवखेडे खालसा जि.अहमदनगर येथील तिहेरीहत्याकांडातील मृत व्यक्ती, अजय चोरडीया-उद्योगपती व सामाजिक कार्यकर्ते, सौ.ताराबाई यशवंत काटे -नगरसदस्य संजय उर्फ नाना काटे यांच्या चुलती, श्रीम.पारुबाई शंकरराव भालेराव, श्वेता सुनिल चासकर, प्राधिकरण, सौ.रत्नमाला बाळासो म्हेत्रे यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली वाहणेत यावी.

**मा.मंदाकिनी ठाकरे -** मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

**मा.तानाजी खाडे** - मा.महापौर साहेब, दु:खद निधन झालेल्या व्यक्तींना श्रध्दांजली वाहिलेली आहे. दहा मिनीटासाठी ( दु.२.२० पर्यंत ) सभा तहकूब करावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.दत्तात्रय साने** - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर**- सर्व सभासदांच्या भावना विचारात घेता दि.१०/११/२०१४ दु.२.२० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक - ३५.</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**<u>(दिनांक २०/०९/२०१४ व दि.१०/११/२०१४ (दु.२.००) ची तहकूब सभा)</u>**

<u>दिनांक - १०.११.२०१४</u> <u>वेळ - दुपारी २.२० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची (माहे सप्टेंबर २०१४) दिनांक १०.११.२०१४ (दु.२.००) ची तहकूब मा.महापालिका सभा सोमवार दि.१०.११.२०१४ रोजी दुपारी २.२० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर

२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर

३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू

५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ

६. मा.भालेकर अरुणा दिलीप

७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने

८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)

९. मा.थोरात वनिता एकनाथ

१०. मा.सायकर अजय शंकरराव

११. मा.जाधव साधना रामदास

१२. मा.जाधव राहुल गुलाब

१३. मा.आल्हाट मंदा उत्तम

१४. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर

१५. मा.काळजे नितीन प्रताप

१६. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर

१७. मा.जगदीश शेट्टी

१८. मा.बाबर शारदा प्रकाश

१९. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव

२०. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

२१. मा.उल्हास शेट्टी

२२. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

२३. मा.पवार संगीता शाम

२४. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२५. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२६. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२७. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२८. मा.आर.एस.कुमार

२९. मा.जावेद रमजान शेख

३०. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

३१. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३२. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३३. मा.राजू मिसाळ

३४. मा.नंदा विकास ताकवणे

३५. मा.नेटके सुमन राजेंद्र

३६. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३७. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३८. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३९. मा.लोंढे गणेश नारायण

४०. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

४१. मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे

४२. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४३. मा.अपर्णा निलेश डोके

४४. मा.अनंत सुभाष को-हाळे

४५. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४६. मा.जयश्री वसंत गावडे

४७. मा.पवार मनीषा काळूराम

४८. मा.प्रसाद शेट्टी

४९. मा.काळभोर वैशाली जालिंदर

५०. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

५१. मा.शेख अस्लम शैकत

५२. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५३. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५४. मा.मडिगेरी वर्षा विलास

५५. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५६. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५७. मा.सुपे आशा रविंद्र

५८. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५९. मा.मोहिनीताई विलास लांडे

६०. मा.अजित दामोदर गव्हाणे

६१. मा.गोफणे अनुराधा देविदास

६२. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

६३. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

६४. मा.महेशदादा किसन लांडगे

६५. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

६६. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६७. मा.लोंढे शुभांगी संतोष

६८. मा.ननवरे जितेंद्र बाबा

६९. मा.सावळे सिमा रविंद्र

७०. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

७१. मा.भोसले राहूल हनुमंतराव

७२. मा.पालांडे सुजाता सुनिल

७३. मा.बहल योगेश मंगलसेन

७४. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

७५. मा.कदम सदगुरु महादेव

७६. मा.गिता सुशील मंचरकर

७७. मा.कैलास महादेव कदम

७८. मा.छाया जगन्नाथ साबळे

७९. मा.पहलानी गुरुबक्ष बिशनदास

८०. मा.आसवाणी सविता धनराज

८१. मा.वाघेरे सुनिता राजेश

८२. मा.आसवाणी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

८३. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

८४. मा .ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

८५. मा.काळे विमल रमेश

८६. मा.पाडाळे निता विलास

८७. मा.विनोद जयवंत नढे

८८. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८९. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

९०. मा.विमलताई सुरेश जगताप

९१. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

९२. मा.बारणे निलेश हिरामण

९३. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

९४. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदू बारणे

९५. मा.बारणे माया संतोष

९६. मा.ओव्हाळ शेखर अशोक

९७. मा.यमुनाताई रमणनाना पवार

९८. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

९९. मा.कलाटे स्वाती मयुर

१००. मा.नांदगुडे विलास एकनाथ

१०१. मा.चौंधे आरती सुरेश

१०२. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१०३. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

१०४. मा.बोकड रामदास गेणभाऊ

१०५. मा.जवळकर वैशाली राहुल

१०६. मा.जगताप राजेंद्र गणपत

१०७. मा.शितोळे शैलजा बाबुराव

१०८. मा.जगताप नवनाथ दत्तु

१०९. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

११०. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

१११. मा.जम सोनाली पोपट

११२. मा.प्रशांत शितोळे

११३. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

११४. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

११५. मा.गायकवाड संध्या सूरदास

११६. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

११७. मा.शेंडगे आशा सुखदेव

११८. मा.मोटे किरण बाळासाहेब

११९. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

१२०. मा.संजय केशवराव काटे

१२१. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

१२२. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१२३. मा.पाटील सुजित वसंत

१२४. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

१२५. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव-आयुक्त, मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त, मा.डोईफोडे, मा.गावडे, मा.दंडवते, मा.माने, मा.कुलकर्णी, मा.गायकवाड, मा.फुंदे, मा.दुरगूडे, मा.माछरे-सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर- मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे -विकास अभियंता, मा.चव्हाण, मा.पाटील, मा.तुपे-सहशहर अभियंता, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.भदाणे-उपसंचालक(नगररचना), मा.दुधेकर, मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे, मा.काची, मा.तांबे, मा.साळवी, मा.पठाण, मा.कुलकर्णी, मा.पिरजादे, मा.बरशेट्टी, मा.कांबळे-कार्य.अभियंता, मा.उबाळे-प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.सातव-प्र.शिक्षणाधिकारी(माध्यमिक), मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.बोदडे-प्रशासन अधिकारी (जनतासंपर्क) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर** - उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

अ) मा.महापालिका सभा क्रमांक- ३१ दिनांक २०/६/२०१४ व ४/७/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर मॅडम, शहरामध्ये डेंग्यूच्या साथीने अक्षरशः थैमान घातलेले आहे. ज्याठिकाणी रुग्ण आढळून येतो त्याठिकाणी फवारणी होते, फॉगींग होते, स्प्रेईंग होते. पण रुटीन प्रोसेसमध्ये स्प्रेईंग किंवा फॉगींग करण्यासाठी लागणारे इन्फ्रास्ट्रक्चर नाही. चिफ सॅनीटरी इन्सपेक्टर, सॅनीटरी इन्सपेक्टर या लोकांनी जे अव्हेलेबल आहे त्यामध्ये काम करण्याचा प्रयत्न केला आहे, ते फोन केलातर येतात. परंतु त्यांच्याकडे लागणारे मशिन, मॅनपॉवर नसेलतर ते काय करणार ? किती वर्षापासून आम्ही हे सांगतो. प्रत्येक प्रभागात, प्रभाग म्हणजे आडीच वॉर्ड, या वॉर्डामध्ये एक स्प्रेकुली असतो. अ प्रभागाच उदाहरण घ्या तेथे १२ प्रभाग आहेत म्हणजे पुर्वीचे २६ वॉर्ड आहेत आणि त्याठिकाणी १२ लोक आहेत. त्यामध्ये साप्ताहीक सुट्टी सोडलीतर आठ ते नऊ लोक कामाला येतात, यामध्ये २६ वॉर्ड कसेकाय करणार. अक्षरशः एक स्प्रेकुली ५० घर कव्हर करतो आणि त्यामध्ये त्याला पुर्ण वॉर्ड करण्यासाठी चार ते पाच महिने लागतात. किती वर्षे आम्ही बोंब मारतो की स्प्रेकुली वाढवा, स्प्रेकुली वाढवा पण स्प्रेकुली वाढविला नाही. फॉगींगच आसच आहे, एक गाडी फॉगींगसाठी आहे. २६ वॉर्डासाठी म्हणजे १२ प्रभागासाठी एक गाडी फॉगींगची आहे. हे सुध्दा मी अनेकवेळा सांगीतल की फॉगींगच मशीन वाढवा. फॉगींगसाठी एक कॉन्ट्रॅक्टर ऐवजी पाच कॉन्ट्रॅक्टर ठेवा. किंवा एका कॉन्ट्रॅक्टरला पाच ठिकाणी अरेंजमेंट करायला सांगा, तरी काहीही केलेल नाही. आज परिस्थिती काय आहे, किती लोक हॉस्पिटलमध्ये आहेत रोज पेपरला बातमी आहे. प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये रुग्ण आहेत. वायसीएममध्ये बेड शिल्लक नाहीत आणि मग पेपरला आपण देतो की आम्ही चांगल्या प्रकारे हॅण्डल करतोय. तुमच्याकडे इन्फ्रास्ट्रक्चर नसेलतर, तुमच्याकडे मशिनरी नसेल, तुमच्याकडे स्प्रेकुली नसेलतर तुम्ही हे कसे काय करणार हे सांगावे. गेल्या महिना दिड महिन्या पासून याच्यावर चर्चा चालू आहे पेपरमध्ये रोज बातमी येते तरीही तुम्ही तातडीने मशिन वाढविले नाही, माणस वाढविले नाहीत, औषध वाढविले नाहीत. लोक घाबरलेले आहेत आम्हांला फोन करतात. स्प्रेईंग पाठवा, फॉगींग पाठवा, कुठ पाठवायचे. पाच ठिकाणी मागीतलेतर दोन ठिकाणी देवू शकतो. सगळया ठिकाणी फवारणी होत नाही. आयुक्त साहेबांनी प्रत्येक घरामध्ये जावुन सर्व्हे करण्यासाठी लोक नेमलेले आहेत. मी एका टिम कडे गेलो त्यांना विचारल तुम्हांला माहिती आहे का कस शोधायचं, त्यांनी स्पष्ट सांगीतल मला काहीही येत नाही साहेब. एक जण म्हणाला मी एका विभागामध्ये लिपीक आहे, दुसरा म्हणाला मी एका विभागामध्ये सफाई कामगार आहे. आम्हांला काहीही ट्रेनिंग दिले गेलेले नाही. मग ७५ घर तुम्ही रोज कसकाय कव्हर करु शकता. त्याला विचारल किती घर केले, तर त्यांनी सांगीतले

तीन दिवसामध्ये २५० घर केले. २५० घरामध्ये तुम्हांला कुठे डेंग्युचा रुग्ण दिसला का, तर ते म्हणाले, नाही. मी म्हणालो असं कस होऊ शकत, तर ते म्हणाले आम्हांला माहितच नाही कसं फाईंडआऊट करायचं. आम्हांला ऑफीसने सांगीतल म्हणून आम्ही जातो आणि सर्व्हे करतो. आयुक्त साहेबांनी एक्झिस्टींग जे कामगार आहेत त्यांना जास्त वेळ काम करण्यास सांगीतल. ते काम करतात परंतु किती दिवस ते फुकट काम करणार, एखादा दिवस ठिक आहे, कामगार म्हणतात आठ आठ तास काम करायच आणि ओव्हरटाईम नाही. मी अनेक वेळा सांगीतलं सफाई कामगाराकडून जास्त वेळ काम करुन घ्यायच असेलतर त्यांना ओव्हरटाईम दया, तो दिला जात नाही. आपण सांगीतले रविवारी कामाला या ते रविवारी कामाला आले त्यांची काम करण्याचीतरी इच्छा असेल का. त्यांना माहिती आहे फुकट काम करायच आहे. तुम्ही ओव्हरटाईम का देत नाहीत. लोकांच्या जीवनापेक्षा पैसे महत्वाचे आहेत का ? त्या लोकांना गेल्या आठवडया पासून जादा काम करायला सांगीतले आहे मग जादा काम केलेतर त्याचा मोबदला दयायला नको का ? देतच नाहीत, मग आपण रविवारी बोलविलतर ते येणार त्यांची प्रेझेन्टी लावणार थोड काम करणार आणि जाणार. त्यांच्याकडे मॅनपॉवर नाही, मशीन्स नाहीत ते काम करु शकणार नाहीत. परिस्थिती गंभीर आहे अशा परिस्थितीमध्ये तुम्ही म्हणताय †क्शन घेतोय पण ज्या पध्दतीने †क्शन घ्यायला पाहिजे त्या पध्दतीने इन्फ्रास्ट्रक्चर अपॉईंट करायला पाहिजे ते होत नाही ही वाईट परिस्थिती आहे. मॅनपॉवर †ड करा, सात दिवसात एक्झिस्टींग कॉन्ट्रॅक्टरला सांगावे, औषध जास्त खरेदी करा. आणि मग व्यवस्थीत हे प्रश्न हॅण्डल करा. सकाळी उठल की रोज आमच्याकडे दोन ते तीन फोन येतात, आमच्याकडे डेंग्यू झालेला आहे, गाडी पाठवा. आम्ही तेथे जावून बघीतलतर ५० टक्के घरातच डेंग्यू आहे हे मी कबूल करतो. मनीप्लॅन्टमधील पाणी चेंज केल नाही म्हणून डेंग्यू होतो हे लोकांना प्रशिक्षण कोण देणार. आठ-आठ, पंधरा-पंधरा दिवस ड्रमचे पाणी चेंज केले नाही, गार्डनमध्ये पाणी ठेवले ते चेंज केले नाही, टाकीमधले पाणी चेंज केले नाही. याच्या माहितीसाठी लोकांना माहितीपत्रक दिले पाहिजेत. हे पत्रक कस प्रिंट केल. तुम्ही पेपरमध्ये देतो मराठीमध्ये केल ते चांगल केले परंतु ते एखादया दुसऱ्या पेपरला वाचण्यासाठी इंग्रजी, हिन्दीमध्ये दयायला पाहिजे. माहितीपत्रक वाटायचे त्याचा पेपर चांगला वापरला पाहिजे. हातात घेतले की तो पेपर फाटतो. परिस्थिती अशी आहे की लोक फार घाबरलेले आहेत. प्रशासनाच्या निग्लिजंसमुळे डेंग्यू वाढत चाललेला आहे. प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये दाखल केल्यानंतर प्रत्येक नागरीकांना ३० ते ४० हजार खर्च करुन ट्रिटमेंट घ्यावी लागते. वायसीएममध्ये कॉट मोकळे नाहीय. शहरात जे जे डेंग्यूचे पेशंट आहेत त्यांचा खर्च देवू अस डिक्लेअर करा. का नाही हे करायच, जर आपण लोकांना प्रशिक्षण देवू शकत नाहीत, औषध देवू शकत नाहीत. ज्यांना डेंग्यू झालेला आहे त्यांचे जे बील झालेले आहे ते वैदयकीय विभागामधुन दयायला पाहिजे. आरोग्यवाले म्हणतात हे काम वैदयकीयच आहे. तुम्ही

वैदयकीयला काय काम दिल हा सगळा लोढ आरोग्य विभागाकडे दिलेला आहे. ते म्हणतात आम्ही काय काय बघायचे. माती पडलेली असेलतर ती उचलायची, गटर साफ करायचे, झाडू मारायचा, वेष्ट मटेरीअल पडलेले असेलतर तेही उचलायच आणि डेंग्यूंसाठी जे काय काम करायच ते ही आम्हीच करायचं का ? माझ्या माहितीप्रमाणे तुम्ही आरोग्याच्या सर्व कर्मचा-यांना या सर्व्हेमध्ये कामाला लावलेले आहे. ज्या ज्या ठिकाणाहून कामगार पाठविलेले आहे त्याठिकाणचे त्यांचेकडे असलेले आरोग्याचे काम कोण पाहणार असे अनेक प्रश्न आहेत याकडे लक्ष दयावे. आपण पेपरमध्ये बातमी देतो, आम्ही अशा प्रकारे करतो पण †कच्युअल तसं होत नाही, माणस मरतात आणि अनेक डेंग्यूचे पेशंट प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये †डमीट केलेले आहेत. मध्यमवर्गीय माणसाना या डेंग्यूच्या उपचारासाठी प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये ३० ते ४० हजार दयावे लागतात. यास जबाबदार आपण नाहीत का ? आपणच त्यांना ही ट्रिटमेंट दयायला पाहिजे. माझी विनंती आहे की हे सिरीअस घ्यावे, मॅनपावर वाढवा, मशीन वाढवा, औषधीकरण वाढवा आणि कर्मचा-यांना ट्रेनिंग देवून सर्व्हेला पाठवावे. उठसुट कोणालाही सर्व्हेला पाठविल आहे. प्रॉपर्टी टॅक्समध्ये क्लार्क आहेत त्यांना सर्व्हेला पाठविले आहे, तो काय करणार आहे तो स्वत: म्हणतो मला काहीही माहिती नाही. तरी हे शहर डेंग्यूमुक्त करण्यासाठी याकडे लक्ष दयावे.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, नगरसेवक, नगरसेवीका, अधिकारी वर्ग. खरोखरच डेंग्यू हा विषय अतीशय घातक विषय आहे. मला पहिल्यांदा महानगरपालिकेच्या आरोग्याधिकारी यांना विचारावयाचे आहे की, औषध फवारणी हा विषय पहिल्यांदा वैदयकीय विभागाकडे होता तो काढून आरोग्य विभागाकडे दिलेला आहे. आरोग्य विभागाकडे स्वत:च कर्मचारी बळच नाही. माझ्या प्रभागामध्ये सुध्दा दोन कर्मचारी कमी आहेत. असं असताना आज डेंग्यूसाठी आहे त्याच लोकांना आपण घरोघरी पाठवतो. म्हणजे ना ती औषध फवारणी होते, ना डेंग्यूचा सर्व्हे होतो किंवा ना आमच्या प्रभागाची स्वच्छता होते. याच्यामध्ये काहीही काम होत नाही. आज आपले चारचे सहा प्रभाग झालेले आहेत. सहा प्रभाग करतांना आपण तेवढे कर्मचारी वाढविले का ? कारण आपले चार प्रभाग असताना जेवढे कर्मचारी आहेत तेवढेच आहेत कारण आपल्याकडे मलेरीया इन्सपेक्टर सुध्दा चारच आहेत. पुणे महापालिकेमध्ये साथीच्या आजारासंबंधीचे निर्मुलन करण्यासाठी औषध फवारणीसाठी, फॉगींगसाठी एक स्वतंत्र विभाग आहे. तसा विभाग आपल्याकडे चालू केलातर मला वाटतं साथीचे आजार किंवा संसर्गजन्य रोग जे आहेत ते ब-याचशा प्रमाणात आटोक्यात आणण्याचा आपण प्रयत्न करु शकतो. माझ्या वॉर्डामध्ये एकूण १९ पेशंट डेंग्यूचे आहेत. सफाई कामगार १९ पेशंटच्या घरोघरी जावून या कर्मचा-यांनी त्वरीत पाण्याचे ड्रम, भांडी रिकामी केली. हे काम यानी केलेतर प्रभाग स्वच्छ कधी होणार. हे दोन विषय आहेत ते कसे सोडवणार. माझी प्रशासनाला विनंती आहे की प्रत्येक थंडीचे दिवसात हा प्रादुर्भाव चालू होतो हे माहित असतं

तरी अगोदरच डेंग्यूसाठी वायसीएममध्ये वॉर्ड तयार का केलेला नाही. जेव्हा सगळया लोकांकडून तक्रार चालू झाली, ओरड चालू झाली त्यावेळेला आपण वायसीएममध्ये डेंग्यूचा स्वतंत्र विभाग चालू केला. असे प्रशासन वागणार असेलतर दरवर्षी हा प्रादुर्भाव वाढत जाईल आणि दरवर्षी याच पध्दतीन काम होईल. तरी आपण याचा व्यवस्थीत विचार करुन तो प्रयत्न केलातर डेंग्यू होऊ नये किंवा झालातरी तो कमी करण्याचा प्रयत्न कुठल्या पध्दतीने केला पाहिजे याचा विचार अगोदर केला असता तर मला वाटत व्यवस्थीत पध्दतीने काम झाल असतं. माझी आयुक्तांना अग्रहाची विनंती आहे की, वैदयकीय विभागाकडे आरोग्य विभाग दिलेला आहे, त्यापेक्षा तुम्ही ज्याप्रमाणे पुणे महापालिकेमध्ये साथीच्या आजाराचे निर्मुलन करण्यासाठीचा जो औषध फवारणीसाठी स्वतंत्र विभाग चालू केला आहे त्या धरतीवर आपल्याकडे सुध्दा स्वतंत्र विभाग चालू करण्यात यावा व त्यासाठी वेगळया पध्दतीचा स्टाफ भरती करण्यात यावा एवढीच विनंती आहे.

**मा.आशा शेंडगे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, अधिकारी वर्ग, नगरसेवक, नगरसेवीका, पत्रकार बंधु. खरंतर डेंग्यू संदर्भात आयुक्त साहेब अनेकवेळा स्थायी समितीमध्ये चर्चा केली परंतु रिझल्ट काहीच नाही. आज ज्या मतदारांच्या जीवावर आम्ही या सभागृहात आलो त्यांचे प्रश्न सोडविता येत नसतीलतर त्याला काही अर्थच नाही. फक्त चर्चा करतो, आम्ही फार वेळा चर्चा केली हे पेपरला येते, यापेक्षा निष्पन्न काय झाल हे महत्वाच आहे. आताच सुजाता ताईने व कुमार साहेबानी सांगीतले, त्याच्यापेक्षा त्यादिवशी स्थायी समितीच्या सभेमध्ये सांगीतल होत की जे जे पेशंट खाजगी हॉस्पिटलमध्ये जातील त्यांच्या बीलावरती आपण काहीतरी विचारविनीमय करायचा. त्या लोकांना मिनिमम दहा हजार, पाच हजार बील आले पाहिजे अशी चर्चा झालेली आहे. त्यावर आपण काय कार्यवाही केली हे सांगावे. आज बरोबर सहा दिवस झाले तरी त्या विषयावरती आपण कोणती †क्शन घेतली आहे ते सांगावे. त्याचबरोबर आपण वारंवार सभागृहामध्ये निदर्शनास आणून दिले आहे की, आपल्याकडे एस.आय.चे ११ पद रिक्त आहेत. जर एस.आय.चे ११ पद रिक्त असतीलतर त्यांच्याकडे असलेल्या मनुष्यबळाकडून किती काम करुन घेण्याची अपेक्षा करायची. त्यांना फोन केलातर ते काम करतील असं नाही, कारण एकतर मनुष्यबळच अपुरा असल्यामुळे वेगळ कामच होत नाही त्यात डेंग्यूची साथ आहे म्हणल्यानंतर आपण त्याच्यावरती जर काही कंट्रोल करायच असेलतर, आपण सांगीतल आम्ही हे केल, ते केल परंतु तुम्ही जे काही केलेले आहे त्याचा रिझल्ट काय? आजही पुन्हा डेंग्यूची संख्या वाढते आहे लोक वायसीएममध्ये जागा नाही म्हणून खाजगी हॉस्पिटलमध्ये जातात. ते खाजगी हॉस्पिटलमध्ये गेल्यानंतर त्यांना कमीत कमी बील येईल असे करावे ते सुध्दा करदाते नागरीक आहेत. अशा वेगवेगळया आजारावरती कंट्रोल करण्याची जबाबदारी प्रशासनाची असताना सुध्दा नागरीकांनी त्यांची भरपाई का करावी. मंगळवारी आपली मिटींग झाली बुधवारी, गुरुवारी आपण सगळया खाजगी

हॉस्पिटलच्या इन्चार्ज किंवा त्यांचे जे मेन असतील त्यांना बोलावून त्यांना सांगायला पाहिजे होते की पाच हजार किंवा मिनीमम बील घ्यावे अशी कोणत्याही प्रकारची बातमी दिसली नाही. सांगायचा हेतू हाच की येथे फक्त सभागृहात यायच चर्चा करायची आणि आम्ही खुप बोललो, आयुक्तांशी चांगल डिसीजन झाल असं नुसत म्हणण्यापुरत होत. परंतु प्रत्यक्षात मात्र कोणत्याही प्रकारची कार्यवाही होत नाही. अत्यंत निष्क्रिय आपले प्रशासन झालेले आहे. आज शहरामध्ये, माझ्या येथे प्रत्येक घरामध्ये एस.आय. सगळी टिम घेवून जातात, दहा ते बारा ठिकाणी त्या आळया सापडल्या. माझ्या बरोबर एसआय त्यांची टिम घेवून चार चार तास फिरतो, सकाळी ८.३० ते ११.३० पर्यंत काम करतो. त्यानंतर ते त्यांच्या हद्दीमध्ये जातात त्यामुळे निश्चितपणे प्रभागाचे काम स्वच्छ होत नाही, त्याला पर्याय नाही. डेंग्यूची साथ, स्वाईनफ्ल्यूची साथ दर वर्षाला येते हे आपल्याला माहिती आहे. त्यासाठी आजार होण्या अगोदरच त्याची काळजी घेणे आवश्यक आहे. प्रत्येकानी त्याच विषयावर चर्चा करायची आणि रिझल्ट काहीच येत नसेलतर सभागृहात कशाला यायचे, आयुक्त साहेबांनी याचा खुलासा करावा. महापौर मॅडम आपण विचारावे की मागच्या आठ दिवसात डॉक्टरांची मिटींग घेतली का. खाजगी हॉस्पिटलमध्ये डेंग्यू पेशंट निघालातर त्याच्याकडून किती बील घ्यायचे याबाबतीत आपण काही डिसीजन घेतले आहे का याच्यावर खुलासा करावा, धन्यवाद.

**मा.उल्हास शेट्टी** - मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह. याठिकाणी सभागृहामध्ये सर्वजण डेंग्यू विषयावर बोलणार आहेत. आर.एस.कुमार यांनी निदर्शनास आणून दिलेले आहे. मला त्यासंदर्भात बोलायचे आहे. मी जास्त बोलणार नाही. शहरामध्ये नाहीतर सर्व देशात स्वच्छते संदर्भात जनजागृती करण्याचा सर्वच एन्जीओनी विडा उचललेला आहे. आज प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये जो काही मनमानी कारभार चाललेला आहे त्यासाठी लक्ष देणे गरजेच आहे. सर्व सन्मा.नगरसेवक, कार्यकर्ते नेहमीच आरोग्याच्या अधिका-यांना किंवा डॉ. रॉय यांना हॉस्पिटलमधील जागेच्या संदर्भात फोन करत असतात. पण जागा अव्हेलेबल नाहीय. यावरुनच कळत की शहरामध्ये किती प्रमाणात भीतीच वातावरण निर्माण झालेल आहे. गोरगरीबांना वायसीएममध्ये जागा नाही. प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये गेलेतर साधा ताप जरी आलातरी ते मेडीकल टेस्ट करायला लावतात. या मेडीकल टेस्ट सुध्दा एवढया महाग झालेल्या आहेत की याच्यावर आपल्याला बंधन आणणे गरजेचे आहे. ताप आला म्हणल की टेस्टींगला जायचे, टेस्टींग म्हणजे विवीध प्रकारच्या टेस्टींग करायच्या. मध्ये डॉ.रॉय यांनी प्रायव्हेट हॉस्पिटलला नोटीस दिलेल्या होत्या पण त्याच पुढ काहीच झालेल नाही. आज पण तुम्ही बघा वायसीएम हॉस्पिटल नाहीतर प्रायव्हेट हॉस्पिटल फुल्ल झालेले आहेत. एवढ फुल्ल झालेले आहेत की त्यांच्या सर्व लॅब्रोटरी सुध्दा फुल्ल झालेल्या आहेत. लोक टेस्टींग करुन करुन आणि पैसे भरुन भरुन बेजार झालेले आहेत. यासंदर्भात आपल्याकडन कुमार साहेबांनी सांगीतल्याप्रमाणे कर्मचारी कमी आहेत. आपण शहरामध्ये भरपूर काम करतो, मोठ-मोठे

प्रकल्प आणतो पण आरोग्यासारख्या विषयावर आपण कमी पडतो. आपल्याकडे स्टाफ नाही, माणस नाहीत, फॉगींगसाठी लागणारे औषध नाहीत या गोष्टीकडे आपण लक्ष देत नाहीत. आताच वर्तमानपत्रामध्ये आपण वाचले की एका महिला भगिनीने मंगळसुत्र विकून टॉयलेट बांधले. शहरामध्ये आपल्या टॉयलेटची परिस्थिती कशी आहे हे बघा. आपल्याकडे असून नसल्यासारखी परिस्थिती आहे. सकाळी उठल्या उठल्या पहिला आरोग्याच्या कर्मचा-यांना फोन करावा लागतो. टॉयलेट साफ करायला कोणी आलय का विचारावे लागते, कचरा उचलला गेला नाही, पाणी तूंबलय असे आरोग्य खात्याच काम, सकाळी उठल की नगरसेवकांना सुपरवायझरचे काम करावे लागते. अजंठानगरसारख्या झोपडपट्टीमध्ये सर्व टॉयलेटस आहेत तिथे तुम्ही पुनर्वसन करता म्हणून त्याठिकाणी टॉयलेटला खर्च करु नका अस तुमच्या झोपडपट्टी विभागान कळवलेलं आहे. त्याठिकाणी ड्रेनेज असू देत, टॉयलेट असू देत एवढ घाण आहे की त्याठिकाणचे लोक तेथे कस टॉयलेटला जातात हे खुप मोठ कोड झालेल आहे. आयुक्त साहेब आपणही याठिकाणी लक्ष देणे गरजेच आहे. तुम्ही बाकीचे काम सोडून या आरोग्याच्या लोकांच्याकडून माहिती घ्यायला पाहिजे. किंवा एखादा ऑफीसर नेमला पाहिंजे. त्यांचीही काही चूक नाही कारण त्यांच्याकडेही माणस नाहीत ते तरी काय करणार. रोजचे कारणं आम्हांला त्याठिकाणी मिळतात. अशा गोष्टीकडे आपण लक्ष दिले पाहिजे. अजंठानगर झोपडपट्टी भागामध्ये घाणीच साम्राज्य आहे. रोज बोलून बोलून आम्हांलाही लाज वाटायला लागलेली आहे, रोज त्यांना तरी काय बोलायच कारण त्यांच्याकडे माणसच नाहीत, गवत वाढलेले आहे, पाणी तूंबलेल आहे, गटर आसच वाहतय. आयुक्त साहेब, मी तुम्हांला थरमॅक्स चौकाबाबतीत पत्र दिलेले होते तुम्हांला त्याठिकाणी घेवून जाण्यासाठी तुम्हाला वेळ मागीतलेली होती, तुम्ही हो सुध्दा म्हणाले परंतु परत आचारसहिंता लागली मला तुमची वेळ हवी आहे. अजंठानगरमध्ये तुम्ही स्पाईन रोडला लाखो रुपये खर्च करता. थरमॅक्स चौकापासून अजंठानगरचा परिसर बघा, असं वाटतच नाही की आपण शहरामध्ये आहोत. आपल्याला एक नंबरची सिटी पुरस्कार मिळालेला आहे तो कुठल्या अँगलन मिळालेला आहे याच कोड मला पडतयं. अजंठानगरमध्ये मी उदयान विभागाला सुध्दा नेहमी सांगत असतो त्याठिकाणी गार्डन आहे ते व्यवस्थीत ठेवा. आपला देश सुंदर व स्वच्छ झाला पाहिजे आपण का कमी पडतो आपल्याकडे एवढे मोठे बजेट असताना आपण का कमी पडतो. का बरं आरोग्य खात्याला आपण चांगल बजेट देत नाहीत. का तुम्ही त्याठिकाणी माणस नेमत नाहीत. ठेकेदारी पध्दतीने नेमतो ते सर्व चेक घेण्याचे काम करतात बाकी काही काम करत नाहीत. मी नेहमी आरोप करत असतो त्याठिकाणी टॉयलेट साफ करण्यासाठी जे काम देतात ते केवळ चेक गोळा करण्यासाठी, चलनावर सही करायची आणि फक्त चेक गोळा करायचे. आपण एखादी व्हिजीट मारुन बघावी टॉयलेटची कशी परिस्थिती आहे ते समजेल. आकुर्डी, दत्तवाडी परिसरामध्ये सकाळी जावून बघीतलतर टॉयलेटची कशी परिस्थिती आहे हे कळेल. त्या चाळीतील लोक कशी

काय जातात आणि आपण म्हणतो की एक महिलांनी मंगळसूत्र विकून टॉयलेट बांधल आहे. आपल्याकडे एवढ मोठ बजेट असुन सुध्दा साध टॉयलेटला क्लिन सुध्दा करु शकत नाहीत जनजागृती करण्याच काम आपलच आहे. मला वाटत आपल्याकडे पण दुर्देव आहे दोन तीन आयुक्त बदलले आणि आपण अधिकारी असे बदलता की इकडून तीकडे, तीकडून इकडे करता कोणालाही सांगत नाहीत, नगरसेवकांनाही कळत नाही, लोकांनाही कळत नाही. आज एक्झिक्यूटीव्ह आहेतर उदया कोणतर दुसराच आहे. सगळया विभागाची हीच बोंब आहे. विदयूत असू देत, स्थापत्य असू देत, पाणीपुरवठा असू देत. सगळीकडे हीच बोंब आहे. आज असलेला अधिकारी उदया नसतो उदया दुसरेच असतात. कोणाचे प्रमोशन असेल कोणी व्हीआरएस घेतो कोणी काही घेतय. सांगून सांगून कंटाळा आलेला आहे पण काही काम होत नाहीत. माझ्या येथे दोन बिल्डींगचे काम बिल्डर लोकांनी केलेले आहे. मी तीन वर्षापासून सांगतो त्या लोकांच कोर्टमॅटर असेल किंवा काही असेल त्याठिकाणी खड्डयामध्ये डबक साठलेले आहे. त्यात गप्पी मासे सोडतात, हे फवारणी करुन होणार आहे का. बिल्डींग परमीशनला आदेश दयावेत. माती टाकून बुजून घ्यावे म्हणून. ज्यावेळेस कोर्टाचा निर्णय होईल त्यावेळेस होईल ना. आतातरी तुम्ही ते बुजवू शकत नहीत का ? आपल्याकडे एवढा कंटाळा करतात की ते काम कोणी करायचे ते माझ नाही तुझ आहे, तुझ नाही माझ आहे, असे चाललेले आहे. आरोग्याला सांगीतलेतर ते म्हणतात बिल्डरच काम आहे, बिल्डर म्हणतो की, बिल्डींग परमीशनच काम आहे बिल्डींग परमीशन म्हणतात कोर्टात आहे. कारण त्याठिकाणी बिल्डींग होतात आणि तेथे डबके साठलेले आहे, त्याठिकाणी छोटासा वाद आहे ते काम करु देत नाहीत पण आपल्याकडे अधिकार आहे, ताकद आहे. ट्रकवाल्यांना कुठे टाकायचे तेथे टाकू दया. ज्यादिवशी प्रॉब्लेम सॉल्व्ह होईल त्या दिवशी बघु. परंतु आता आरोग्याशी तुम्ही खेळताय. इन्डायरेक्टली नगरसेवकांवर आरोप होतात. अधिका-यावर होत नाहीत, नगरसेवक लक्ष देत नाहीत, नगरसेवक काम करत नाहीत, विरोधक त्याठिकाणी सांगतात तुमचा नगरसेवक निवडून आलाय त्याच्याकडून करा, आम्ही काय करायचे, तुमच्याकडे आले की तूमच्याकडे एवढी मोठी गर्दी असते, त्यामुळे आमचे म्हणणेच मांडता येत नाही. तूमची मिटींग असते, तूमचे कामच एवढे असतात की आम्ही आमचे व्यक्तीगत काम सांगूच शकत नाहीत. अशा पध्दतीने काम आहेत. याठिकाणी माहितीच्या अधिकारात सामाजीक कार्यकर्ते भरपूर आहेत हे तुम्हांला माहिती आहे, प्रत्येकजण पत्र देतो की नगरसेवकांच काम नाही, नगरसेवक काम करत नाहीत. दुस-या दिवशी पेपरमध्ये सुध्दा चौकट येते की अमूक अमूक वॉर्डामध्ये स्वच्छता नाही, टॉयलेट साफ नाही, डबक साठलय, नगरसेवकांच लक्ष नाही, याला कोण दोषी आहे, आम्ही दोषी आहोत का. मग तुम्ही तूमच्यावर हे घ्या नां, हे कशामुळे होतय हे क्लेअर करा नां. माझी सभागृहाच्या वतीने विनंती राहिल की आरोग्य खात्यात लक्ष दयावे. एखादा प्रोजेक्ट झाला नाहीतरी चालेल, पण आरोग्य खात लोकांच्या जीवनाशी निगडीत आहे. आणि

माझी एक विनंती आहे की डॉ. रॉय यांनी डेंग्यूच्या रुग्णांना प्रायोरीटी दयावी. प्रायव्हेट रुग्णालयामध्ये लुट चालू आहे किरकोळ तापाला पण हे चेक करा ते चेक करा आणि शिबीर भरवण्यासाठी जनजागृती करावी, कारण आता प्लेटलेटची खुपच कमतरता शहरामध्ये आहे एवढ बोलून याठिकाणी थांबतो.

**मा.सुलभा उबाळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सर्व सन्मा.सभागृह. आज मी कुमार साहेबांचे आभार मानेल की आपण एका गंभीर विषयाला सुरवात केलेली आहे. आयुक्त साहेब आपल्याला मी यासंदर्भात एक पत्र दिलेले होते. त्यामध्ये काही सूचना केलेल्या होत्या त्यापैकी फक्त आपण दंडाची सूचना लगेच फॉलो करुन चालू केली पण बाकीच्या सूचनांकडे लक्ष दिलेले दिसत नाही. त्यामध्ये मी सांगीतले होते की सामाजीक संस्थांबरोबर आपण याठिकाणी बैठक घ्यावी त्यांना या कामामध्ये सहभागी करुन घ्या. आपल्याकडे मॅनपॉवर कमी आहे हे माहित असताना सुध्दा आहे त्याच लोकांवर जास्त जबाबदारी टाकायची, आताच सांगीतल की त्या लोकांना ओव्हरटाईम दिला जात नाही किंवा दुस-या काही अडचणी आहेत. त्यांनाच जास्त काम सांगत आहोत, त्या कामाकडे दुर्लक्ष होते. नगरसेवकांची तुम्ही स्पेशल मिटींग घ्यावी त्यांना त्याची माहिती दयावी कारण हे साथीचे रोग आहेत तो फक्त पिंपरी चिंचवड शहरामध्येच झाला असं नाही किंवा आयुक्तांमुळे झाला, महापौरांमुळे झाला असंही आम्ही म्हणत नाही. संपुर्ण राज्यामध्ये डेंग्यूंची लागण झालेली आहे. माझ स्वत:च कन्फ्यूजन झाल, मी आता मंगलाताईनां म्हणत होते कि डेंग्यू हा स्वच्छतेमुळे होतो अस प्रथमदर्शनी तरी दिसतय. मग ते स्वच्छ पाण्यात होवू देत किंवा एसी मधील पाण्यामध्ये, श्रीमंत जे लोक आहेत त्यांच्या घरी म्हणजे ऋषी कपूरच्या घरात डेंग्यू झाला किंवा तो †डमीट आहे म्हणजे ब-याच अंशी असं दिसतय की फेंगसुईच झाड, फेंगसुईचे झाड काही गोरगरीबांकडे नसतं श्रीमंत लोकांकडे किंवा फ्रिजच्या ट्रेमधील पाण्यामुळे झालेला आहे. म्हणजे नेमका डेंग्यू कशामुळे होतो याचा आम्हांला पहिल्यांदा खुलासा करावा. महापालिकेच्या हद्दीमध्ये जेवढया शाळा आहेत त्या शाळेतील मुलांना शिक्षकांच्या माध्यमातून समजून सांगीतलेतर निश्चितपणे ती मुलं आपआपल्या घरी जावून पालकांना सुध्दा सांगू शकतात, तरी याबाबतीत काय करता येईल याची आपण सखोल चर्चा केली पाहिजे. परंतु आपण एकटेच या कामाला लागलेलो आहोत आणि त्याच्यामध्ये आता त्रुटी आढळून येतात. दुसर म्हणजे आपल्याकडे सरकारी आकडा टिव्ही वर बघीतला आहे, पिंपरी चिंचवड शहरामध्ये सात रुग्ण दगावले किंवा पुण्यामध्ये तो अत्यंत खोटा आकडा आहे, आपल्यालाही माहिती आहे. माझ्याच वॉर्डामध्ये ज्योती देशपांडे नावाच्या ६० वर्षाच्या महिला २१ ऑगष्ट १४ ला डेंग्यूने मृत पावलेल्या आहेत म्हणजे आज नोव्हेंबर आहे, म्हणजे किती दिवसापासून डेंग्यू शहरामध्ये झालाय. आपल्याकडे याची कल्पना होती का ? अगदी अवघ्या तीन दिवसात आदित्य बिर्लामध्ये त्या महिलाचा मृत्यू झाला घरातून चालत ती महिला हॉस्पिटलमध्ये गेली दुस-या दिवशी प्रकृती जास्त झाली

आयसीयूमध्ये †डमीट केल्यानंतर प्लेटलेटस कमी झाल्या व तीस-या दिवशी तीचा मृत्यू झाला. म्हणजे घरातल्याना कळल सुध्दा नाही. त्यावेळेला आरोग्य विभागाला सांगीतल त्यांनी येवून आजुबाजूला फवारणी केली बंगलेवाले ऐकत नाहीत, घरामध्ये येवू देत नाहीत हे सुध्दा मी सांगीतल आहे. महापालिकेच्या कर्मचा-यांना घरातील तपासणी करु देत नाहीत त्या लोकांना सुध्दा तुम्ही टोकायला पाहिजे कारण त्यांना त्याच गांभीर्य माहिती नाहीय. शेजारच्या घरात डेंग्यू झालातर तो मच्छर आजूबाजूला सुध्दा चावणार आहे तुम्ही त्यासाठी काय केले याचा विचार आपण केला पाहिजे. माझ्या वॉर्डात मागच्या आठवडयामध्ये एक म्हातारी महिला डेंग्यूने मृत्यू पावलेली आहे म्हणजे दोन महिला मृत्यु पावलेल्या आहेत प्रत्येकजण नगरसेवकांना येवून सांगतो असं नाहीय. तुम्ही प्रायव्हेट हॉस्पिटल कडून किती डेंग्यूच्या रुग्णाचे रेकॉर्ड घेतले ते कशामुळे मृत पावले किती मृत पावले या सर्वांचा खुलासा पाहिजे. वर्तमानपत्रामध्ये आम्ही कुठंतरी वाचले की प्लेटलेटचा काळा बाजार चाललेला आहे. वायसीएममध्ये जरी आपला पेशंट †डमीट असेल तरी सुध्दा त्याला प्लेटलेटस आणायच्या त्यांच्याकडे अव्हेलेबल नसेलतर पुण्यातून आणण्यासाठी १५०० ते १६०० रुपये देवून प्लेटलेटस घ्याव्या लागतात ही आजची परिस्थिती आहे. याच्यावर तुम्ही काय सोल्यूशन काढलेल आहे. आजचा आकडा तुम्ही सांगावा की या डेंग्यूमुळे किती लोक शहरामध्ये दगावलेले आहेत किंवा हॉस्पिटलमध्ये आहेत किंवा प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये त्यांना कशाप्रकारे ट्रिटमेंट देतात, डेंग्यू नसलातरी डेंग्यू आहे असे सांगून कितीजण लुटमार करतात, किती मेडीकलमध्ये या गोष्टींची औषध नीट दिली जातायेत, काय काय चाललय त्या सर्वांची माहिती पाहिजे. आम्ही तुम्हांला जबाबदार धरणार हे करत असतांना तुम्ही फवारणीला माणस कमी आहेत किंवा ती फवारणी कशाप्रकारे होते त्याच्यामध्ये जे औषध आहेत ते त्या स्तराचे वापरले जातात की नाहीत हे पाहिले पाहिजे. साथीचे आजार, साथीचे रोग काही सांगून येत नाहीत व आले की ते आटोक्यामध्ये येत नाहीत. त्यासाठी अगोदर जी तयारी करायला पाहिजे तशी तयारी आपल्याकडे नाही. आम्हां नगरसेवकांना काही कळत नाही असं नाही, आम्ही तुम्हांला दहा सूचना मांडलेल्या आहेत त्यातील एखादीतरी सूचना †प्लीकेबल होऊ शकते नां. तुम्ही जसं बजेटमध्ये जाहिरात केली की बजेटमध्ये आम्हांला सूचना कळवा, म्हणजे तुम्हांला त्याच्यामध्ये ट्रान्फरन्सी दाखवायची आहे. या गोष्टीमध्ये महानगरपालिका हद्दीमध्ये राहणा-या प्रत्येक नागरीकांच्या जीवीताची जबाबदारी जे साथीच्या रोगाने मरतात ती महानगरपालिका वरती येतेय. कारण त्यांच्या निष्काळजीपणामुळे या गोष्टी येत असतात. त्यामुळे डेंग्यूचे लक्षण, त्याची होण्याची कारण आणि ते कुठल्या भागामध्ये सर्रास होऊ शकतो याचा खुलासा करावा. शाळेमध्ये ताबडतोब सूचना दयावी, सार्वजनिक ठिकाणी त्याची अनाऊन्समेंट चांगली करावी आणि या शहरात सामाजीक संस्था जेवढया आहेत त्यांना यामध्ये सहभागी करुन घ्यावे. काही लोक असे असतात की त्यांना काम करण्याची इच्छा असते. त्यांना संधी दिली

पाहिजे, त्यांना काम करायला लावल पाहिजे नुसते पत्र देवून चालत नाही त्यांना कामाला लावावे. प्रत्येक नगरसेवकांची सूचना घ्यावी. त्यांना सूचना करावी. मा.आयुक्त साहेब आपण डेंग्यू आटोक्यात आणण्याचा मनापासून प्रयत्न करतात परंतु यामध्ये आपण सर्वांना सहभागी करुन घ्यावे तरच हे होणार आहे. स्वच्छता काही एका कडून होणार नाही. बाकीचे लोक जे बोलले तेच रिपीट याठिकाणी न करता उदया कुठला अजून साथीचा आजार येणार आहे हे माहिती नाहीयं. परंतु या मागच्या काळातील डेंग्यूची जी काही हालचाल आहे त्यासंदर्भात काय रिपोर्टींग आहे आणि भविष्यामध्ये हा किती काळ चालणार आहे व त्याच आपण कसं निवारण करु शकतो या बाबत आम्हांला खुलासा करावा.

**मा.धनंजय आल्हाट** - सन्मा.महापौर साहेब, आयुक्त साहेब, या विषयाची फार अगोदर जनजागृती व्हायला पाहिजे होती आता अशा परिस्थितीमध्ये आपण काय भूमिका घ्यायची या काळामध्ये खरंतर आपल्याला आवाहन आहे. शहरातील सूत्र, शहराचा विकास आणि अशा परिस्थितीमध्ये ज्या काही समस्या आहेत त्याच्यावर कसा तोडगा काढायचा हे सर्व अवलंबून असते महापौरांवरती. आणि त्याला साथ हवी असते ती सन्मा.आयुक्तांची. आता समस्या मांडलेल्या आहेत त्यात मी जाणार नाही. कारण हा साथीचा रोग जो चालू आहे तो शहरामध्ये ब-याचशा लोकांना माहित नाही की डेंग्यू कसा होतो. अजून सुध्दा ९० टक्के लोकांच्या मनात गैरसमज आहेत, गटाराच्या पाण्यामधून, घाणीच्या पाण्यामधून डेंग्यू होतो असा एक सर्वसाधारण समज आहे, त्यामुळे त्याचा सगळा ठपका महापालिकेवर येतो. प्रथम आपण याठिकाणी जनजागृती करावी. जसे अनधिकृत बांधकामाच्यावेळी आपण सर्व होर्डींग्ज लावलेले होते आणि लोकांना आपण सजग केले तशा पध्दतीने डेंग्यू कसा होतो त्याच्यावरती आपण कशा पध्दतीने तोंड दिले पाहिजे. अशा सर्व प्रकारची जागृती आपण केली पाहिजे. खरंतर ही साथ सहा महिन्यापुर्वी चालू झालेली आहे. आपण सगळे झोपलेलो होतो. कारण आपल्या वैदयकीय आरोग्य विभागाची ही जबाबदारी होते, ताईनी सांगीतल की पुणे महापालिकेमध्ये यासाठी स्वतंत्र यंत्रणा आहे. खरंतर आरोग्याच्या कर्मचा-यांवर ही जबाबदारी देता कामा नये. कारण साफसफाई, स्वच्छता हा एक मोठा विषय आहे. पुणे महानगरपालिकेमध्ये किटकनाशक आणि हायसिंथ हा स्वतंत्र विभाग आहे. त्याच्यामध्ये स्वतंत्र कर्मचारी आहेत, अधिकारी आहेत आणि सर्वात महत्वाचे म्हणजे त्याठिकाणी किटक शास्त्रज्ञ आहेत. ज्याठिकाणी, ज्या भागामध्ये मच्छर जास्त आहे त्याचा शोध ते लोक लावतात त्याठिकाणची यंत्रसामुग्री असते आणि त्यांना कळते कि कुठल्या भागामध्ये मच्छर जास्त आहेत त्याठिकाणी आपण लक्ष दिल पाहिजे. हे त्या शास्त्रज्ञाकडून, तज्ज्ञांकडून महापालिकेच्या लक्षात येते आणि त्यानंतर पुढची कार्यवाही चालू होते. ही जबाबदारी आपण स्वतंत्रपणे दिलीतर याच्यावरती आपण तोडगा काढू शकतो. परिस्थिती अत्यंत गोंधळाची निर्माण झालेली आहे, आरोग्याच्या वरती आपण सर्व जबाबदारी सोपविली, आरोग्यावर आपण काय करतो, जनजागृती तर दुरच राहिलेली आहे

तेंव्हा या परिस्थितीच्या गोंधळातून आपल्याला बाहेर यायच असेलतर याठिकाणचे काही अनुभवी नगरसेवक आहेत मग ते सर्व पक्षाचे असतील त्यांची एक ताबडतोब समिती नेमा. आणि त्यांच्या सुचना आणि त्यांच नियंत्रण याच्यावर ठेवा जेणेकरुन पुढची वाटचाल करु. आता खरंतर या स्वतंत्र यंत्रणेसाठी कर्मचारी भरावे लागतील त्यासाठी शासनाची परवानगी लागेल अशा अनेक गोष्टी आहेत परंतु भविष्यात याचा आपण निश्चित विचार करावा. अशा पध्दतीने जर आपण नियोजन केलेतर मला वाटतं डेंग्यूला आपण चांगल्या प्रकारे रोखू शकतो. महापौर साहेब, मी तुमच्या माहितीसाठी सांगतो की मी सुध्दा महापालिकेच्या लोकांची वाट पाहिलेली नाही. माझ्या प्रभागामध्ये छोटेछोटे होर्डींग्ज मी तयार केले. डेंग्यू कसा होतो त्यापासून आपण कसा प्रतिबंध केला पाहिजे जवळ जवळ  दहा हजार पत्रक मी व माझ्या कार्यकर्त्यानी वाटले. आणि सगळया प्रभागामध्ये गेल्या पंधरा दिवसापासून हे पत्रक वाटायचे पुर्ण झालेले आहे. नगरसेवक या नात्यान जनजागृती करण्याच काम आम्ही करतो परंतु  हे पत्रक स्वत: नगरसेवकांना  छापायला लागतात हे दुर्दैव आहे याचेवर आपलं आरोग्याच्या दृष्टीन बीलकुल लक्ष नाही. जाता जाता  मी एका गोष्टीची आठवण करुन देतो की आपल्या महापालिकेला तोटा  होतो यादृष्टीकोनातून आपण सगळया बजेटवर कात्री मारलेली आहे परंतु आरोग्य विषय असा आहे त्यावर कात्री मारण्याचा विभाग नाही. आपल्या घरात पाणी नसेलतर बीनअंघोळीच कोणी राहत नाही. स्वच्छ आणि सुंदर भारत अभियान मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राबविलेले आहे त्याचा जी.आर. सुध्दा आलेला आहे परंतु त्याची अंमलबजावणी दिसत नाही. तेव्हा आपण येणा-या बजेटमधुन २० टक्के कात्री आरोग्य विभागाला लावलेली आहे त्यामुळ त्या भागातील २० टक्के कर्मचारी कमी झालेले आहेत. पर्यायाने त्याठिकाणी कचरा वाढणार आहे, स्वच्छता होणार नाही. अशा प्रकारच्या आरोग्याच्या विषयाकडे आपण गांभीर्याने बघावे तडजोड करु नका. उलट आरोग्यासाठी तुम्ही वाढीव बजेट दयावे जेणेकरुन आपला परिसर आपल शहर स्वच्छ व सुंदर होईल याच्याकडे लक्ष दयावे. त्याच्यामध्ये एखादा रस्ता, प्रकल्प कमी झालातरी चालेल परंतु आरोग्यासाठी आपण वाढीव लोक दया, वाढीव बजेट दया. महापौर साहेब, आपल्या कालावधीमध्ये हे आपण करावे त्याकडे दुर्लक्ष करु नका पुणे महानगरपालिकेचा कचरा माझ्या प्रभागातील मोशी खाणीमध्ये जिरवण्याचा प्रस्ताव शासनदरबारी आहे. सन्मा.कलेक्टर साहेबांनी तो प्रस्ताव पाठविलेला सुध्दा आहे. आपणा सर्वांना ज्ञात आहे की संपुर्ण शहराचा जवळ जवळ ८०० टन कचरा मोशीमध्ये टाकला जातो. त्याचा त्रास एवढया मोठया प्रमाणात त्या परीसरातील नागरीकांना होतो. सकाळी लोक उठल्यानंतर स्वच्छ हावेमध्ये फिरायला जातात, व्यायाम करतात त्यावेळेस त्यांना पहिला कच-याचा वास येतो. आयुक्त साहेब आपण कोटयावधी रुपये खर्च करतो पण केवळ हे प्रोजेक्ट कशासाठी करतो, मग तो केवळ भ्रष्टाचारासाठी करतो का ? का नेमके आरोग्य चांगले होवून कचरा विघटन होण्यासाठी करतो. याच्याकडे आपण गांभीर्याने लक्ष दया. याचा तीन कि.मी. च्या

परिसरामध्ये च-होली असेल, इड्डूळगाव असेल, तिथपर्यंत हा वास जातो. म्हणजे आपल किती अपयशी पध्दतीने हे काम चाललेल आहे हे अत्यंत गांभीर्याने घ्या. एवढा त्रास असताना पुणे महानगरपालिकेचा कचरा त्याबाबतचा प्रस्ताव त्याठिकाणी होतोय. मी स्थायी समितीच्या चेअरमनचे, सदस्यांचे अतीशय आभार मानतो त्यांनी यासाठी विरोध केलेला आहे, ठराव घेतलेला आहे. या सभेमध्ये सुध्दा तसाच विषय घेणेत यावा आणि विरोध करुन तो शासनाला पाठवावा. अशाप्रकारचा हा कचरा मोशी खाणीमध्ये जिरवणे म्हणजे तेथील नागरीकांवर अन्याय आहे. त्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे हे आपण गांभीर्याने लक्षात घ्या. आणि हे सगळे आरोग्याचे प्रश्न आहेत शहराच्या जनतेच्या आरोग्याच्या संबंधी हा प्रश्न असल्या कारणान याचा आपण अत्यंत गांभीर्याने विचार करावा. डेंग्यूचा जो प्रश्न आहे तो सर्वांना बरोबर घेवून ताबडतोब एक समिती नेमावी आणि पुढील अंमलबजावणी कशा पध्दतीने करायची याचा विचार आपल्या नेतृत्वा खाली करावा अशी मी याठिकाणी विनंती करतो.

**मा.शारदा बाबर** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.नगरसदस्य, अधिकारी व पत्रकार मित्र. डेंग्यूबद्दल चर्चा झालेली आहे परंतु मला सूचना करावीसी वाटते की प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये आपण जीवनदायी योजना राबवावी. हे काही ठरावीक हॉस्पिटलला केलेले आहे. पुर्ण प्रायव्हेट हॉस्पिटलला ती लागू करावी. डेंग्यू होण्याचे कारण, माझ्या माहितीनुसार तरी पाणी साठवणूकीमुळे डेंग्यू होतो. आपल्या महापालिकेनी दोनवेळा पाणी दिलेतर पाणी साठविण्याची वेळ लोकांवर येणार नाही त्यामुळे ही सूचना त्वरीत अंमलात आणावी. आता माझ्या शेजारी एका मुलाचे लग्न ठरलेले आहे, डिसेंबरमध्ये लग्न आहे आणि त्याला डेंग्यू झाला. त्याची आई एवढी भयग्रस्त झाली की सगळीकडे पपईच्या पाणाचा रस देण्यासाठी ती शोधत फिरते. पिंपरी चिंचवड ऐरीया भयग्रस्त झालेला आहे त्वरीत उपाययोजना राबवावी, एवढीच मी विनंती करते, धन्यवाद.

**मा.तानाजी खाडे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.नगरसेवक. आर.एस.कुमार यांनी विषय काढलेला आहे त्यांचे स्वागत करतो. डेंग्यू हा आजार, ही साथ आपल्या शहरात आलेली आहे. आपल्या शहराचे विश्वस्त म्हणून आम्ही येथे चर्चा करतो. डेंग्यूच्या संदर्भात शहरात आपल काम चाललेले आहे परंतु काही भागामध्ये आभाव असल्यामुळे ही साथ आटोक्यात येत नाही. त्याच महत्वाच कारण आपल्याकडे कर्मचारी वर्ग फार मोठा असताना देखील काही फवारण्या वेळेवर होत नाहीत, औषध मिळत नाही आणि जी औषध पुर्वी दयायची ती कुठल्या कॅटेगरीची दयायची याचा सुध्दा अभाव आहे. शहरात डेंग्यू आल्यानंतर सुरवातीला झोपडपट्टीकडे बघितले जाते, तेथील गटारामुळे, दुर्गंधीमुळे हा आजार होतो अशी एक भावना लोकांमध्ये होते. परंतु ते झोपडपट्टीतील गटाराच्या पाण्यामुळे नसुन या डासांच्या आळया या स्वच्छ पाण्यातच पैदा होतात आणि त्यामुळे डेंग्यू हा आजार पैदा होतो. याचे प्रबोधन शहरामध्ये चालू आहे, ते मोठया संख्येन चालू आहे प्रसिध्दी देखील चालू आहे आज या

डेंग्यूच्या आजारासाठी ज्या पध्दतीने नियोजन केले पाहिजे त्या पध्दतीने ते होत नाही दुसरी गोष्ट अशी आहे की, आमच्या भागामध्ये सुध्दा काही मुलांना डेंग्यु झालेला आहे. आताच आमच्या सदस्यांनी विषय मांडला. प्रायव्हेट हॉस्पिटल मध्ये ऍडमीट केल्यानंतर पैसे भरमसाठ लागतात ते भरण्यासाठी गरीबांकडे पैसे नसतात, आपल्या महापालिकेमध्ये देखील डेंग्यूचा वॉर्ड चालू आहे त्याठिकाणी पाहिलेतर डॉक्टरांचा आभाव जाणवतो. सर्जन लोक नाहीत, डेंग्यूच्या व्यतिरीक्त सांगतो त्याठिकाणी डॉक्टरांचा अभाव आहे त्यामुळे लोड आलेला आहे त्याकडे आपण दुर्लक्ष केलेले आहे. माझ्या प्रभागामध्ये महापालिकेचे बारा कर्मचारी आहेत तेथील सात कर्मचारी आजारात आहेत. बाकीचे अधिकारी लेव्हलला काम करतात. मी ब-याच वेळेला सांगीतले की ते बसून पगार घेतात त्यांना घरी बसवा व त्यांच्या मुलांना कामाला लावावे. कोणाला दिसत नाही, कोणाला मनक्याचा आजार सुरु झालेला आहे. परमनन्ट होईपर्यंत चांगले होते नंतर आजारी पडले. एक कर्मचारी त्याचे दोन्ही पाय गेलेले आहेत तो नुसती हजेरी लावतो काही काम करत नाही. असा ब-याचशा भागामध्ये आभाव आहे. कर्मचारी बहुसंख्येनी आहेत परंतु काम होत नाहीत. आता आपण ठेकेदारी पध्दतीने काम करतोत त्यावर हे सर्व काम चाललेली आहेत. परंतु परमनन्ट कर्मचा-याच्या बद्दल जर चौकशी केलीतर काम वेळेवर होत नाहीत. ठरावीक लोक काम करतात, नाही असं नाहीयं पण काही लोक नुसती हजेरी लावतात आणि काहीही काम करत नाहीत. आरोग्य विभागाकडे जातीने लक्ष घातलेतर चांगले होईल. माझ्या भागामध्ये देहू-रोड, कॅण्टोन्मेंट बोर्डाचा कचरा येवून पडतो. तो कचरा कुजून त्याचा दुर्गंधीयुक्त वास येतो. सुलभाताई उबाळे त्या यमुनानगरला राहतात त्यांच्या पर्यंत हा वास जातो. कचरा डेपोच्या बाजूला से.२२ ची वसाहत आहे त्या लोकांना राहणे मुश्किल झालेले आहे, डोक्याचे आजार फार वाढलेले आहेत. आम्ही दोन तीन सभेमध्ये बोललेलो आहोत परंतु काहीही होत नाही दुर्लक्ष झालेल आहे. आम्ही बोलतोय पण काहीही होत नाही. विषय मांडतो त्यावर कार्यवाही होणे आवश्यक आहे, अशी अपेक्षा आहे. दुसरी गोष्ट अशी आहे की, शाळेच्या पाण्याच्या टाक्या आहेत त्याचे झाकण तुटलेली आहेत. त्या पाण्याच्या टाकीमध्ये आळया होतात. त्याठिकाणी स्थापत्याचे शितोळे म्हणून डेप्युटी इंजिनीअर आहेत ते काहीही कामाचे नाहीत. त्यांच्याकडे अशी जबाबदारी टाकली की कामच होत नाहीत. त्यांना पन्नास वेळेस पाण्याच्या टाकीचे झाकण लावावेत, चेंबरवरती झाकण लावावेत म्हणून सांगीतलेतरी ती लावली जात नाहीत. सुट्टया संपल्या आहेत आता शाळा सुरु झालेली आहे. या आळया होतात त्या कशामुळे होतात, या पाण्यामुळे का आपल्या दुर्लक्षामुळे होतात. आपण जातीने लक्ष घातलेतर हा त्रास होणार नाही, जातीने लक्ष घालावे व कार्यवाही करावी. एखादयावर कारवाई झालीतर काम सुधारेल. श्रीकर परदेशी यांनी कारवाई केली होती व सुधारणाही झालेली होती. त्याच्यानंतर आजची परिस्थिती अशी आहे की कामही करत नाहीत, काम करायला नको. धरलंतर चावतयं आणि सोडलतर पळतयं, अशी दशा महापालिकेची झालेली आहे. डेंग्यूचा

आजार शहरामध्ये नसून राज्यामध्ये मोठया प्रमाणात वाढलेला आहे याच्यावर लक्ष पाहिजे, तरी आपण लक्ष घालावे. पांढ-या पेशी कमी आहेत, आयुक्त साहेब, आपण आवाहन करावे की रक्तदान शिबीर झाले पाहिजेत. प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये आव्वाचे सव्वा पैसे घेतात ते गोरगरीबांना परवडत नाही. तरी आपण आवाहन करावे जयहिन्द, जय महाराष्ट्र.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सदस्य व पत्रकार बंधु. डेंग्यूचा अतीशय महत्वाचा विषय आपण याठिकाणी चर्चेला घेतलेला आहे. मा.आयुक्तांनी याठिकाणी जाहीर करायला पाहिजे की आपण काय उपाययोजना केलेल्या आहेत व त्यानंतर आमच्या सूचना घेतल्या असत्यातर बरे झाले असते. परंतु नेहमीच्या प्रथेप्रमाणे आम्ही बोलतो त्यानंतर आपण बोलणार आहात त्यामुळे आमच्या सुचना वाया जाणार की काय अस वाटतयं. पिंपरी चिंचवड शहरात मोठमोठे फ्लेक्स लावलेले आहेत. आपले पिंपरी चिंचवड शहर हे फ्लेक्सचे शहर आहे असे म्हणलेतरी वावगे ठरणार नाही. एवढा मोठा सुंदर नाशिक फाटयाचा उड्डाणपुल केलेला आहे तो या फ्लेक्समुळे त्या पुलावरील लाईट झाकुन गेलेली आहे. किंवा त्यांना आदेश दया की डेंग्यू कशामुळे होतो, त्यावर उपाययोजना काय आहेत हे त्यांना तेथे लावा म्हणावत म्हणजे त्याचा काहीतरी लोकांना फायदा होईल. ज्याप्रमाणे परदेशी साहेबांनी सारथीची जाहिरात प्रत्येक फ्लेक्सवर केलेली होती त्याप्रमाणे डेंग्यू कशा पध्दतीने होतो याची तुम्ही जाहिरात या फ्लेक्सवर करावी त्यामुळे लोकांना जास्तीत जास्त कळेल. सिनेमा थिएटरमध्ये जाहिरात दयावी, व्हॉट्स†पवर, फेसबुक, व्हाईस एसएमएस असतील त्यासाठी पैसे गेलेतरी चालेल परंतु लोकांपर्यंत हे पोहचवावे व जनजागृती करावी. आज बरीचशी माहिती आम्हांला व्हॉट्स†प वरुनच कळते. या सर्व गोष्टीचा पाठपुरावा करावा. गणेश मंडळ आहेत त्यांना सुध्दा आपल्या शहरात सामाजीक काम करण्याची सवय लावली पाहिजे. त्याप्रमाणे आपल्याकडे जे सिग्नल आहेत त्या सिग्नलवर सुध्दा छोटे पत्रक वाटण्यासाठी ठरावीक लोकांना किंवा संस्थेला सांगावे एक एक जबाबदारी दया. म्हणजे हा सगळया बाजूने त्याचा भडीमार करा की ते तोंडपाठ झाल पाहिंजे. डेंग्यू हा नवीन नाही की आजच किंवा याच वर्षी आलेला आहे अस नाही, तो मागच्या वर्षी सुध्दा आलेला होता. राजीव गांधी जीवनदायी योजनेमध्ये याचा अंतर्भाव करावा. राजीव गांधी जीवनदायी योजनेमध्ये ज्या अटी आहेत त्या बीनकामाच्या आहेत. राजीव गांधी जीवनदायी योजना मंजूर केली परंतु त्यामधील बऱ्याचशा गोष्टी पेशंटला मिळत नाहीत. साधा एमआरआय सुध्दा राजीव गांधी योजनेअंतर्गत काढू शकत नाहीत. तातडीची बाब म्हणून हे जे साथीचे आजार आहेत त्यासंदर्भात तुम्ही मा.मुख्यमंत्री यांना पत्र लीहा की संपुर्ण महाराष्ट्रभर डेंग्यूने थैमान घातलेल आहे याच्यामध्ये माणस मृत्युमूखी पडतात, जगत नाहीत त्यामुळे हा आजार ज्याला ज्याला होईल त्यांच्यासाठी हा आजार संपेपर्यंत त्या आजाराला राजीव गांधी जीवनदायी योजनेमध्ये समाविष्ट करावे. यामुळे माणस जगतील आणि त्यांचे पैसे खर्च होणार नाहीत, अशी मागणी करावी अशी विनंती आहे. मी स्वत: डेंग्यूचे पेशंट

घेवून वायसीएम मध्ये गेले होते त्याठिकाणी ॲटेटाईम एका वेळेला सहा ते सात पेशंट खुर्चीवर बसून होते, कोणी खाली बसले होते त्यांना बसता सुध्दा येत नव्हते. त्यांना विचारलेतर ते म्हणाले आम्हांला जागा नाही, कॉट नाहीत. डॉक्टरांना विचारलतर ते म्हणाले जागा नाही आम्ही तरी काय करणार. तुम्ही तातडीचा उपाय म्हणून भाड देवून दहा गादया आणू शकता, एखादया पेशंटची व्यवस्था करु शकता, औषध देवू शकता. परंतु त्या गरीब लोकांनी कुठे जायचे. बाहेर प्रायव्हेटमध्ये ४० ते ५० हजार लागतात. तेव्हा त्या पेशंटला तेथे बसण्याची व्यवस्था करा ते खाली फरशीवर बसतात. तरी त्याठिकाणी अजून एखादा अधिकारी नेमावा वायसीएममध्ये त्यांना ट्रिटमेंट मिळत नाही. मी स्वत: औंध जिल्हा रुग्णालयात पेशंट पाठविलेत. दुसरा महत्वाचा विषय म्हणजे आरोग्याशी संबंधीत जेवढे काम असतील ते सर्व काम ठेकेदारांना देण्याची पध्दत मागच्या अनेक वर्षापासून सुरु आहे ती पहिल्यांदा बंद करा. ही मुळ कीड या महापालिकेवर आहे ती पहिल्यांदा बंद करा. ती कीड जोपर्यंत मुळापासून उपटून काढत नाहीत तोपर्यंत या आरोग्याच्या सुविधा आपल्या शहरामध्ये व्यवस्थित चालणार नाहीत. आमची विनंती आहे की आरोग्याची ही ठेकेदारी पध्दत पहिल्यांदा बंद करा. आमची नगरसेवक म्हणून जी जबाबदारी आहे, ती आम्ही आमच्या पध्दतीने फेस करु, सन्मा. नगरसेवकांना विनंती आहे की आपल्या वॉर्डात आपल्या कोणा कार्यकर्त्यांचा, आपला कोणाचा या दरम्यान वाढदिवस असेलतर, ज्यांना डेंग्यू झालेला असेल त्यांना किवीचे फळ, पपई वगैरे ही फळे भेट दयावीत म्हणजे त्यांना मदत केल्यासारख होईल, धन्यवाद.

**मा.अनंत को-हाळे** - मा.महापौर साहेब, आयुक्त साहेब, अधिकारी वर्ग, पत्रकार बंधु. डेंग्यू होण्याची बरीचशी कारणे आहेत परंतु महत्वाची आता चर्चेला आलेली कारण आहेत, त्यातील एक म्हणजे पाण्याचा साठा. आयुक्त साहेब, मला असं वाटतयं की आपले निर्णय लवकर होत नाहीत. आपण दोन वेळा पाणी चालू केलेतर लोक पाणी साठवून ठेवणार नाहीत. हा निर्णय लगेच घ्यायला पाहिजे होता. दुसर म्हणजे आताच शेंडगेताई बोलल्या जे पेशंट प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये ॲडमीट होतात त्यांच्या मदतीचा कुठलाही निर्णय घेतलेला नाही तो पण निर्णय लवकर झाला पाहिजे. तीसरी महत्वाची गोष्ट म्हणजे पेशंटच्या प्लेटलेटस् कमी होतात तेव्हा ब्लड मिळत नाही, किंवा त्याचे रेट हाय झालेले असतात. ज्या ज्या प्रायव्हेट ब्लड बँक आहेत त्यांना तुम्ही आदेश दयावेत की कुठलाही गरीब डेंग्यूचा पेशंट आलातर त्याला मोफत दयावे. आताच सोनकांबळे ताईनी सांगीतल की जाहिरात केली पाहिजे. निश्चितपणे जाहिरात केली पाहिजे व त्या जाहिरातीवर महापालिकेच्या अधिका-याचा नंबर दिला पाहिजे. की जर तुम्हांला काही अडचण असेल, प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये बीलाची मागणी होते तर त्यावेळेस तुम्ही या या अधिका-याशी संपर्क साधावा तो अधिकारी तुमच्या अडचणी सोडविल. त्याचबरोबर सगळयात महत्वाची गोष्ट म्हणजे गेली दोन वर्षे मी पाठपुरावा करतो डेंग्यू, मलेरीया किंवा कुठलाही आजार असेल याची कारण भरपूर आहेत परंतु माझ्या प्रभागामध्ये मी पाठपुरावा करतो,

माझ्या प्रभागामध्ये काही प्रायव्हेट संस्थेचे आणि काही महापालिकेचे प्लॉटस आहेत. दोन ते तीन एक्करचे काही प्लॉट आहेत, काही अर्ध्या एक्कराचे प्लॉटस आहेत. या जागेमध्ये गवत वाढलेल आहे, काँग्रेस वाढलेले आहे. त्यामध्ये साप सुध्दा आहेत. ही साफसफाई कोण करणार. महापालिकेचे आरक्षीत प्लॉटस् आहेत ते ताब्यात घेतलेले आहेत त्याठिकाणी सुध्दा तीच परिस्थिती आहे. त्याठिकाणी नदी काठचे डास झाडाझुडपात बसतात, आणि रात्री सगळीकडे फिरतात. हे प्लॉटस चांगल्या पध्दतीने साफ केलेतर हे होणार नाहीत. प्रायव्हेट प्लॉटमालकांना दंड आकारावा. या दोन-तीन सुचनांवर लवकरात लवकर कारवाई करावी.

**मा.डॉ.अनिल रॉय** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सद्दस्थितीत पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत डेंग्यूची साथ चालू आहे मागील तीन वर्षाच्या मानाने खुप जास्त प्रमाणात पेशंट आहेत. मागच्या वर्षी ४५ पेशंट होते तर या वर्षी आतापर्यंत ३९८ पेशंट आढळून आले त्यात सहाची डेथ झाली व त्यातील फक्त दोनच डेंग्यूचे कन्फर्म डेथ आहेत. आपल्याकडे सस्पेक्टेड सहा डेथ आहेत त्यापैकी दिघीची एक डेथ झालेली आहे त्यांची स्टेट गव्हर्मेंट कडून कन्फर्म डेथ झालेली आहे. दुसरी नेहरुनगर, पिंपरी येथील मुलीची डेथ झालेली आहे निरामय हॉस्पिटलला ही सुध्दा डेथ कन्फर्म झालेली आहे. उर्वरीत चार लोकांच्या डेथ आहेत या लोकांचे निगेटिव्ह रिपोर्ट आलेले आहेत. जे डेथ सर्टिफकेट भेटणार त्यासाठी शासनाकडून एक डेथ ऑडीट कमिटी असते दर महिन्याला त्यांची मिटींग होते त्या मिटींगमध्ये या केसेस स्टडी केल्या जातात आणि या डेथ ऑडीट कमिटीने कन्फर्म केल्यानंतर या केसेस कन्फर्म होतात. या कमिटीची मिटींग आज पुण्यामध्ये चालू आहे. जुन महिन्यात या केसेस वाढायला लागल्या आहेत. जून महिन्यात २३ केसेस झाल्या तेव्हापासून वैदयकीय विभाग यांच्या मार्फत ज्या काही उपाययोजना आहेत त्या केलेल्या आहेत. वैदयकीय विभागाचे १२० लसीकरण सत्र असतात आणि ४० मोबाईल लसीकरण होत असतात ते लसीकरण सत्र दर महिन्याला असतात आणि वेगवेगळया ठिकाणी असतात जास्त करुन ते झोपडपट्टी ऐरीयामध्ये असतात त्याठिकाणी आमच्या कर्मचा-या मार्फत जनजागृती करण्यात आलेली आहे. त्या त्या ठिकाणच्या लोकांना काळजी घ्यावी म्हणून सांगण्यात आलेले आहे. जेव्हा एखादी टेस्ट पॉझिटीव्ह येते ते प्रायव्हेटची व महापालिकेची सुध्दा ती टेस्ट आहे त्या त्या ठिकाणी त्या रुग्णाच्या घरी आमचा एमपीडब्ल्यू व्हिजीट करतो. ज्याना डेंग्यू टेस्ट करण्याची गरज आहे त्यांना आमच्याकडे पाठविले जाते. डेंग्यूची माहिती, घ्यावयाची काळजी यासाठी चार लाख पँपलेट शहरात वाटण्यात आलेले आहेत. जुलै पासून प्रभागामध्ये वाटलेले आहेत त्याचप्रमाणे सहाही प्रभागात वॉल पेन्टींग केलेले आहे, याची यादी माझ्याकडे फोटोसह आहे. गेल्या दहा दिवसापासून आठ रिक्षावरील भोंग्यामार्फत डेंग्यूची माहिती देण्यात येते. आठ दवाखान्यामध्ये डेंग्यू तपासणी किट जे असतात ते जुलै पासून उपलब्ध करण्यात आलेले आहेत आणि डेंग्यू टेस्ट मोफत होते जे बाहेर ८०० ते १००० रुपये घेतले जातात. दुसर म्हणजे येथील प्रायव्हेट

लायब्रोटरीला आवाहन केलेले आहे, त्यांचे १२०० ते १५०० रेट असतो तो ८०० रुपये केलेला आहे. त्याचप्रमाणे प्रायव्हेट जे हॉस्पिटल आहेत त्यांच्याकडन रोजच्या रोज आमचे डॉक्टर जावून रिपोर्ट गोळा करतात. डेंग्यूचे क्ति रुग्ण आहेत, किती रुग्ण आयसीयू मध्ये आहेत, किती पेशंट सिरीअस आहेत. वायसीएममध्ये १२५ बेडस हे मेडीसीन विभागाचे होते. एकूण ७११ बेडस आहेत त्यापैकी पुर्वी १५० केले आता २०८ बेडस मेडीसीनसाठी ठेवले. आजजर परिस्थिती बघीतलीतर आपल्याकडे वायसीएममध्ये ११९ पेशंट आहेत त्यापैकी ७४ पेशंट कन्फर्म नाही पण डेंग्यू सस्पेक्टेड आहेत. प्रायव्हेट हॉस्पिटलला आपण आवाहन केलेल आहे जे पेशंट ॲडमीट होतात त्यांच्या विनाकारण टेस्ट घेवू नयेत. तसेच बीलींग करताना कमी बील दयाव. बॉम्बे म्युनिसीपल ॲक्ट प्रमाणे त्यांचेवर कारवाई करण्याचे कुठलीही प्रोव्हीजन नाही. आमच्याकडे प्लेटलेटसचा किंवा रक्ताचा तुटवडा नाही. प्लेटलेटस काढण्यासाठी फ्रेश ब्लड लागत एकदा ब्लड घेतल्यानंतर सहा तासाच्या आत प्लेटलेटस काढाव्या लागतात. व प्लेटलेटस तयार केल्यानंतर त्या पाच दिवसात वापराव्या लागतात. बाकी फवारणी, धुरीकरण हे चालू आहे. प्रायव्हेट हॉस्पिटलला जवळ जवळ २५५ पेशंट डेंग्यूचे सस्पेक्टेड ॲडमीट आहेत आणि वायसीएमला १४ पेशंट आहेत त्यापैकी ५ आयसीयू मध्ये आहेत व एक सिरीअस होता त्याची पण आता कंडीशन चांगली आहे.

**मा.आर.एस.कुमार**- मा.महापौर साहेब, आरोग्य आणि वैदयकीय विभागामध्ये बीलकूल कोऑर्डीनेशन नाही. वैदयकीयकडे गेलोतर ते म्हणतात आरोग्याकडे आहे व आरोग्याकडे गेलोतर ते म्हणतात वैदयकीय कडे आहे. या दोन्ही डिपार्टमेंटमध्ये बीलकूल को-ऑर्डीनेशन नाही.

**मा.दिलीप गावडे** - मा.महापौर मॅडम, सन्मा.सभागृह, मा.आयुक्त साहेब, डेंग्युच्या बाबतीत आरोग्य विभागामार्फत उपाययोजना केल्या जातात त्याबद्दल मी माहिती देतो. शहरात डासोत्पत्तीचे स्थानक जी आहेत ती कायम स्वरुपी २४८ होते व तात्पुरते ३१५ असे एकूण ५६३ होते त्याच्यापैकी गप्पी मासे सोडलेले ठिकाण १०५ आहेत. आळीनाशके टाकण्यात आलेले ठिकाण ४५८ आहेत. डेंग्यू होण्याचे मुख्य कारण म्हणजे घरामध्ये किंवा परिसरामध्ये स्वच्छ पाण्याचा साठा, फ्रिज खालचा ट्रे, कुलर, फुलदाण्या, अनावश्यक पडून राहिलेले भंगार साहित्य जसे की, डबे, बाटल्या, नारळाच्या करंवटया, पाण्याच्या उघडया टाक्या, भंगार मालाची दुकाने, बांधकामे सुरु असलेली ठिकाण, टायर पंक्चर दुकान, निकामी टायर ज्याठिकाणी पाणी साठून राहते अशा ठिकाणी तपासणी करण्याचे काम मुख्यता आरोग्य विभागा मार्फत करण्यात आलेले आहे. हे काम आपण ९ जून पासून सुरु केलेले आहे आतापर्यंत तपासणी करण्यात आलेल्या घराची संख्या ३,१०,१३६ आहे व एकूण घराची संख्या ४,५०,००० पर्यंत आहे व डासांच्या आळया आढळून आलेल्या घरांची संख्या ५,७२० आहे ज्याचे की आपण घरोघरी जावून सर्व्हेक्षण केलेले आहे व डास आणि कंटेनरची संख्या ६ हजार ३० आहे. आळीनाशक ॲबेट टाकलेली भांडी ९७५ आहेत. फ्रिजच्या खालचा भाग काढता येत नाही त्यात सोल्यूशन टाकतो. त्याच्यानंतर

तपासलेली भंगार मालाची दुकाने ११२३ आहेत, तपासलेली बांधकामे ४२०, दक्षता घेणेकामी बजावलेल्या नोटीसांची संख्या १६५ आहे. प्रशासकीय शुल्क २५५ वसूल केले, आणि वसुल करण्यात आलेले प्रशासकीय शुल्क १,४०,८००/- या प्रमाणे सर्व्हेचे काम केलेले आहे. ज्याठिकाणी कर्मचारी सर्व्हेक्षणाला जातो तो याची माहिती देत असतो की कशामुळे याचा फैलाव होतो याची माहिती सुध्दा कर्मचारी देतात. औषध फवारणीसाठी मनपाचे नियमीत कामगार प्रभागनिहाय ११४ आहेत, औष्णीक धुरीकरणासाठी ३१ कर्मचारी आहेत व कंटेनर सर्व्हेसाठी १२२ कर्मचारी आहेत. आता १/११/१४ पासून या संदर्भात मा.आयुक्त साहेब यांनी सभा घेतली त्यानंतर डेंग्यूची साथ आटोक्यात आणण्यासाठी जवळपास दुप्पट कर्मचाऱ्यांची त्याठिकाणी नेमणूक केलेली आहे. मा.कुमार साहेबांनी प्रश्न उपस्थित केलेला होता की प्रभागातील कर्मचा-यांना प्रशिक्षण. मा.आयुक्तांनी सक्त सुचना प्रभागाला दिलेल्या आहेत. प्रभागातील कर्मचा-यांसाठी प्रभाग अधिकारी, सहा.आरोग्याधिकारी यांनी त्याठिकाणी प्रशिक्षण आयोजीत केलेले आहे. ते अगदी सोप प्रशिक्षण आहे, बाटलीमध्ये पाणी घेतलेतरी त्यात डेंग्यूची आळी आहे का नाही हे स्पष्ट दिसून येते. ते प्रशिक्षण प्रभागामार्फत देण्यात आलेले आहे. यासाठी १२२ अतिरीक्त कर्मचारी नेमलेले आहेत. याशिवाय धुरीकरणाच्या गाडया दुप्पट करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. किटकनाशक कामकाजासाठी ३६ कर्मचारी, मलेरीया इन्सपेक्टर ४, मुकादम ६, आपल्याकडे यंत्रसामुग्री उपलब्ध मध्ये स्प्रेपंप १४६ आहेत, फॉगिंग मशिन ३० आहेत, ऍटो रिक्षा ११ लावण्यात आलेल्या आहेत. किटकनाशकाचा उपलब्ध साठा आपण आचारसंहिते पुर्वी करुन ठेवलेला होता त्यामुळे अजून आपल्याकडे स्टॉक उपलब्ध आहे. टेमीपॉस आपल्याकडे उपलब्ध नव्हतं परंतु शासनाकडून जवळपास ४०० ली. उपलब्ध करुन घेतलेले आहे. मोठे डास मारण्यासाठीची औषध फायग्रॉन ९५ आहे, डेल्टॉन ८८ आहे. औष्णीक धुरीकरणासाठी जे औषध वापरले जाते ते १०५ ली. शिल्लक आहे. यात डेंग्यूचे पेशंट जेथे जेथे आढळतात त्यासाठी वैदयकीय विभागाचे आणि आमचे को-ऑर्डीनेशन असते. आजूबाजूच्या घरामध्ये डेंग्यू होवू नये म्हणूनही औषधाची फवारणी केली जाते

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर मॅडम, सन्मा.सभागृह. आता डॉ. रॉय यांनी माहिती देतांना सांगीतले मागील वर्षात फक्त ४५ सस्पेक्टेड रुग्ण आपल्याकडे सापडलेले होते. यावर्षी मात्र ३९८ रुग्ण आहेत. मगा पासून आम्ही तुम्हांला सांगतोयेत की हे कशामुळे घडते. आता तुम्ही सांगीतले म्हणून आमचं प्रबोधन झालं, तुमची रिक्षा फिरते त्या रिक्षावाल्याचे ऐकू येते का नाही हेच समजत नाही. तुम्ही प्रयत्न करतात, चांगल आहे प्रयत्न केले पाहिजेत परंतु योग्य त-हेनी प्रयत्न झाले पाहिजेत. त्या रिक्षाच्या बॅट-या डावून असतात. लोकांपर्यंत त्याचा आवाज जात नाही. शासनाचे डेथ ऑडीट चालू आहे. परवाची एक विदयार्थीनी वारली श्वेता सुनील चासकर मी आदित्य बिर्ला हॉस्पिटलला गेले होते त्यावेळी तीचे रिपोर्ट मी स्वत: पाहिले. माझी मुलगी सानिका सारंग कामतेकर ही सुध्दा त्या ठिकाणी डेंग्यूने †डमीट होती, आपण एकतर

ती आकडेवारी नाकारताय आणि नागरीकांवर जबाबदारी टाकताय. श्वेता डेंग्यूने गेली असे लिहीले असताना सुध्दा आपण अजूनही डेथ ऑडीटमध्ये तीच नाव नोंदवल की नाही. परंतु ती खेळण्याच्या-बागडण्याच्या वयामधील एखादी विदयार्थीनी निघून जाते आणि त्याठिकाणी आपण उपाययोजना आज करायची का उदया करायची या विचारापर्यंत थांबतो. ३९८ रुग्ण सस्पेक्टेड असतीलतर त्या सगळया रुग्णांना फ्रि ऑफ चार्जमध्ये सुविधा उपलब्ध करुन दिली पाहिजे. आम्ही वारंवार म्हणालो डोक फोडून सांगतो, दोन टाईम पाणी करावे. पाणी साठवण्याचे प्रमाण वाढल्यामुळे डेंग्यूची पैदास वाढलेली आहे. आता तुम्ही पाणी एक टाईम देतात परत दुस-या दिवशी येणार तोपर्यंत लोकांनी करायच काय ? घरात लहान मुल असतात, धुणं भांडी असतात पाणीतर साठवावच लागत. आज आपण ज्या घरात डेंग्यूचा सस्पेक्टेड रुग्ण आढळतो त्यांना दंड मारतो, तो मारला पाहिजे परंतु आपण सुध्दा त्या ठिकाणी पर्टिक्यूलर असले पाहिजे. एकीकडे सुविधा कमी करायच्या आणि दुसरीकडे समोरच्याला धारेवर धरायचे योग्य नाही. अजून किती लोकांची मरण्याची वाट बघणार आहात. वायसीएम मध्ये डॉक्टरांचा वणवा, तुटवडा आहे. तेथे आहे त्या रुग्णामध्ये वेगवेगळया प्रकारचे आजार आहेत. मी आहे त्या डॉक्टरांना दोष देणार नाही, एका डॉक्टरांनी किती पेशंट बघायचे याला सुध्दा मर्यादा पाहिजे. ज्याठिकाणी प्रायव्हेट हॉस्पिटलस आहेत त्यांना परवाने देण्याचे काम आपण करतो. मग परवाने देण्याचे काम थांबवा. आम्ही काहीच करु शकत नाहीत. शासनावर ढकलणार असूतर असं चालणार नाही. एक-एक रुग्णांचे बील पाहिलेतर सर्वसामान्य माणूस म्हणेल मी मरण पत्कारतो परंतु पैसे भरु शकत नाही अशी परिस्थिती आहे. एकीकडे झोपडपट्टीमध्ये अस्वच्छता असते म्हणून बोंबाबोंब केली जाते. आज चांगल्यातल्या चांगल्या घरातले रुग्ण ३५ रुग्ण डेंग्यूच्या आजाराने सस्पेक्टेड आहेत. फक्त झोपडपट्टीतलेच नाहीत. माझ्या वॉर्डात १९ रुग्ण सस्पेक्टेड आहेत. इंद्रायणीनगरमधील भागामध्ये सुध्दा रुग्णांची संख्या कमी नाही. त्याच कारण पाणी साठवणे हे असेलतर आपण पाणीपुरवठा सुरळीत करावा. सस्पेक्टेड रुग्णांसाठी काहीतरी उपाययोजना केली पाहिजे. आपण दवाखान्यामध्ये आपली टेस्ट मोफत देतो. मोफत कोणाला करतो आपण ज्यांचे एलो रेशन कार्ड आहे त्यांनाच मोफत करतो. डेंग्यूची मागच्या वर्षी आपण पुर्व तयारी केली होती त्यामध्ये आपण स्पेशल वॉर्ड तयार केले होते. स्वाईन् फ्ल्यूचा सुध्दा स्पेशल वॉर्ड केलेला होता. यावर्षी त्या स्टेजला जाण्याची रुग्णांची संख्या वाढलेली आहे त्यामुळे आपण त्यांची लवकरात लवकर काळजी घ्यावी. जे रुग्ण प्रायव्हेट रुग्णालयात †डमीट आहेत त्यांचा २५-५० हजार भरल्याशिवाय पुढचा विलाज होत नाही. पैसे उभे करण्यासाठी लोकांच्या दारोदार नातेवाईक फिरतात. आपल्याला महानगरपालिका म्हणून संस्था म्हणून त्या संदर्भात काय काळजी घेता येईल ती घ्यावी. त्याचबरोबर डेंग्यू न होण्याकरिता प्रचार, प्रसार आपल्याला करायचा असेलतर तर नगरसेवक म्हणून मी पहिल माझ नाव नोंदवते. जी काही दोन-चार लोक आहेत ते तुम्ही माझ्या बरोबर दया म्हणजे

आम्ही आमच्या वॉर्डात तुमच्या कर्मचा-या बरोबर स्पेशल कार्य करतोत. एखादयाचा जीव वाचवू शकलोतर अत्यंत अभीमान वाटतो चांगल वाटत. सगळया नगरसेवकांच्या वॉर्डात असा उपक्रम आपण राबवावा आणि त्यामध्ये लोकांना सहभागी करुन घ्या, धन्यवाद.

**मा.अनिता तापकीर** - मा.महापौर, मा.आयुक्त, सभागृह. आताच खुलासा केला की वॉर्डात रिक्षा फिरतात, पँपलेट वाटले परंतु आमच्या वॉर्डात रिक्षा फिरलेली दिसली नाही, आवाज ऐकलेला नाही. याकडे गांभीर्याने लक्ष दयाव. आमच्याच घरात पुतण्याला डेंग्यू झालेला होता, बिर्ला हॉस्पिटलमध्ये आयसीयूमध्ये होता एक लाख बील आल. वॉर्डात रिक्षा फिरत नाही, पँपलेट वाटलेले नाही. लोकांपर्यंत जनजागृती कशी होणार हे लोकाना कसं कळणार. हे लोकांपर्यंत पोहचलेलच नाही. याची नोंद घ्यावी.

**मा.शमीम पठाण** - मा.महापौर, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह. आताच डॉ. रॉय यांनी सांगीतले की सहा डेंग्यूचे पेशंट आहेत आणि त्यातून दोन डेथ झालेले आहेत. आयुक्त साहेबांना सांगते की, मी डेंग्यूग्रस्त वॉर्डाची नगरसेवीका आहे. शासन झोपलेले आहे का, की त्यांनी आठ दिवसानी, महिन्यानी सांगावे डेंग्यू नाही म्हणून. सगळया लोकांची झोप उडते. अशी कोणती चाचणी आहे की ती पंधरा दिवसानी, एक महिन्यानी येते आणि तीही नाही म्हणून येते. माझ्या वॉर्डात दोन पेशंट डेंग्यूने गेलेले आहेत. ज्यावेळेस व्यक्ति जाते त्यावेळेस अंगावर शहारे येतात. आजूबाजूच्या लोकांच्या काय भावना असतात त्या आम्ही येथे शब्दात नाही वर्णन करु शकत. डॉ.रॉय डेंग्यू नाही म्हणाले. तुम्ही शेवटच्या घरी पत्र लिहून सांगीतले का, की डेंग्यू नाही म्हणून. किंवा मला तरी एखादा फोन करुन कळवल का की त्यांना डेंग्यू नाही म्हणून असा अहवाल आलेला आहे. मी लोकांना सांगीतल असत त्यांची भीती कमी झाली असती. महापालिकेच्या कारभारामुळे होत असं नाही हे आम्हांलाही माहिती आहे. प्रत्येकांनी आपआपल जसं मा.पंतप्रधानानी हातात खराटा घेतला, प्रत्येकांनी त्या योजनेकडे लक्ष दयायला पाहिजे. प्रत्येकांनी ही गोष्ट गांभीर्याने घेतली पाहिजे. आपल्या परिसराची स्वच्छता केली पाहिजे. आपल्या घराची स्वच्छता केलीतर ते होणार आहे. काहीतरी त्याला अपवाद आहे तो करु शकत नाही. दरवर्षी डेंग्यू होतो मागच्या वर्षी चार ते पाच लाख पत्रक वाटले असतील ते माझ्याकडे अजून आहेत ते या वर्षी वाटलेले आहेत. बरीच उरलेली होती त्यापैकी काही दिलेली आहेत कारण आम्ही झोपडपट्टीत दिलेली नव्हती. या वर्षी कुठलेही पत्रक आलेले नाही. मी तुम्हांला दोष देत नाही. डेंग्यू झाल्यानंतरची जबाबदारी आपल्या वैदयकीय विभागाची आहे. त्यामुळे डेंग्यू होतो त्याला तुम्ही दोषी नाहीत आम्ही दोषी आहोत आणि आरोग्य विभाग काही अंशी दोषी आहे. याठिकाणी पेन्टींग केले म्हणाले परंतु तसे काहीही दिसले नाही महापालिकेचे फ्लेक्स कुठेही दिसले नाहीत. ठेकेदारांना दिलेल्या जागा आहेत त्याठिकाणी त्यांना सांगावे ते फ्लेक्स आठ दिवस जरी त्यांनी ठेवलेतर बराचसा प्रचार होईल. रिक्षा विषयी सांगीतले त्यांची बॅटरी डावून होते. रिक्षा लावल्या परंतु त्या चालतात का नाही हे बघण्याचे काम कोणाकडे

आहे. वैदयकीय विभागाकडे का आरोग्य विभागाकडे आहे. आरोग्य विभागाकडून तुम्हांला आकडेवारी अत्यंत चांगली आणि चोखपणे मिळेल. परंतु ते काम होते का नाही हे प्रत्यक्षात बघण्याच्या बाबतीत बोंब आहे. धुरीकरणासाठी थ्री व्हिलर टेम्पो केलेले आहेत ते दुप्पट केलेले आहेत परंतु जे थ्री व्हिलर टेम्पो आहेत त्यांचे बील दिले का ? दोन महिने झाले बीलच दिलेले नाही. ब प्रभागातील अधिकारी त्यास जबाबदार आहेत. पेट्रोलचा खर्च सुध्दा दिलेला नाही. कशाला ते टेम्पो फिरते. त्याठिकाणचे एसआय जे आहेत ते चांगले आहेत त्यांना केव्हाही अर्ध्यारात्री फोन केलातर ते हजर असतात. टेम्पोच नाही, त्यांनी टुव्हिलरवर हॅण्डपंप घेवून हे लोक पाठविलेले आहेत हे आरोग्य विभागाला दिसत नाही का. आपण जे औषध वापरतो ते बरेचशे औषध सांगीतलेले आहेत. कालच मुंबईचे डॉ. गुप्ता आणि पुण्यातील डॉ.परदेशी या दोघांच्या मुलाखती झाल्या त्यात त्यांनी सांगीतले आता आपण पारंपारीक औषध वापरतो त्याला ते डास दाद देत नाहीत त्यामुळे त्यापेक्षा पावरफुल अशी औषध आपण वापरले पाहिजे. फ्लाय-१ हे औषध कामातून गेलेले आहे काहीही परिणाम होत नाही आणि जी कॉन्टेटी मिळायला पाहिजेत ती मिळत नाही. फक्त पाण्यातच डासांची उत्पत्ती होते असे नाही. ती अडचणीच्या जागेत, काही झुडप वाढलेली आहेत त्याठिकाणी सुध्दा ती होत असते. मागच्या सहा महिन्या पासून आपल्याकडे तणनाशक फवारायचे आणि ऊन पडल की ते संपुर्ण गवत जळून जायचे, झुडप सुध्दा जळून जायचे सहा महिने झाले त्या तणनाशकाचा पत्ता नाही. लोकांची काम कशी करायची ? लोक वाढवून उपयोग काय ? तुम्ही लोक वाढवताय, तुम्ही मिटींग घेता पाच-पाच, सहा-सहा तास, नऊ-नऊ दहा-दहा वाजेपर्यंत मिटींग घेता आणि तुमच्या समोर पेपर येतात, त्याच्यावर सर्व आकडे येतात. तुम्हांला वाटतय आपण मिटींग घेतली ती बरंच झाल आपल्या लक्षात तरी आल की काम काय काय चालतय परंतु काम झिरो आहे. कारण मधली जी फळी आहे ती कामच करत नाही त्यामुळे लोकांपर्यंत ते कामच पोहचत नाही. काम होतात का नाही ते तुम्ही ज्या ठिकाणी आवश्यक आहे त्या ठिकाणी पाहायला पाहिजे. सर्व नागरीकांनाही आवाहन करायच आहे आणि सर्व सन्मा.सदस्यांनाही आवाहन करायचे आहे की काही काही ठिकाणी कर्मचारी जातात त्याठिकाणी लोक म्हणतात आमच्या घरात यायचे नाही, आमच्या घरात अजीबात चेक करायचे नाही. परंतु तुझ्या घरात असलेला डास तुला जरी चावला नाहीतरी तो आजुबाजूच्या नागरीकांना सुध्दा चावू शकतो आणि म्हणून आपण सर्वानी सहकार्य केले पाहिजे प्रत्येकांनी ही बाब आपण आपल्या लोकांच्या नजरेला आणून दिलीतर बरे होईल. माझ्या वॉर्डामध्ये झोपडपट्टीमध्ये डेंग्यू होत नाही असे सांगत होतो परंतु मोरयानगरमध्ये तीन पेशंट आढळून आलेले आहेत त्याठिकाणी भंगाराच्या दुकानांच्या आसपास डेंग्यूचे पेशंट आढळून आले आहेत हे लक्षात घ्याव. उच्चभ्रू वस्तीमध्ये बरेचसे पेशंट आढळून आले. एसकेएफ कॉलनीमध्ये तीन पेशंट आढळून आले. पहिल्या टेस्टमध्ये प्लेटलेटस् कमी होतात असे सांगीतले आहे. डेंग्यूमध्ये फक्त तापच येतो असे नाही. परवा त्यांनी असं

सांगीतल की ज्यांचे हातपाय दुखू लागले, पोट दुखू लागले, सर्दि-पडस झालेले असेल त्यांनी सुध्दा डेंग्यूची टेस्ट करुन घ्यावी. लूज मोशन झालेतरी डेंग्यूचा प्रादुर्भाव असू शकतो असंही त्यांनी त्यावेळेस सांगीतलेले आहे म्हणजे डेंग्यूचे जे जंतू आहेत ते आता वेगवेगळया पध्दतीने आपला प्रभाव दाखवू लागलेले आहेत. त्यादृष्टीने जनजागृती करावी. प्रशासनाने ती केलेली असेल परंतु परत एकदा सांगते की शेवटच्या माणसापर्यंत ते प्रयत्न गेलेले नाहीत. आयुक्त साहेब तुम्ही माझ्या वॉर्डात आलात आणि चौका मधुन परत गेलात. तुम्हांला थोडस फिरवून दाखविल असतं, म्हणजे आपले लोक किती काम करतायेत ते, की तुम्हांला फक्त आकडेवारी दाखवतात हे कळल असतं. पुन्हा एकदा सर्व सन्मा.सदस्यांना, पिंपरी चिंचवडच्या नागरीकांना आवाहन करते हा आपण निर्माण केलेला रोग आहे. झोपडपट्टीतच नाहीतर उच्चभ्रू असतात तेथेही स्वच्छ पाण्यामध्ये होणारा हा डास आपण तयार करतो, आपल्या मुळे तयार होतो त्यामुळे सर्वांनी त्याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे एवढेच सांगते.

**मा.प्रशांत शितोळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरेतर बराचसा वेळ झालेला आहे. आपल्याच महापालिकेत नाहीतर राज्याच्या ब-याचशा महापालिकेत डेंग्यूने थैमान घातलेले आहे आणि भीतीचे वातावरण त्या त्या शहरामध्ये नाहीतर राज्यातच तयार झालेले आहे त्याची चर्चा झालेली आहे. खरंतर मला सूचवावस वाटतय की किती लोकांना झाला, किती गेले याबाबतीत आम्हांला माहिती घेण्यात इन्ट्रेस्ट नाही परंतु ती माहिती देण्याची वेळच येवू नये अशी प्रशासकीय व्यवस्था तूमच्याकडे असावी आस आमच मत आहे. तुम्ही बॅनर लावा, जाहिराती लावा, रिक्षा फिरवा. जाहिरात करायला काही आपल प्रसिध्दीच काम नाही. पण आपल्या शहरामध्ये त्या नागरीकामध्ये तेवढी जागृकता आपण का करु शकत नाहीत. आपण याबाबत जनजागृती का करु शकत नाहीत. झोपडपट्टीमधून याची जनजागृती करावी लागत नाही. केवळ गलिच्छ वस्त्या आहेत तेथेच करावी लागती का? अजीबात नाही. डेंग्यूचा प्रादुर्भाव चांगल्या ठिकाणाहूनच होतो ज्याठिकाणी स्वच्छ पाणी आहे त्याठिकाणी पाणी बदलले जात नाही अशाच ठिकाणी त्या डासांची आळी तयार होते आणि तेथून हा रोग तयार होतो. म्हणजे याचा अर्थ काय, जे सुशिक्षीत नागरीक आहे त्या नागरीकांना तो मॅसेज दयायला आपण कमी पडतो हे मात्र शंभर टक्के बरोबर आहे. ठरावीक तापमान मिळाल्यानंतरच हा डेंग्यूचा डास तयार होतो. पण त्याला पोषक तापमान मिळाल्यामुळे आपल्या शहरात या डेंग्यूच प्रमाण जरा जास्त आहे. आपण तापमानतर बदलू शकत नाहीत परंतू ज्याठिकाणी डासोत्पत्ती होते ती आपण शंभर टक्के कमी करु शकतो. त्याच्यावर चांगल नियंत्रण आपल्याला मिळवता येवू शकत असं मला वाटत. डॉ.रॉय यांनी माहिती दिली आहे. पॉझिटिव्ह निगेटिव्ह कोण आहे कोण नाही परंतु आम्हांला शासनाकडे हे रिपोर्ट पाठविण्याची वेळच यायला नाही पाहिजे, हे कशासाठी? का? आपली महानगरपालिका शासनाला ब-याच गोष्टीला बंधनकारक आहे. अमुक माहिती दया, तमुक माहिती दया. पण आपल्या शहरामध्ये

अशा गोष्टी झाल्या पाहिजेत की आपण साथीच्या रोगांना, केवळ डेंग्यू हाच एक विषय नाही आता भारत स्वच्छ अभियान सुरु झालेले आहे. अनेक लोकांमध्ये जागृकता झालेली आहे याचा अर्थ काय की तुम्ही फक्त खुले मैदान, गटार साफ करावे एवढेच नाही. पहिल्यांदा याची सुरवात आपण आपल्या घरापासून केली पाहिजे. याची जनजागृती केली पाहिजे. आम्हांला एक लक्षात येत की कुठल्याही परिस्थितीत अशा वेळी महापालिका जबाबदार नाही परंतु त्यावर तुम्ही कंट्रोल मिळविले नाहीतर त्याला मात्र शंभर टक्के महानगरपालिका जबाबदार आहे. सकाळचच उदाहरण मी तुम्हांला सांगतो मी आमच्या परिसरातील एका सर्वसामान्य नागरीकांच्या पाण्याच्या कनेक्शनसाठी मी फोन केलातर मीटर निरीक्षक यांनी सांगीतले माझी डेंग्यूच्या सर्व्हेक्षणासाठी नेमणुक झालेली आहे. तसचजर पाहिलतर दोन्ही अत्यावश्यक सेवा आहेत. आरोग्य विभागाच काम ती सुध्दा अत्यावश्यक सेवा आहे. पाणीपुरवठयामध्ये काही अडचणी आल्यातर ती सुध्दा अत्यावश्यक सेवा आहे. पाणीपुरवठयाच्या मीटर निरीक्षकास तुम्ही डेंग्यूच्या कामावर नेमणूक केली का तर त्याला सगळी घर माहिती असतात, गल्ल्या माहिती असतात, माणस ओळखत असतात म्हणून त्याची नेमणूक केली. परंतु हे कुठेना कुठेतरी अशाप्रकारे करण मला योग्य वाटत नाही. पाणीपुरवठा विभागातील कर्मचा-यांना लोकांच्या घरात जावून डेंगीची आळी तपासायला लावणार. याच्यामध्ये सामाजीक संस्थेचा सहभाग वाढवा. आताच सीमाताईनी सांगीतल आहे की जर ज्याच्या त्याच्या प्रभागात आम्हांला सुध्दा जबाबदारी दिलीतर त्याच्यावर नियंत्रण करायला सोप जाईल यात काही शंका नाही. आम्ही सुध्दा आमचे कार्यकर्ते घेवून जस निवडणूकीला फिरतो तसे आताही फिरू लोकांच्या जीवाची काळजी घ्यावी. याच्यामध्ये प्रादुर्भाव झालातर लहान लहान मुलांना जास्तीत जास्त धोका संभवतो. आपली प्रतीकार शक्ती जास्त असते. आपल्याला कदाचित या रोगापासून संरक्षण मिळू शकतं. परंतु लहान मुल आणि वयोवृध्द माणस असलेतर त्यांना जीव गमावल्या शिवाय गत्यंतर नाही. आणि हे होत असताना ब-याच गोष्टी आहेत, खाजगी रुग्णालयांनी त्यांचे दर वाढविले आहेत त्यांच्यावर नियंत्रण आणावे ते मात्र शंभर टक्के आपल्या हातामध्ये आहे. बुधराणी सारखे हॉस्पिटल आहे त्याठिकाणी सुध्दा लोक डेंग्यूमुळे मृत्यूमुखी झालेले आहेत ही त्यांच्यासाठी लाजीरवाणी गोष्ट आहे. पण आपल्या येथील जे जे मोठे हॉस्पिटल आहेत त्यांना सर्वांना जबाबदारी दिली पाहिजे की तुमची स्पेशालीटी म्हणून आपल्या शहरातून या डेंग्यूच्या बाबतीत एक सुध्दा घटना घडली नाही पाहिजे एका बाजूला आमच्या स्थायी समितीने ठराव करायचा की त्यांची सर्व फि रद्द करा आणि दुस-या बाजूला त्यांनी लोकांना लुटतच राहायचं हा शंभर टक्के विरोधाभास आहे. त्यांना चांगल्या सेवा पाहिजे आपण हॉस्पिटल वेस्ट जाळतो, त्यांच मटेरीअल आपण गोळा करतो परंतु ती आरोग्याला धोकादायक गोष्ट आहे म्हणून करतो. परंतु त्यांच सुध्दा कर्तव्य आहे की आपल्या शहरातील नागरीकांना चांगली सेवा देण्याची. त्यांनी जर महानगरपालिकेकडे मागण्या केल्यातर त्यांनीही

सेवा दिली पाहिजे. त्यांच्यावर जी बंधन घालायची ती घालावीत. एवढी कोटयावधी रुपयाचे हॉस्पिटल आपल्या येथे उभे करायचे, एकतरी हॉस्पिटल दहा बेडच्या आतमधील आहे का? सगळे हॉस्पिटल १०० बेडच्या पुढचे आहेत. डी.वाय.पाटील हॉस्पिटल, आपल वायसीएम हॉस्पिटल, बिर्ला हॉस्पिटल, निरामय हॉस्पिटल, एकही हॉस्पिटल १०० बेडच्या खालचे नाही. याचा अर्थ काय, ज्या ज्या ठिकाणी चांगली सुविधा आहे त्या ठिकाणीच मृत्यू झालेला आहे हे रेकॉर्डवर आहे. एखादा गरीब डॉक्टर असेलना, तो चांगला उपचार करतो. आताच सोनकांबळे ताईनी सांगीतले की किवीच फळ खाल्ल की प्लेटलेटस वाढतात, पपई खालल्यानी प्लेटलेटस वाढतात. हे सगळयांना माहिती झालेल आहे. परंतु त्याची तरी उपलब्धता आम्ही करु शकतो परंतु गरीब माणूस काय करील. बिर्ला हॉस्पिटलमध्ये बिस्कीट सुध्दा वर नेऊ दिले जात नाही, कदाचित त्यांचे नियम असतील. आपल्याला या रुग्णालयावर व डॉक्टरांवर बंधन ठेवले पाहिजेत. किमान संसर्गजन्य रोगावरतरी. प्रत्येक ठिकाणी राजीव गांधी जीवनदायी योजना लागू होत नाही. हे आम्हांलाही कळतं परंतु जसं आम्ही सांगीतल, सोनकांबळे ताईनी सांगीतल ठरावीक कालावधी पुर्वी केवळ या रोगासाठी जर तूमच्याकडे रुग्ण येत असेलतर केंद्रशासनाकडून या योजनेमध्ये थोडासा बदल केला पाहिजे. आपल्यासारख्या प्रशासकीय संस्था असतील, महानगरपालिका असेल, महाराष्ट्र शासन असेल त्यांनी केंद्रशासनाला कळवल पाहिजे. की अशाप्रकारचे साथीचे रोग जर शहरात आलेतर या साथीच्या रोगांना या योजनेमध्ये समाविष्ट करुन घ्यावे. हा रोग काही कोणाची आर्थीक परिस्थिती बघुन होत नाही. ऋषी कपूरला सुध्दा डेंग्यू झालेला आहे. तो कोणालाही होवू शकतो. त्यामुळे या योजनेचा समावेश आर्थीकदृष्टया सर्वानाच व्हावा आणि राजीव गांधी जीवनदायी योजनेमधून त्याचा लाभ मिळावा व त्यामधून पेशंटचे उपचार केले जावेत. अशाप्रकारची सर्व मागणी शासनाला, केंद्रशासनाला करावी अशी मी विनंती करतो. ज्या ज्या सूचना करण्यासारख्या आहेत त्या सर्व अंमलात आणण्याचा प्रयत्न करावा. आपण केवळ उत्तर देण्यासाठी बांधील नाहीतर प्रत्यक्ष कारवाई करण्यासाठी बांधील आहोत, आम्ही सुध्दा त्यामध्ये एक विश्वस्त म्हणून तूमच्या बरोबर राहणार आहेत. आम्हांला सहभागी करून घ्यावे. एवढच मी तुम्हांला या निमित्ताने सांगतो आणि थांबतो.

**मा.राजेंद्र काटे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सभागृह. गेल्या दोन तासापासून आपण सर्वजण अत्यंत महत्वाच्या विषयावर याठिकाणी चर्चा करतो, अनेक उपाययोजना सांगीतलेल्या आहेत. आता सांगीतले आहे की याच्यावर १५० ते २०० कर्मचारी नेमलेले आहेत. आपल्याला खरोखरच असे वाटते की, २० लाख लोकांचा परिसर आहे, एवढया लोकांचे कंट्रोल होणार का ? त्या लोकांचेही सहकार्य पाहिजे. चार लाख पॅंपलेट छापले आहेत ते खरोखरच वाटले गेले का? खरोखरच ही रोगराई थांबविण्याची आपली ईच्छा आहे का ? सहा महिन्यात पाहिलेले आहे की लोकसभा, विधानसभेच्या निवडणूका कशाप्रकारे लावल्या गेल्या त्यात किती प्रभावीपणे प्रसार

माध्यमाचा वापर केला गेला. किती लोकांच्या घरोघरी पक्ष पोहचला गेला, हे मी सांगायला नको कारण आपण सर्वानी डोळयानी पाहिल आहे. या उपाययोजना आपण चांगल्या कामासाठी पण करु शकतो नां. पँपलेट प्रत्येक घरामध्ये जाणार का? सर्व पेट्रोल पंपावर हजारो लोक येत असतात त्यांच्याशी संपर्क साधावा त्याठिकाणी बॅनर लावावेत, होर्डींग्ज लावावेत. यामुळे लोकांमध्ये प्रबोधन होईल. हे २० लाख लोकांपर्यंत पोहचवायचे असेलतर टिव्ही, रेडीओ हे माध्यम चांगले आहे. वर्तमानपत्रामधुन आपण जाहीर प्रकटन दिलेले आहे का ? या रोगावर आपण एवढा अवाढव्य खर्च करतो त्याचा पुढचा खर्च वाढविण्यापेक्षा सदर परिसरातील माध्यमावर खर्च केला असतातर बरे झाले असते. सुशिक्षीत लोकांना सुध्दा हा आजार कशामुळे होतो हे माहित नाही. चांगल्या प्रकारची जाहिरात याठिकाणी करावी. लोकांच्या जीवनाशी खेळणारा हा रोग आहे. ही संस्था लोकांच्यासाठीच केलेली आहे त्यामुळे लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी हे केलेतर चांगले होईल. त्यामुळे लोकाना चांगल ज्ञान मिळेल व त्यांच अज्ञान दुर होईल व त्यामुळे सर्व समाजाच सहकार्य आपल्याला याठिकाणी मिळेल, धन्यवाद.

**मा.सुमन नेटके** - मा.महापौर साहेब, आपण ब-याचवेळ डेंग्यूबद्दल चर्चा करतो पण मला एकच सांगायच आहे की डेंग्यूचे जे रुग्ण आहेत त्यासाठी सरकारी दवाखाना नाही, प्र.क्र.१८ माझा वॉर्ड आहे त्याठिकाणी सरकारी दवाखाना अजीबात नाही. जे काही रुग्ण आहेत ते प्रायव्हेट दवाखान्यामध्ये †डमीट होतात. त्यांची परिस्थिती नसताना त्यांना †डमीट व्हावे लागते. तीकडून निगडीला यायच तेथून संततुकारामनगरला व तेथून रिक्षा करुन वायसीएमला जायच एवढ करण्यासाठी १०० ते १५० रुपये खर्च होतो. हा खर्च खाजगी दवाखान्यामध्ये केलातर लवकरात लवकर बरे होईल अशी लोकांची भावना निर्माण झालेली आहे. अशा ठिकाणी मी एकच आपल्याला सूचना करु इच्छिते की, मोबाईल व्हॅन चालू केली की ज्यांची परिस्थिती बिलकूल सरकारी दवाखान्यामध्ये जाण्याची नाही व इतक्या लांब येणे जाणे करण्याची पण नाही त्याठिकाणी आपण मोबाईल व्हॅन चालू करुन रुग्णांची तपासणी करावी अशी विनंती करते.

**मा.अजीत गव्हाणे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह आणि पत्रकार मित्र. याठिकाणी आपण सगळयानाच डेंग्यूच्या महत्वाच्या विषयावर बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला मन:पुर्वक आभारी आहे. पिंपरी चिंचवड शहरात हा रोग खुप मोठया प्रमाणात पसरलेला आहे. अनेकवेळा यासंदर्भात आम्ही सूचना केलेल्या आहेत. आता जी आकडेवारी डॉ.रॉय यांनी सांगीतली किंवा गावडे साहेबांनी काय काय उपाययोजना केल्या हे सांगीतले. आकडेवारीवरती आमचा कोणाचा विश्वास नाही कारण पठाणताईनी सांगीतले त्यांच्या वॉर्डात दोन पेशंट गेलेले आहेत. आकडेवारीचा खेळ करत बसण्यापेक्षा आपल्या शहरातील डेंग्यू हद्दपार करायचा असेलतर आपल्याला याच्याकडे खुप गांभीर्याने पहावे लागेल. आपण या पध्दतीने हे काम केलतर मला वाटत नाही हा डेंग्यू आपल्या येथून जाईल. मागच्या दोन-चार

वर्षात आपण पाहिलेतर त्याच्या तुलनेमध्ये यावर्षी खुप मोठया प्रमाणात डेंग्यूचे पेशंट आपल्याला आढळून आलेले आहेत. आणि हे कशामुळे घडलेल आहे, हे कारण आमच्या महिला भगिनी, नगरसेवकांनी सुध्दा सांगीतल आहे की आपण एक टाईम पाणी केलेले आहे त्यामुळे लोकांची पाणी साठवण्याची वृत्ती. चांगल्या पाण्यात डेंग्यू होतो त्यामुळे हा वाढलेला आहे ती सुध्दा एक शक्यता नाकारता येत नाही. आपण जे लोक नेमलेले आहेत, एवढया कमी लोकांमध्ये एवढया मोठया लोकसंख्येला आपण पुरवू शकत नाहीत यामध्ये आपल्याला काय कराव लागेल, सोशल मिडीयाचा वापर शंभर टक्के करायला पाहिजे होता, तसेच यामध्ये या सर्व लोकांना सहभागी करुन घ्यायला पाहिजे होते. आपल्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये अनेक संघटना काम करतात, अनेक मंडळ काम करतात, महिला बचत गट आहेत या सगळयांची मिटींग आपण घ्यायला पाहिजे होती. आपल्या येथील महिला बाल कल्याण विभागाच्या माध्यमातून जर बचत गटाना बोलवल असतंतर नक्कीच महिलांनी त्याच्यामध्ये सहभाग घेतला असता. आता एका प्रभागात १ ते ४ कर्मचारी काम करतात हे कस शक्य आहे. त्या संपुर्ण प्रभागामधील लोकांपर्यंत ते पोहचवू शकत नाहीत व हे बिलकूल शक्य नाही. आपण सांगीतल, कागदावर जरी आकडे दिसत असलेतरी हे काम झाल नाही. चार लाख पँपलेट छापले कोणाच्या वॉर्डात गेले, माझ्या वॉर्डात एकही दिसले नाही. रिक्षा कुठेही फिरली नाही. त्यामुळे हे सगळ कागदावर आहे. मुळात आपण अशी भूमिका घेतली पाहिजे की पिंपरी चिंचवड शहर हे महाराष्ट्रातील, देशातील एक आदर्श शहर आहे. या शहरात सगळयात जास्त व चांगल डेंग्यूच्या संदर्भात जनजागृण झाल आणि भविष्यकाळामध्ये पिंपरी चिंचवड शहराच नाव घेतल पाहिजे. पिंपरी चिंचवड शहरात डेंग्यू होत नाही कारण तेथील लोक खुप चांगल्या पध्दतीन डेंग्यूच्या संदर्भात उपाययोजना करतात आणि प्रशासनाने चांगले काम केले अशाप्रकारची शाबासकी मिळाली पाहिजे. आणि अशाप्रकारच उद्दिष्ट ठेवून प्रशासनाने काम केल पाहिंजे त्याच्यामध्ये आम्ही सुध्दा नगरसेवक म्हणून नक्कीच सहभागी व्हायला तयार आहोत. या सगळया शहराच्या लोकसंख्येची जी काही भौगोलीकता आहे ती पाहिलीतर अत्यंत कमी प्रमाणात जाहिरातबाजी आपल्याकडे झालेली आहे. सोशल मिडीयाच्या माध्यमातून लोकसभा, विधानसभेच्या निवडणूकामध्ये आपण पाहिल, कशा पध्दतीने सगळ घडलेल आहे. त्या पध्दतीने आपण जर या डेंग्यूच्या संदर्भात उपाययोजना आखल्या असत्यातर आपल्याला खुप चांगले रिझल्ट यात मिळाले असते. अजूनही वेळ गेलेली नाही. आम्हांलाही कळतं की थंडी आली की आपोआप डेंग्यू जातो पण आपण पुढच्या वर्षीसाठी आता तयार राहिल पाहिजेत आणि त्यासाठी आपण उपाययोजना आखल्या पाहिजेत. सगळे कर्मचारी तुम्ही नेमले ते सगळे काम करणार नाहीत. कागदावर काम करतात परंतु प्रत्यक्ष जागेवर काम करत नाहीत त्यामुळे आपल्याला खुप बारकाईने या विषयामध्ये लक्ष घालावे लागेल आणि सगळया लोकांना याच्यामध्ये सहभागी कराव लागेल तरच हा प्रश्न मिटेल. नुसत आपण आता पुरत बघु

नकातर पुढच्या पाच दहा वर्षात आपल्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये डेंग्यूचा पेशंट होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. ज्याच्या घरात मृत्यू होतो त्या घरात त्याच गांभीर्य त्या कुटूंबाला माहित असत त्यामुळे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. काही कुटूंबाची आर्थीक परिस्थिती इतकी हालाखीची असते की ते दवाखान्याचा खर्च पे करु शकत नाहीत म्हणून अनेकांनी सूचना केलेल्या आहेत की डेंग्यूच्या पेशंटला आर्थीक मदत केली पाहिजे. ज्यांच्याकडे पैसे आहेत त्यांना मदत करु नका परंतु जी गरीब कुटूंब आहेत ज्या लोकांची परिस्थिती नाही त्यांच्यासाठी १०० टक्के पिंपरी चिंचवड महापालिकेनी आर्थीक मदत केली पाहिजे, त्यांचा मोफत उपचार केला पाहिजे आणि आपल्या वायसीएममध्ये आणि महानगरपालिकेच्या दवाखान्यामध्ये या लोकांचा उपचार झाला पाहिजे. डॉ. रॉय यांना आम्ही फोन करतो आमच्या वॉर्डातील पेशंट आहे, गरीब आहे त्याला जागा नाही वायसीएममध्ये, ते सुध्दा त्या पेशंटला जागा निर्माण करुन देण्याचा प्रयत्न करतात परंतु ती यंत्रणा कमी पडते. तरी गरीब पेशंटला महानगरपालिकेच्या वतीने आर्थीक मदत झाली पाहिजे अशा सूचना महापौर मॅडम आपण प्रशासनाला दयाव्यात आणि नागरीकांच्या दृष्टीने चांगला निर्णय घ्यावा अशाप्रकारची अपेक्षा व्यक्त करुन थांबतो.

**मा.स्वाती साने** - मा.महापौर साहेब, सर्व नगरसदस्य, अधिकारी वर्ग व पत्रकार. आयुक्त साहेब आपणही ती बातमी वाचली असेल की चिखली मध्ये सर्वात जास्त डेंग्यूचे रुग्ण. हे खरे आहे, त्याच कारण असं आहे की, पाणी साठवण्यामुळे डेंग्यू होतो. आमच्याकडे पाणी आज आलतर उदया येत का नाही तशी परिस्थिती आहे एक दिवसाआड पाणी येते. प्रत्येकाच्या घरोघरी ड्रम सापडतात त्या ड्रम मध्ये चार घर सोडली की पाचव्या घराच्या ड्रममध्ये आळया सापडतात परंतु पाणी चार ते आठ दिवस येत नसेलतर ते पाणी ओतून दयायला लोक तयार नसतात कारण आमच्याकडे पाणी टाईमलिमीटेड मध्ये येते, ऐरीयावाईज पाणी येते. आमच्याकडे कामगार वर्ग आहे त्यामुळे आज पाणी भरुन ठेवलेतर तेच पाणी उदयापर्यंत पुरवाव लागत. ज्याठिकाणी औषध फवारणी झाली त्याठिकाणी मच्छराचा पुर्णपणे नायनाट होत नाही व थोडया फार प्रमाणात सुध्दा नायनाट होत नाही. औषध कमी असते आणि पाणी जास्त असते. त्यांना पण लिमीटेशन आहे परंतु त्याच्याबद्दल आपण विचार केला पाहिजे. औषध पॉवरफुल वापरले पाहिजे. फ प्रभागामध्ये डेंग्यूच्या औषध फवारणीची गाडी फिरते त्याचे टेंडर संपले, हे त्याच्या अगोदरच अधिका-यांना समजायला नको का? त्याच टेंडर किती दिवसाच आहे किती नाही, त्याच प्रयोजन अगोदरच करायला पाहिजे. एक महीन्याच टेंडर आहे अस सांगीतल जात मग आम्ही काय उत्तर दयायच. लोक आम्हांला फोन करतात येथे धुराची गाडी बोलवावी म्हणून. औषध फवारणीची धुराची गाडी येत नाही. आपल्याकडे धुराची गाडी आहे का नाही हे बघण्याची अधिका-याची जबाबदारी आहे. त्याची तयारी अगोदरच केली पाहिजे. सर्वानी सांगीतले आमच्या प्रभागामध्ये पॅंपलेट वाटले नाही म्हणून परंतु आमच्या

प्रभागामध्ये पॅंपलेट वाटलेले आहेत आम्ही डेंग्यू अभियान राबविलेले आहेत. परंतु त्याच्यानंतरही काही फायदा नाही. त्याच्यानंतर आठ दिवसात बातमी आली की चिखलीमध्ये सर्वात जास्त डेंग्यूची लागण आहे.

**मा.संजय काटे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सभागृह. आता डेंग्यू बाबतीत चर्चा चालू आहे. प्रतिदीनी उपाययोजना करणे आवश्यक आहे आणि आपण ती करणार याबद्दल शंका नाही. शहरात डेंग्यू आहे आणि माझ्या वॉर्डात मलेरीयाची साथ चालू आहे स्वच्छ पाण्यात लोकांना डेंग्यू होतो पण माझ्या प्रभागामध्ये घाण पाण्यान मलेरीयाच प्रमाण वाढलेल आहे. त्याला कारणही तसच आहे की माझ्या प्रभागात ड्रेनेज साफ करण्यासाठी लोकांची, मशनरीची संख्या कमी आहे. पुणे महापालिके पासूनच्या ज्या ड्रेनेज लाईन आहेत त्या कधीही बदली झालेल्या नाहीत. त्यातल क्लिनींग होत नाही. त्याचप्रमाणे घनकचरा उचलण्यासाठी जी कर्मचारी संख्या आवश्यक आहे ती माझ्याकडे नाही. पुर्वी जी संख्या होती २०१२ साली तत्कालीन आयुक्तांनी पुर्वी जो आपल्याकडे कर्मचारी किती पाहीजे याचा क्रायटेरीया वापरला जायचा त्यात बदल केला आणि २०१२ साली त्यानी १०० घरामागे एक कर्मचारी असा नियम लावलेला आहे. परंतु काही ठिकाणी दहा एक्करामध्ये १०० घर आहेत. त्याठिकाणी एवढया कर्मचा-यामध्ये साफसफाई होणे शक्य नाही. जागेवर परिस्थिती पाहून कर्मचारी पुरवावेत नियमावलीप्रमाणे केलेतर आपल्याकडे आरोग्याच्या समस्या निश्चितच निर्माण होतील. त्यामुळे जागेवर परिस्थिती पाहून कर्मचारी संख्या पुरवावी माझ्या प्रभागात कर्मचारी खुप कमी आहेत आपण त्यामध्ये तातडीने लक्ष घालावे. त्याचप्रमाणे मागच्या महिन्यात काही कार्यक्रमासाठी दापोडी येथील महापालिकेच्या शाळेत गेलो त्याठिकाणी शेजारी एक वस्ती आहे त्या वस्तीच्या टॉयलेटची लाईन महापालिकेच्या शाळेच्या टॉयलेटला जोडलेली होती. त्याठिकाणी इतकी दुर्गंधी पसरलेली होती. त्याठिकाणी आपण स्वत: समक्ष पाहणी करुन नवीन लाईन टाकावी कारण त्याठिकाणच्या विदयार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न आहे. त्याचप्रमाणे माझ्या प्रभागात रेल्वेच्या बाजूला महानगरपालिकेच्या वतीने टॉयलेट ब्लॉक बांधलेणेत आलेला आहे, २००७-०८ साली तो टॉयलेट ब्लॉक बांधलेला आहे. अंतर्गत काम त्याठिकाणी राहिलेले आहेत. त्या टॉयलेट ब्लॉकचा कब्जा खाजगी गणेश मंडळाने घेतलेला आहे. ही बाब मी तत्कालीन आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. परंतु ते काम करणेतर दुरच परंतु आणखीन वेगळाच प्रकार तेथे झाला हा खर्च कोणी केला, का केला, हे बांधलेच कसे त्याच्यावर ॲक्शन घ्या असं चालू झाल. परंतु असे न होता लोकांची गरज बघितली पाहिजे. ते टॉयलेट ब्लॉक ताबडतोब नागरीकांसाठी खुले करण्यात यावे अशी मी विनंती करतो. आणि आता आमचे मित्र धनंजय आल्हाट यांनी सूचना मांडलेली आहे की पुणे महानगरपालिकेचा कचरा आपल्या महानगरपालिका हद्दीत येतोय तो येवू देवू नये त्यांच्या सूचनेस मी समर्थन देतो आणि सर्व

सभागृहाने त्याना साथ दयावी आणि तो कचरा आपल्या महापालिका हद्दीत येवू नये यासाठी प्रयत्न करावा.

**मा.कैलासभाऊ थोपटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, पत्रकार बंधुनो. आपल्या पिंपरी चिंचवड शहरात डेंग्यूने थैमान मांडलेले आहे आमचे ज्येष्ठ सहकारी कुमार साहेब यांनी खुप महत्वाचा विषय मांडलेला आहे. आमच्या परिसरात डेंग्यूचे बरेचसे पेशंट आढळून आले आहेत. त्याबाबतीत आरोग्य अधिका-यांशी चर्चा केली, आताच बरीचशी माहिती गावडे साहेबांनी दिलेली आहे. परंतु जी माहिती दिली तशी प्रत्यक्षात जागेवरती यंत्रणा काहीच नाही. आता सांगीतले फॉगिंगच्या ३ गाडया आहेत. स्वातीताईनी सांगीतले एक महिन्यापासून त्याच टेंडरच संपलेले आहे म्हणजे आपण चुकिची माहिती देवून दिशाभूल करता. आमच्या प्रभागामध्ये फॉगिंगची गाडी दोन-तीन महिन्यापासून आलेली नाही. मी अधिका-यांना विचारलतर अधिकारी म्हणतात त्याच टेंडर संपलेल आहे. त्याच टेंडर आता उपलब्ध नाही त्यामुळे गाडया येवू शकणार नाहीत स्प्रेसाठी आताच गावडे साहेबांनी सांगीतले की, १६५ कर्मचारी स्प्रे साठी आपण उपलब्ध केलेले आहेत. प्रत्यक्षात वॉर्डामध्ये स्प्रे मारण्यासाठी कर्मचारी पाठवावे असे अधिका-यांना सांगीतलेतर, असं सांगीतल जात की स्प्रेसाठीचे जे कर्मचारी आहेत ते सर्व्हेसाठी गेलेले आहेत. असे असेलतर आपली काय यंत्रणा आहे. हे सर्व आपण कागदावरच राबवतो असे दिसते परंतु प्रत्यक्षात त्याची काहीही अंमलबजावणी होत नाही, आयुक्त साहेब तुम्ही याकडे गांभीर्यान लक्ष दयावे. आज प्रभागामध्ये फिरत असताना कोणत्याही कॉलनीमध्ये गेलो आणि तेथे डेंग्यूचा पेशंट आढळून आला नाही असे झालेले नाही प्रत्येक कॉलनीमध्ये डेंग्यूचे पेशंट आढळतात. त्याला कारणीभूत आपल्याकडे जी यंत्रणा आहे ती ढिसाळ यंत्रणा आहे. प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होत नाही. त्याठिकाणी कर्मचारी काम करत नाहीत, त्याठिकाणी कर्मचारी उपलब्ध होत नाहीत त्यामुळे हे सर्व घडत आहे. महत्वाचा विषय आमच्या परिसराचा सांगायचा आहे तो म्हणजे आमच्या परिसरामध्ये मध्यवस्ती मधून नाला गेलेला आहे. महानगरपालिकेनी चार वर्षापुर्वी तो नाला बांधलेला आहे, तो अशा पध्दतीने बांधलेला आहे की त्या नाल्याला दोन्ही बाजूने भींती आहेत व मधे ग्राऊंडला कॉंक्रिट वगैरे काही केलेल नाही. अनेकवेळेला याबाबत अधिका-यांना बोललो पण अधिका-यांनी अशी उत्तर दिली की जेएनएनयुआरएम अंतर्गत तो नाला बांधलेला आहे त्यामुळे त्या नाल्याला त्याच्यामध्ये काही कॉंक्रिटींग करता येत नाही आज त्या नाल्याच्या परिसरामध्ये गेलो तर त्या नाल्याचा वास ५०० फुटापर्यंत येतो. ड्रेनेजलाईन त्या नाल्याच्या कडेनी गेलेल्या आहे. त्या ड्रेनेजच्या लाईन जर चोकअप झाल्यातर कर्मचारी काय करतात त्याच चोकअप मिळाल नाहीतर ते कर्मचारी पहिल्यांदा त्या चेंबरला बोळ पाडतात व त्या ओपन नाल्यामधुन ते सर्व ड्रेनेजचे पाणी सोडतात. इतक आरोग्याच्या दृष्टीकोनातून घातक ठरलेल आहे की कालच आमच्या कॉलनीमध्ये फिरत असताना तेथील नागरीकांनी सांगीतले की या वासामुळे घरामधला

प्रत्येक माणुस आजारी पडलेला आहे इतकी बिकट अवस्था त्या परिसरामध्ये झालेली आहे. आता बरेच सहकारी बोलले आहे तरी आयुक्त साहेब याकडे गांभीर्याने लक्ष देवून या ज्या अडचणी आहेत त्या तात्काळ सोडवाव्यात अशी मी विनंती करतो.

**मा.नितीन काळजे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सर्व नगरसेवक. डेंग्यू विषय चालू असताना धुराच्या गाडया सर्व प्रभागामध्ये फिरतात. धुराच्या गाडया आपण मागविल्यातर त्यावेळेस सांगीतल जात की टेंडर संपले आहे हा तर विषय आहेच. परंतु ज्यावेळेस आरोग्य अधिका-यांना विचारले या धुरांच्या गाडयाचा काही उपयोग होतो का? तर मला असं समजल की तो धुर जर सोडलातर तो धुर घरामध्ये गेल्यानंतर पंधरा मिनीटे ते घर बंद ठेवावे लागते तरच त्या धुराचा उपयोग होतो. मलातर असे समजले की त्या धुराचा काहीच उपयोग होत नाही, असं त्या अधिका-याच उत्तर आलेल आहे. मग तो धुर कशासाठी मारायचा फक्त नागरीकांच्या समाधानासाठी मारायचा का? सगळीकडे गाडया जात नाहीत परंतु एका वस्तीमध्ये मारल्यानंतर दुस-या वस्तीमध्ये पंधरा दिवसानी मारले जाते त्यामुळे नागरीकांमध्ये नाराजी पसरली जाते. त्याचा उपयोग होत नसेलतर तसे नागरीकांना पटवून दयावे की या धुराचा उपयोग होत नाही. जर त्याचा उपयोग होत नसेलतर ती गाडी बंद करावी. कारण की तूमचे अधिकारीच सांगतात की याचा उपयोग होत नाही. आपण जे औषध मारतो ते सोसायटीमध्ये मारायला सांगीतलेतर ते म्हणतात आम्हांला सोसायटीमध्ये मारायला परवानगी नाही. का परवानगी नाही, डेंग्यू बाहेरच होतो का? सोसायटीमध्ये होत नाही का? तरी माझी अशी विनंती आहे सोसायटीचे नागरीक सुध्दा आपला आरोग्य कर भरतात, टॅक्स भरतात, ते सर्व महापालिकेचे कर भरतात त्याठिकाणी सुध्दा औषध मारावे. तसेच आपण साफसफाईच्या बाबतीत ज्या संस्था लावलेल्या आहेत त्या लोकसंख्ये प्रमाणे लावलेल्या आहेत. माझी अशी विनंती आहे की माझ्या प्रभागामध्ये ८ हजार लोकवस्ती आहे त्याठिकाणी दोन संस्था आहेत त्या काय पुरणार आहेत. लोकसंख्येचा क्रायटेरीया न पकडता ऐरीयावाईज साफसफाईसाठी लोक दयावीत ही विनंती आहे एवढ बोलून मी थांबतो.

**मा.अजय सायकर** - मा.महापौर साहेब, सन्मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह व पत्रकार बंधु खरेतर डेंग्यू या विषयावर आडीच तास झाले चर्चा चालू आहे. मी ब-याच वेळा ऐकत होतो, मी नेहमीच आपल्या सभागृहात जीबी.ला हजर असतो. आम्हांला सुरवातीला वाटायचे की आपण नवीन नगरसदस्य आहोत ज्येष्ठ सदस्य कसे बोलतात, काय बोलतात ते मी जातीने ऐकण्याचा प्रयत्न करायचो. बराचवेळ झाले मी ऐकतो याठिकाणी चर्चा होते परंतु त्याच्यावर सोल्यूशन काहीच निघत नाही. आयुक्त साहेब आपण जॉईन झालात मी पेपरला वाचल तुमचा फोटोही पाहिला. त्यावेळेस आपण स्वच्छता विषयावर गांभीर्याने घेतले होते. स्वत: हॅण्डग्लोज घालून कचरा उचलतानाचे फोटो आलेले आहेत. तुम्ही जेवढया गांभीर्याने घेतले तेवढे आरोग्य विभागाच्या अधिका-यांनी घेतलेले नाही अस आम्हांला जाणवते, असं आम्हांला वाटत. मला

पुर्नानगरमधुन फोन आला की आमच्या सोसायटीमध्ये डेंग्यू आढळून आलेला आहे त्यावेळेस मी संबंधीत अधिका-यास फोन केला आणि त्यांना सांगीतल की अशा अशा ठिकाणी डेंग्यू आढळून आलेला आहे त्याठिकाणी फवारणी करावी. आणि त्या व्यक्तीचा मी फोन नंबरही दिला परंतु नंतर एक तासाने त्याच व्यक्तीचा मला फोन आला की आपल्या संबंधीत अधिका-यांचा फोन सुध्दा आलेला नाही तुम्ही मला त्यांचा नंबर दया मी त्यांच्याशी कॉन्टॅक्ट करतो आपल्या अधिका-यांना मी फोन नंबरही दिलेला होता आणि तुम्ही जावून त्याठिकाणी भेटून या असंही सांगीतल होत परंतु आपल कोणीही त्याठिकाणी गेल नाही. हे काय चालले आहे आडीच तास झाले आपण चर्चा करतो आहे यावर काहीतरी सोल्यूशन निघणार का असं आम्हांला कधी कधी वाटतय. का फक्त यावर चर्चाच होणार आहे. ज्येष्ठ नगरसदस्यांनी चांगल्या सूचना सांगीतलेल्या आहेत त्या खरोखरच झाल्या पाहिजेत. नाहीतर नुसती चर्चा होणार परत पुढच्या महिन्यात याच विषयावर चर्चा होणार आणि काहीच सोल्यूशन निघणार नाही. यावर लक्ष दयावे. आपल्या अधिका-यांना सांगावे यावर गांभीर्याने घ्यावे एवढेच सांगतो.

**किरण मोटे** - मा.महापौर साहेब, सन्मा.आयुक्त, सन्मा.सभागृह. डेंग्यू या विषयावर भरपूर चर्चा झालेली आहे. मला दुस-या एका गोष्टीकडे लक्ष वेधायच आहे. आरोग्याच्या दृष्टिकोनातून, परत मलेरीयाची साथ येईल त्यादृष्टिकोनातून तयारी ठेवली पाहिजे. त्याचाच एक भाग म्हणून आपल्या निदर्शनास मी एक गोष्ट आणून देतो, कासारवाडीसारख्या प्रभाग क्र. ६३ मध्ये मिश्र स्वरुपाची लोकवस्ती आहे. दापोडी, फुगेवाडी, कासारवाडी अशा दाट वस्तीच्या ठिकाणी वीस-वीस वर्षे झाले भुमिगत गटार आहेत ते गटार चेंज केले जात नाहीत, त्यावेळेस कमी लोक वस्ती असल्यामुळे त्याची कपॅसिटी कमी असणार. फक्त दुरुस्ती केली जाते. म्हणजे स्वच्छ पाण्यामध्ये डेंग्यू होतो म्हणून या गोष्टीकडे दुर्लक्ष केले नाही पाहिजे महत्वाच म्हणजे या बजेटमध्येतरी दाटवस्तीच्या ठिकाणी गटारावर, रिपेअरींगवर आणि नव्याने गटार टाकण्यावर जास्त तरतूद केली पाहिजे जेणेकरुन आपल्याला इतर समस्यांना सामोरे जाव लागणार नाही याकडे लक्ष दयावे.

**मा.राजेंद्र जगताप** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, पत्रकार बंधु. कुमार साहेबांनी डेंग्यू विषयी चर्चा सुरु केलेली आहे. यावर ब-याचशा सदस्यांनी चर्चा केलेली आहे. प्रभाग क्र. ५७ हा शहरातील मोठा असणारा प्रभाग तो ४० ते ४५ हजार लोकसंख्येचा प्रभाग आहे. तेथे आपल्या माध्यमिक आणि प्राथमिक अशा दोन्ही शाळा आहेत. एका माध्यमिक शाळेमध्ये ८५० विदयार्थी आहेत व प्राथमिक शाळेमध्ये १३०० विदयार्थी आहेत. दोन्ही शाळेमध्ये पाहिलेतर दोन-दोनच ठेकेदाराचे कर्मचारी सफाईसाठी आहेत. त्याठिकाणी २००० ते २१०० एवढे मुल असताना एवढया कमी कामगारांमध्ये त्याठिकाणची साफसफाई कशी होणार हा विचार केला पाहिजे. शहरामध्ये आमचा एवढा मोठा प्रभाग असताना ठेकेदारांचे ३४ कर्मचारी आहेत आणि आपल्या महापालिकेचे २० कर्मचारी आहेत तो प्रभाग ४५ हजार

लोकावस्तीचा आहे. १२०० ते १५०० स्क्वे.कि.मी.चा ऐरीया आहे, सोसायटया आहेत एवढया मोठया असताना सुध्दा त्या परीसरामध्ये कर्मचारी कमी आहेत, आपल्या महानगरपालिकेचे काही कर्मचारी आजारी असतात. आपला भाग स्वच्छ राहिला पाहिजे. कचराकुंडया उचलल्या पाहिजेत. आपण प्रभागामध्ये मिटींग झाली त्यात सांगीतले कुंडीविरहीत प्रभाग करणार परंतु तसे काही झालेले नाही. ज्याठिकाणी कचराकुंडी नाही त्याठिकाणी रस्त्यावर कचरा पडलेला असतो. सुपरवायझर एकच असतात एवढया मोठया प्रभागामध्ये त्यांना दोन-दोन प्रभाग सांभाळण्यासाठी देतात त्यांची कपॅसिटी नाही. आरोग्याधिकारी असतील, वैदयकीय अधिकारी असतील त्यांच्यासाठी मिटींग लावलीतर साफसफाईचा कारभार व्यवस्थित होईल. माझ्या माहिती प्रमाणे आपण बिल्डर्सची मिटींग लावली आहे, डेंग्यूचा आणि बिल्डर्सचा एवढा विषय महत्वाचा नाही. वैदयकीय अधिकारी, आरोग्याधिकारी त्यांची मिटींग लावायला पाहिजे होती. सर्व प्रभागामध्ये मिटींग लावायला पाहिजे होती व त्याठिकाणी आपण प्रश्न विचारायला पाहिजे होते. पिंपरी चिंचवड शहरामध्ये पाहिलतर प्रायव्हेट हॉस्पिटल भरपूर आहेत. त्याठिकाणी वायसीएमचे डॉक्टर्स असतील त्यांना प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये चेकींग करण्यासाठी पाठविले पाहीजेत. प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये घाण असते त्याठिकाणी आरोग्याच लक्ष नाही तेथे आपण लक्ष दिले पाहिजे. एवढया मोठया शहरामध्ये या शहराला बेस्ट सिटी ऍवॉर्ड सुध्दा मिळालेला आहे. आपण याठिकाणी आल्यानंतर चांगल्या पध्दतीने सुरवात केलेली होती. परंतु आता कमी झालेली आहे. आमच्या परिसराला पवनेचा वेढा आहे. पवना नदी चिंचवड पासून, थेरगांवपासून ते सांगवीपर्यंत पवना नदीमध्ये जलपर्णी आहे. ठेकेदाराना त्यातील जलपर्णी काढण्याचे टेंडर आपण देत असतो परंतु तो ठेकेदार पावसाळयाची वाट बघत असतो. तोपर्यंत सुरवात होत नाही. तरी त्याठिकाणी आपण लक्ष दिले पाहिजे. नदी कायमस्वरुपी स्वच्छ करायची असेलतर आपण टेंडर काढलेल आहे. परंतु आजही त्याठिकाणी गेलोतर जलपर्णी आपण तेथे पाहतोय. त्याठिकाणी ड्रेनेजचे पाणी नदीमध्ये जाते कारण आपण ज्या ड्रेनेजच्या लाईन टाकलेल्या आहेत त्या लाईन सगळया फुटलेल्या आहेत त्यामुळे पाणी दुषीत होते अशा पध्दतीने चाललेले आहे. डेंग्यूमध्ये आपण जास्तीत जास्त लक्ष घालून स्वच्छ शहर ठेवून डेंग्यूचा नायनाट केला पाहिजे. औंध हॉस्पिटल जवळ जवळ ४०० बेडचे आहे. मा.आमदारांनी त्याठिकाणी २० कोटी रु. खर्च करुन ते हॉस्पिटल चांगल्या पध्दतीने केलेले आहे. आपण आपल्या माध्यमातून शासनाला पत्रव्यवहार करावा त्याठिकाणी १०० सुध्दा पेशंट नसतात. कालचं एक उदाहरण सांगायच आहे की, माझ्याकडे एक पेशंट आला तो पिंपरी चिंचवड मधील पेशंट होता त्यांनी मला सांगीतले की तुम्हांला १२.३० वाजता डीस्चार्ज दयायचा आहे. कारण त्याला तेथील डॉक्टरानी सांगीतल की, तुम्ही व्यवस्थीत आहात म्हणून त्याला घरी पाठविले. तो वायसीएमला जागा उपलब्ध नाही म्हणून शेजारच्या डी.वाय.पाटील मध्ये गेलातर तेथे त्याच्या बॉडीमधुन १५ ली. पाणी काढलेले आहे. अशी परिस्थिती असताना त्या हॉस्पिटलमधुन

त्याला घरी पाठविल जात. तरी आपण शासनाला पत्रव्यवहार करुन वायसीएमला जागा पुरत नाही म्हणून औंध रुग्णालय आपल्या ताब्यात घेतलेतर शहरातील पेशंट तेथे जातील आणि व्यवस्थाही चांगली होईल. तरी अशाप्रकारे आपण त्याचा विचार करुन शासनाला कळवाव. आमदारांचीही काही मदत लागलीतर त्यांचीही मदत घेवून औंध रुग्णालय आपल्याकडे घ्याव तेथील कर्मचारी, डॉक्टर्स असतील ते सुध्दा आपल्याकडे वर्ग केलेतर बरे होईल तिथले कर्मचारी दिवसभर आराम करत असतात व पेशंटला अशा पध्दतीनं पळवल जातं. जर आपण तेथे व्हिजीट दिलीतर ५०-१०० सुध्दा पेशंट नसतात. २० कोटी खर्च करुन ते हॉस्पिटल रुबी, जहांगीरसारखे केलेले आहे त्याठिकाणी अशी परिस्थिती आहे. त्याठिकाणची चांगली प्रगती व्हावी असे तेथील डॉक्टराना वाटत नाही. औंध रुग्णालय कमीत कमी चिंचवड, भोसरी, पिंपरी मतदार संघ असेल तेथील पेशंट त्याठकाणी शिफ्ट होऊ शकतात. कारण आपल्या हॉस्पिटलला जागा नसते तरी हा प्रयत्न करावा एवढच मी सांगतो.

**मा.बाबासाहेब धुमाळ** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, गेली आडीच तीन तास आपण डेंग्यूसारख्या महाभंयकर आजारावर चर्चा केली. संपुर्ण सदस्यानी आपल्या व्यथा मांडल्या त्या व्यथा मांडत असताना यावर आढावा घेतला व या वर्षी आपण काय नियोजन केले याची चर्चा केलेली आहे. पठाणताई मला आठवतयं की, कोंडे साहेबांची आता मला आठवण झाली, कारण असे आजार झाले की अति.आयुक्त म्हणून कोंडे साहेबांनी कुठलेही नियोजन केले नसलेतरी फक्त अधिका-यांना फोन करायचे आणि कामाला लावायचे. पण याठिकाणी तशी परिस्थिती नाही. आयुक्त साहेब आपण या कॉर्पोरेशनला दोन दिवस सुट्टी दया आम्ही सर्व नगरसेवक तुमच्या बरोबर येतो आणि प्रत्येक ठिकाणी जावून पँपलेट वाटा किंवा इतर भोंगे लावा, रिक्षा लावा, हे करण्यापेक्षा आपण स्वत: गेलो असतो, रॅली काढून, आमचे शंभर दिडशे लोक, आमचा सगळा परिवार, तर याठिकाणी आपल्याला ख-या अर्थाने या डेंग्यूचे नियोजन करता आल असतं. लोकांना सुज्ञ करता आल असतं. त्यामुळे लोकांना माहिती झाली असती. मला असं म्हणायच आहे की, माझा मुलगा मित्राला भेटण्यासाठी वाल्हेकरवाडीत गेला तो फ्रान्सहून भेटायला आला होता. त्याला सांगीतले होते तू जाऊ नकोस डेंग्यूची साथ चालू आहे तरी तो तसाच गेला आणि तेथे त्याला मच्छर चावला. संध्याकाळी त्याला थोडासा ताप आला दुस-या दिवशी आम्ही त्याची तपासणी केली. आयुक्तांना सांगीतले असे असे घडलेल आहेतर त्यांनी लगेच त्याठिकाणी गाडी पाठविली. वाल्हेकरवाडीचे रुग्ण ते ज्या हॉस्पिटलमध्ये †डमीट होते त्याठिकाणी माझाही मुलगा †डमीट होता. सांगायचे तात्पर्य म्हणजे आपण या विषयी अधिका-यांना वेळोवेळी सूचना दिल्या असत्यातर हा डेंग्यूचा प्रादुर्भाव थांबला असता आरोग्य, वैदयकीय अधिकारी काम करीत असतील परंतु कामाचे नियोजन करणे हे काळाची गरज आहे. अति.आयुक्त येथे बसलेले आहेत, अति. आयुक्तांना फक्त शिक्षण मंडळाचे काम दिलेले आहे का ? बाकी कुठल काम दिल नाही का ? त्यांना हे काम दयावे. अतिरीक्त काम देण्यासाठी

त्यांची पोस्ट निर्माण केलेली आहे. केवळ खुर्च्या टाकून बसण्यासाठी किंवा मिटींगा घेण्यासाठी ही पोस्ट केलेली नाही. अतिरीक्त आयुक्तांच काम काय आहे हे आम्हांला सांगा. आम्ही तुम्हांला कितीवेळा भेटायच, तुमच्याकडे आल की कायम लोक बसलेले असतात. अतिरीक्त आयुक्त म्हणून ज्यावेळेस याठिकाणी पोस्ट क्रिएट केली जाते त्यावेळेला त्या पोस्टला काम देणे गरजेच आहे. हे इमर्जन्सी काम असते, काही घडल. प्लेगची साथ असते, मलेरीयाची साथ असते, मलेरीयामध्ये कोणाला ताप येतो त्यावेळेस त्याला गोळया दिल्या जातात, त्याला सलाईन दिल जात तोपर्यंत तो जगतो पण हा डेंग्यू आहे, मीतर म्हणतो प्रत्येक अधिका-यांच्या घरात डेंग्यू व्हायला पाहिजे त्यावेळेला त्यांना कळेल, डेंग्यू काय असतो. आम्ही आठ दिवस नवरा-बायको झोपत नव्हतो, मुलाला रात्री दोन-दोन वाजता अशा पोटात कळा यायच्या, डोक दुखायचं एवढा तरुण मुलगा सुध्दा रडायचा. ही परिस्थिती तुम्ही पाहिली का ? ही परिस्थिती वैदयकीय अधिका-यांना माहिती का ? गावडेनी पाहिली का ? त्यांना काम दिले टेंडर खोलायचे, काय टेंडर खोलतात, कसले टेंडर खोलतात. त्यांना सुध्दा कामाला लावा नां. पगार घेतात त्यांना कामाला लावणे ही काळाची गरज आहे. ही कॉर्पोरेशन सुधारली पाहिजे. चार तास आम्ही याठिकाणी बोलतो आणि निघुन जातो. मी पहाटे फिरण्यासाठी जातो. अ प्रभागत हेगडेवार भवन तेथे पंधरा छोटया गाडया उभ्या आहेत त्याच कारण तुम्ही शोधलय का ? त्यांना टायर नाही. प्राधिकरणामध्ये एकच गाडी फिरते. ती सकाळी ८, ९ ,११ ,१२ यावेळेत येते. सगळया तेथे माशा घोंगतायेत आम्ही कुठे कचरा टाकायचा, कचरा टाकण्यासाठी गाडयाच शिल्लक नाही व त्या गाडया का उभ्या आहेत याची इन्क्वॉयरी करा. तेथे पंधरा गाडया का उभ्या आहेत हे अधिका-यांना विचारा. त्यांना फक्त टायर नाहीत म्हणून त्या उभ्या आहेत. आयुक्त साहेब, प्रशासन अधिकारी शिक्षण मंडळ यांनी काल मिटींग घेतली पेपरला आलेल आहे. मुख्याध्यापकांच्या सहया घेतल्या, १२५ मुख्याध्यापक त्याठिकाणी मिटींगला होते, प्रायव्हेट गोड जेवण त्या कॉन्ट्रॅक्टरनी दिलेले आहे, इकड माणस मरतात. गोड जेवण, मिठास जेवण दिलेल आहे. त्याठिकाणी प्रशासन अधिकारी यांनी सांगीतले की “मुख्यध्यापकांनो मिठाला जागा”, अरे वा, तुम्ही जागलात का मिठाला. तुम्ही मिठाला जागला नाहीत. मी मंगलाताईना मुद्दाम सांगतो, शिक्षणमंडळाला ९ कोटी लागणार होते, अजून बिल आलेली नव्हती ती बील आलेली नसताना सुध्दा त्याठिकाणी फक्त तोंडी आदेश चेअरमननी बाईना दिले आणि बाईनी अकौंटमधून ९ कोटी रुपये ट्रान्सफर केलेले आहेत. आणि आमच्या गाडयाला टायर मिळत नाही म्हणून त्या उभ्या आहेत हे दुर्दैव आहे. काय चालल आहे हे, काही तरी सुधारणा करावी, असं चालणार नाही. प्रशासन अधिकारी शिक्षण मंडळ यांना अगोदर सस्पेन्ड करा, ठेकेदाराची प्रायव्हेट मिटींग प्रभागामध्ये जावुन कशाला घेता. त्या बाईना वाटल नाही का डेंग्यून चार माणस मेली तेथे जाव, विचारपुस करावी म्हणून. अतिरीक्त आयुक्तांना कळाल नाही का मिटींग घेतात म्हणून. आयुक्त साहेब, हे सिरीअस मॅटर आहे. याठिकाणी आपण

सुज्ञपणाने काम करावं. फक्त एक विषय तुम्हांला सांगीतलेला आहे, कुठं काय घडत हे मी लेखी पत्र दिलेल आहे. डेंग्यूसाठी हा आपला वेगळा फंड असणे आवश्यक आहे तो १० कोटी करा. डेंग्यू बाबतीत किंवा इतर रोगाच्या बाबतीत १० कोटी फंड करावा. आम्ही तुम्हांला बोलणार नाहीत, कारण समाजासाठी काम करायच आहे, प्रत्येक नगरसेवकांनी येथे सूचना मांडलेल्या आहेत. कुणी सांगीतल आमच्याकडे धुराची गाडी आली नाही, कुणी सांगीतल आमच्याकडे औषध मारल नाही ही सत्य परिस्थिती आहे. याच्यावर नियंत्रण कोणाचही नाही. यासाठी स्वतंत्र माणूस नेमा आणि त्यांना कामाला लावा. अतिरीक्त आयुक्त मागे बसले आहेत, तुम्हांला सांगतो, अतिरीक्त आयुक्त आपण हे काम करा, चांगल काम दाखवा. डेंग्यूमुक्त पिंपरी चिंचवड भाग केलेला आहे असं दाखवून दया पुढच्या वेळेला आम्ही त्यांना हार घालू, जयहिन्द जय महाराष्ट्र.

**मा.शांताराम भालेकर** - मा.महापौर साहेब, सन्मा.आयुक्त, सन्मा.सहकारी सदस्य. डेंग्यूवर बोलत असताना प्रामुख्याने डेंग्यूने खऱ्या अर्थाने शहरात थैमान घातलेले आहे. आणि हे थैमान घातलेले असतांना खरंतर मगाशी सुलभाताईनी सांगीतले, शाळेतील विदयार्थी असेल, स्थानिक स्वराज्य संस्था असेल, जगताप यांनी पण सांगीतल बिल्डर्स असतील, हा डेंग्यूचा आजार कशा पध्दतीने आटोक्यात आणला पाहिजे याच्यासाठी आपण प्रामुख्याने काळजी घेतली पाहिजे. प्रामुख्याने याच्यावर मात करण्यासाठी शहरामध्ये आमचे सहकारी असतील, सर्व नगरसेवक, नगरसदस्या असतील प्रत्येकानी काळजी घेतली पाहिजे. शहरामध्ये रक्तांची गरज भासत असते त्यासाठी आपण समाजाच काहीतरी देण लागतो म्हणून रक्तदान शिबीर घेतले पाहिजे. प्लेटलेटस लागतात त्यासाठी रक्ताची गरज पडते. डेंग्यूचे आजार होतात त्यांना ख-या अर्थाने मदत करण्याचे काम आपण केले पाहिजे. रक्तदान शिबीराच्या माध्यमातून त्यांची सेवा केली पाहिजे. लोकही सुंदर राहिले पाहिजे, शहरही सुंदर राहिले पाहिजे. संपुर्ण देशामध्ये शहराला बेस्टसिटी पुरस्कार मिळालेला आहे. शहरामध्ये भरपूर औषध फवारु दयावे. शहरात डेंग्यूची भयानक परिस्थिती आहे, आपण ग्रामीण भागातील आहात, आपण शेतकरी आहात. यावर काहीतरी पर्याय शोधल्याशिवाय मार्ग निघणार नाही. डीडीटी पावडर शहराला वासाला सुध्दा मिळत नाही. या शहराला सुंदर सिटी पुरस्कार मिळाला सूंदर शहर झाल म्हणून त्या डीडीटीचा काही वास सुध्दा घ्यायचा नाही का. आहो, तो वास सुध्दा कधी कधी चांगला वाटतो. ब-याच दिवस झाल ते पावडर वासाला सुध्दा राहिलेले नाही डेंग्यू झालेला माणूस कमीत कमी एक वर्षभर तरी नीट होत नाही. त्याच्या पांढ-या पेशी कमी झाल्यानंतर त्याला एवढा त्रास होतो की त्याला विकनेसपणा येतो त्याला चालताना सुध्दा दम लागतो त्याला फिटनेस मध्ये येण्यासाठी कमीत कमी एक वर्षाचा कालावधी लागतो. माझ्या वॉर्डातील एक फौजी माणुस माझ्या गाडीवर ड्रायव्हर आहे तो मिलीटरीचा माणुस सुध्दा खडकी हॉस्पिटलमध्ये डेंग्यूने ॲडमीट आहे. कारण फौजी माणूस कधी आजारी पडत नाही पण या डेंग्यूच्या मच्छर मुळं

फौजी माणूस सुध्दा आजारी झालेला आहे. तरी आपण निश्चितपणे शहराची काळजी घ्यावी एवढेच सांगतो आणि थांबतो, धन्यवाद.

**मा. योगेश बहल** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व नगरसेवक, नगरसेविका, पत्रकार मित्र. आयुक्त साहेब मी आपले आणि आरोग्य खात्याचे, इतर विभागाचे पहिल्यांदा मी मनापासून आभार मानतो. काही प्रयत्न तुटपूंजे पडले असतील परंतु आपण प्रयत्नाची पराकाष्ठा केलेली आहे, यामध्ये काही त्रुटी झालेल्या असतील त्याबद्दलही ज्येष्ठ नगरसेवकांनी सादकबाधक चर्चा केलेली आहे त्यातून मला असं वाटतं की तुमच्या प्रयत्नातून नेमक काय कमी पडलय हे तुमच्या लक्षात आलेले असेल. गेली तीन तास या विषयावर आपण बोलतो. याच्यामध्ये ऍवरनेस प्रोग्राम जो आहे तो ऍवरनेस प्रोग्राम खुप महत्वाचा आहे. याठिकाणी काही चांगल्या सूचना केलेल्या आहेत. त्यामध्ये आपण आपल्या नगरपालिकेची शाळा, आणि प्रायव्हेट शाळा याचा पहिल्यांदा अंतर्भाव करावा. आणि ती एक क्लिपिंग आहे ती आपल्या आरोग्य खात्याकडून केलेली आहे. ती ४४ सेकंदाची क्लिपींग आहे ती पण तुम्ही पाहिलेली आहे. ती क्लिपींग तुम्ही सर्व नगरसेवकांना देण्याचा प्रबंध करावा. नगरसेवकांनी चांगल्या सूचना केल्या आहेत. परंतु ही तुमची, आमची, नागरीकांची सर्वांची सोशल रिस्पॉन्सिबीलीटी आहे की यातून मुक्त व्हायच असेलतर एकटे आयुक्त साहेब काही करु शकणार नाहीत, एकटे नगरसेवक काही करु शकणार नाहीत, एकटे कर्मचारी काही करु शकणार नाहीत त्या त्या परिसरातील त्या त्या नगरसेवकांची पण तीतकीच जबाबदारी आहे तीतकीच प्रशासनाची सुध्दा जबाबदारी आहे. माझी तुम्हांला विनंती आहे की तुम्ही पाच हजार हॅण्डबील त्यामध्ये कोणत्या गोष्टी, कोणत्या कंटेनमुळ हे होतं त्याच चित्र त्याला फुली मारुन असं दाखवायला पाहिजे की हे तुम्ही अवाईड करा, कशामुळे हे होतं हे त्यात दाखवा. व असे हॅण्डबील चांगल्या पध्दतीचा पेपर वापरलेले, कलरफुल पाच हजार हॅण्डबील तुम्ही प्रत्येक नगरसेवकांपर्यंत पोहचवा आणि ते प्रत्येक नगरसेवकांनी त्या भागातील त्यांचे कार्यकर्ते, त्यांचे बचतगट, त्यांचे गणेश मंडळ, त्यांचे ज्येष्ठ नागरीक आणि त्यांच्या लोकांना घेवून त्या त्या नगरसेवकांनी आपल्या वॉर्डामध्ये फिरुन आरोग्य खात्यातील लोकांबरोबर काम केलतर मला वाटत नाही की हा डेंग्यू राहील. टिका करणं सोप आहे, बोलन सोप आहे, कितीही कर्मचारी लावलेतरी असं होणार नाही. साधारणत: जून महिन्यापासून याची सुरवात होते आणि नोव्हेंबर महिन्या मध्ये थंडी पडेपर्यंत हे असतं. याच्या अगोदर जे तीन महिने आहेत एप्रिल, मे, जून या तीन महिन्यामध्ये ड्राईव्ह असला पाहिजे तो ड्राईव्ह कंटेनर ड्राईव्ह सर्व्हे असला पाहिजे. झाल्यानंतर त्यावर ईलाज करण्यापेक्षा आपण नेहमी म्हणतो की “प्रिव्हेन्शन ईज बेटर दॅन क्युअर” ही काळजी तीन महिन्यापासूनच घेतली पाहिजे. आरोग्य खात्याच्या इन्सपेक्टरनी अशा पध्दतीने ऍवरनेस तीन महिने अगोदर घ्यायला पाहिजे. डॉ.रॉय यांनी फिगर दिलेली आहे त्यामध्ये या वर्षी जास्त फिगर आहे. लोक पाण्याचा साठा करतात. साठा का करतात की पाणी मुबलक मिळत नाही

म्हणून करतात. संततुकारामनगरमध्ये, माझ्याच भागामध्ये एलआयजी परिसरा मध्ये एकाच घरामध्ये, सोनवणेच्या घरामध्ये तीन, वडील आणि दोन मुली, जाधवांच्या घरामध्ये दोन, त्यांची मिसेस आणि त्यांची मुलगी असे पेशंट आहेत. हे सर्व एलआयजीमधील होते कारण त्यांच्याकडे पाणी स्टोअरींगसाठी टाकी नाही. आणि वरच्या मजल्याला पाणी मिळत नाही. आम्ही सुध्दा स्वत: जावून त्यांना सांगीतले की हे पाणी फेकून दया तर ते म्हणतात आम्हांला पाणी आणून दया आम्ही फेकून देतो ही वस्तुस्थिती आहे. पाणी आपण प्रेशरने देवू शकत नाही म्हणून हा प्रॉब्लेम होतो लोक पाणी तीन-तीन, चार-चार दिवस ठेवतात आणि स्वच्छ पाण्यामध्ये हे होते, ताज्या पाण्यामध्ये हे होते हे आपल्यालाही माहिती आहे. त्यामुळे पाणी देण्याची जबाबदारी निश्चितच प्रशासनाची आहे. ही जबाबदारी आपण उचलली पाहिजेत. फॉगिगवाला का नाही आला, स्प्रेवाला का नाही आला, गाडीला चाक नाही बसले या गोष्टी ठिक आहे हे होत राहील. तुम्हांला चांगल्या पध्दतीने काम करता येईल, चांगल्या अधिका-यांवर तुम्हांला जबाबदारी देता येईल. आता धुमाळ साहेबांनी सांगीतले की अतिरीक्त आयुक्तांना ॲडीशनल जबाबदारी दया, आरोग्याच दया, गार्डनच दया, एज्यूकेशनच दया या चार- पाच डिपार्टमेंटची दयावी. तुमच्याकडे भरपुर काम आहे संपुर्ण शहराच काम आहे. शेवटी कंट्रोल आयुक्त साहेबांचे असेल. सर्व शाळांना सहभागी करुन घेवून क्लिपींग मुलांना दाखवली गेली पाहिजे कारण मुल पटकन शिकतात. प्रायव्हेट शाळेमधून सुध्दा ती क्लिपींग दाखवली गेली पाहिजे. आपल्या शहरामध्येही ती दाखवली गेली पाहिजे तसेच आपल्या सर्व नगरसेवकांनाही ती क्लिपींग व्हॉटस्†पवर देवून टाका. या शहरात केबल्स आहेत ते काही आम्हांला पैसे देत नाहीत, त्यांना सुध्दा यामध्ये सहभागी करुन घ्या. टाटा स्कायला विनंती करावी ही क्लिपींग लोकांना दाखवावी म्हणून. दोन-दोन मिनीटाची क्लिपींग दाखवलीतर प्रत्येकांच्या घरात टि.व्ही. असतो. दिवसातून दहा वेळेस अशा क्लिपींग झाल्यातर त्यामुळे आपल्याला डेंग्यू कंट्रोल होण्यास याची निश्चित मदत होईल. या दोन तीन गोष्टीचा यात अंतर्भाव करावा. लोकांना मुबलक पाणी मिळेल या गोष्टीकडे लक्ष दयावे. त्याचबरोबर त्या त्या भागातील सर्व नगरसेवकांना माझे विनंम्र आवाहन आहे की आपण आपल्या भागामधील गणेश मंडळ असतील, महिला संस्था असतील, बचतगट असतील, ज्येष्ठ नागरीक असतील, हेल्थ क्लब असतील, सामाजीक संस्था असतील याना बरोबर घेवून नगरसेवकांनी हे पाच हजार हॅण्डबील घरोघर पोहचविण्याचा प्रयत्न करावा असं विनंम्र आवाहन करतो. यामध्ये पत्रकारांनी सुध्दा त्या पध्दतीने पब्लिसीटी दयावी. सर्व बाजूने डेंग्यूवर कसा कंट्रोल करता येईल यादृष्टीने प्रयत्न करावेत. महापौर साहेब, मी आपल आणि सर्व नगरसेवकांच मनापासून आभार मानतो एका चांगल्या विषयावर कुमार साहेबांनी सुरवात केली आणि सर्वांनी त्यामध्ये सहभाग घेतला. परंतु हे सर्व कंट्रोल करण्याचे काम तुमच्याकडे आहे, आमची सुध्दा जबाबदारी आहे आम्ही फक्त तुम्हांला रिस्पॉन्सीबल धरत नाहीत आम्ही सुध्दा यामध्ये हातभार लावू, काम करु.

तुम्ही आम्हांला हॅण्डबील दया व हे छापल्यानंतर ते दोन-चार लोकांना तुम्ही दाखवा. जेणेकरुन त्यामध्ये आणखीन काही ॲड करता येईल. ते †ट्रॅक्टीव्ह असल पाहिजे लोकांनी ते हातात घेतल्यानंतर ते फेकू नये. त्यामध्ये अशा ओळी यायला पाहिजे की, आपण आपल्या मुलांचे सौरक्षण करा, आपल्या घरामध्ये डेंग्यू होणार नाही, आपल्या घरामध्ये घात होणार नाही, आपल्या घरामध्ये मृत्यू होणार नाही याची आपण काळजी घ्या अशाप्रकारचे वर्डींग घ्या जेणेकरुन ते वाचल्यानंतर लोकांनी काळजी घेतली पाहिजे. व हे सर्व इंग्रजी, मराठी, मध्ये प्रिन्ट करावे एवढे बोलून सर्वांचे मी आभार मानतो आणि थांबतो, जयहिन्द, जय महाराष्ट्र.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्वांनी चांगल्या सूचना केलेल्या आहेत. मला एकच सूचना करावीसी वाटते की, आज दहा तारीख आहे आकरा आणि बारा या दोन दिवसात सगळयांना सुचना देवून १३ ते १६ या चार दिवस सगळया शहरानी कोरडा दिवस म्हणून पाळावा. सर्व पेपरला दया, सगळीकडे बातमी दया. प्रत्येक आरोग्य विभागातील लोकांनी, सर्व शाळानी हे चार दिवस असे पाळायचे की ज्यावेळेला आपल्याकडे वीज फार कमी असते त्यावेळेला एक एक तास बंद करतो त्याप्रमाणे डेंग्यूसाठी हे चार दिवस शहरामध्ये अशी अनौन्समेंट करा की प्रत्येकांनी आपल्या घरामध्ये साठवलेले पाणी असेल, आजूबाजूच्या करवंटीमधल पाणी असेल, टायर मधल पाणी असेल ते सर्व स्वच्छ करण्याचे काम १३ ते १६ या चार दिवस करावे. आणि हे प्रसारमाध्यम असेल मग याच्यामध्ये मिडीयाचा सुध्दा फार मोठा वाटा असायला पाहिजे. सकाळ असेल, लोकमत असेल, लोकमत सखी मंच असेल आणि आपल कॉर्पोरेशन असेल, केबल असेल या सगळयांनी मिळून हे चार दिवस असे पाळा, पुर्वी या पध्दतीच नियोजन केल गेल होत. प्रत्येक घरोघरी हा दिवस पाळला पाहिजे असे आवाहन करावे. या चार दिवसात पाणी साठवता कामा नये. १३ ते १६ हे चार दिवस कोरडा दिवस म्हणून पाळावा. प्रत्येक नगरसेवकांनी त्यांच्या भागातील शाळामधून मुलांना घेवून रॅली काढून चार दिवस कोरडा दिवस पाळण्यासाठी प्रयत्न करावा. लागेल तेवढाच पाण्याचा साठा ठेवून बाकीच संपुर्ण पाणी जे आहे ते वापरु नये किंवा या दोन दिवसात पाण्याचा वापर करुन आपली भांडी पालथी घालावी. आजुबाजूला सर्व ठिकाणी सांगाव. त्याच पध्दतीने महापालिकेच्या कर्मचा-यांनी सुध्दा आपली गार्डन असतील, कुठे कारंजे असतील, कुठं पाण्याच्या टाक्या असतील त्या टाक्यांना झाकणं नसतील तेथे सुध्दा पाण्याचा साठा चार दिवस करु नये, कोरडा दिवस म्हणून पाळावा. अशी मी या प्रसंगी छोटी सूचना करते. शंभर टक्के अशी सूचना पाळलीतर शहरात चांगल्या पध्दतीने डेंग्यूवर कंट्रोल येईल अशा पध्दतीने आपण कराव यासाठी मी महापौरांना सुध्दा विनंती करते की आपण सुध्दा तशाप्रकारची अनौन्स्मेंट करावी जेणेकरुन हे चार दिवस पाळू शकू.

**मा.महापौर** - सदस्यांनी ज्या सूचना मांडलेल्या आहेत त्याबाबत आयुक्तांना आदेश देते की डेंग्यूवर जितक नियंत्रण आणता येईल तेवढे आणावे. जेवढया आता सूचना मांडलेल्या आहेत

त्याप्रमाणे जेवढे तुम्हांला करता येईल तेवढया उपाययोजना केल्या पाहिजेत. या चार दिवसामध्ये डेंग्यूवर कसे नियंत्रण आणता येईल ते आणावे ब-याचशा गोष्टी सदस्यांनी मांडलेल्या आहेत. त्याचा विचार करुन नियंत्रण करावे. पाण्याबद्दल सदस्यांनी सांगीतलेले आहे पाण्याची समस्या मांडलेली आहे. आयुक्त साहेबांना सूचना करते की, शहराला दोन वेळा पाणी दिले पाहिजे. कारण आता ती परिस्थिती राहिलेली नाही. ज्यावेळेला पाणी नव्हते त्यावेळेला ते कमी केले व नागरीकांनीही ते मान्य केले. आज डेंग्यूंचे वाढते प्रमाण बघता दोन टाईम पाणीपुरवठा करावा असं मी याठिकाणी सांगते.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ५६८ विषय क्रमांक - १

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.भूजि/१/कावि/ ३४८/२०१३ दि.०३/०९/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१३१ दि.१२/११/२०१३

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४२४ दि.१८/०१/२०१४

४) मा.महापालिका सभा ठ.क्र.५०४ दि.०५/०७/२०१४

५) मा.महापालिका सभा ठ.क्र.५३३ दि.०५/०८/२०१४

६) मा.महापालिका सभा ठ.क्र.५५१ दि.१९/०८/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मिळकत वाटप नियमावली २०१३ प्रस्तावासोबत नमुद केलेप्रमाणे (प्रारुप) तयार करणेत आलेली आहे त्यास तसेच मनपा मिळकत वाटप नियमावली २०१३ मधील भाग-५ मध्ये मिळकत विनियोगाचा प्राधान्यक्रम ठरविणेत आला आहे. तथापि सदर नमुद १ ते ७ प्राधान्य वर्गासाठी जाहिर निविदेद्वारे काही वर्गासाठी निविदा प्राप्त न झालेस किंवा कमी संख्येत प्राप्त झाल्यास इतर आरक्षीत वर्गासाठी त्या मिळकती वाटप करणेचे अधिकार मा.महापालिका सभेला असतील. यामध्ये ज्या आरक्षीत वर्गासाठी शासन निर्णय / आदेश असतील त्याला बाधा न येता मा.महापालिका सभेस निर्णय घेता येतील यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुमन नेटके** - मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- -५६९ विषय क्रमांक - २

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.मंदाकिनी ठाकरे, मा.वसंत लोंढे यांचा प्रस्ताव -

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.१६ दि.१६/०८/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत सन २०१०-११ मध्ये प्रसिध्द झालेल्या निविदा नोटीस मधील निविदा नोटीस क्र.१/२१-२०१०-११ " सांगवी वॉर्ड क्र.९१ येथील स्मशानभूमीमध्ये स्थापत्य विषयक दुरुस्तीची कामे करणे " हे काम अंदाजपत्रक सन २०१३-१४ मधून वगळले होते. त्यामुळे सदर चालू स्थितीतील असलेल्या कामाकरिता तरतूद नसल्याने सदर काम अंतिम स्वरुपात करणे शक्य झाले नाही. सदर काम पुर्ण झाल्याने या कामाची अंतिम अदायगी देणेकामी सदर कामाचा समावेश व याकरीता र.रु.२,५०,०००/- (अक्षरी र.रु.दोन लाख पन्नास हजार फक्त) इतकी तरतूद करणे आवश्यक आहे. यासाठी अंदाजपत्रक सन २०१४-१५ मध्ये लोकारोग्य-स्मशानभूमी या लेखाशिर्षा अंतर्गत सदर कामाचा समावेश व तरतूद उपलब्ध होण्यासाठी सांगवी गावठाण वॉर्ड क्र.६० मधील " प्रभाग क्र.६० सांगवी येथील गणपती विसर्जन घाटावर निर्माल्य कलश व कृत्रिम हौद व अनुषंगिक कामे करणे " (पान क्र.२४९/अनु.क्र.६) या कामातून तरतूद वर्ग करण्यास व सदर कामाचा अंदाजपत्रक सन २०१४-१५ नव्याने समावेश करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुमन नेटके** - मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- - ५७० विषय क्रमांक - ३

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.प्रशा.अधि.तथा सचिव अ प्रभाग यांचेकडील पत्र

क्र.अप्र/११/कावि/११२/२०१४, दि.२५/०३/२०१४

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२२ दि.२०/०८/२०१४

मा. अ प्रभाग समिती ठराव क्रमांक ८ दिनांक १८/०२/२०१४ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अप्पूघर शेजारील समर्थनगरी, आशिर्वाद नगर, परमार कॉम्प्लेक्स येथील तसेच

दत्तनगर भागातील नागरीक पालिका हद्यीबाहेरील असले तरी महापालिकेने त्यांच्या पाण्याची सोय केलेली आहे. पण त्याचा दर १००० लिटरला ३५/- रु. असा आहे. परंतु सिध्दीविनायक नगरी हा भाग सुध्दा मनपा हद्यीबाहेर आहे पण तेथील पाण्याचा दर १००० लिटरला २.५० रु. महापालिकेच्या अटी शर्ती नुसार आहे. याबाबत मा.विधी समिती ठराव क्र.९३४ दिनांक ०३/०४/२००६ अन्वये मा.महापालिका सभेकडे शिफारस केलेली असून मा.महापालिका सभा ठराव क्र. ५०८ दि.२४/०४/२००६ अन्वये सिध्दीविनायक व श्रीनगरी येथील नागरिकांना मनपा हद्दीतील निवासी दराप्रमाणे पाणीबील आकारणेस मान्यता देणेत आलेली आहे. तरी अप्पूघर शेजारील समर्थनगरी, आशिर्वाद नगर, परमार कॉम्प्लेक्स येथील तसेच दत्तनगर भागातील रहिवाशांना सिध्दीविनायक नगरी व श्रीनगरी येथील मनपा हद्दीतील निवासी दराप्रमाणे पाणीबील आकारणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.अमीना पानसरे -** मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.शमीम पठाण** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ही मागणी कोणी केलेली आहे. नागरीकांची मागणी आहे का कुठल्या बिल्डर्सची मागणी आहे मा.आयुक्तांनी याचा खुलासा करावा किंवा जे संबंधीत पाणीपुरवठा विभागाचे आहेत त्यांनी खुलासा करावा की मागणी कोणाची आहे. आपल्याकडे तुम्ही आम्हांला अंदोलन वगैरे एवढ सगळ करायला लावतायं. माजी महापौर मोहिनीताई यांच्याकडे आम्ही दहा वेळा सांगीतले पाणी वाढवा तरी आपल्याला जमल नाही आणि यांना मात्र आपण कमी रेटने पाणी देतो. आणि येथे सोडत नाहीत.

**मा.एम.टी कांबळे (प्र.शहर अभियंता)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा जो विषय आहे तो प्रभाग समिती सभेमध्ये हा ठराव झालेला आहे आणि तो विधी समितीमार्फत मा.महापालिका सभेसमोर आलेला आहे, मा.नगरसदस्यांचा विषय आहे.

**मा.आर.एस.कुमार** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. समर्थनगरी, आशिर्वाद नगर, परमार कॉम्प्लेक्स येथील तसेच दत्तनगर भागातील नागरीक हे सर्व १९८६ च्या दरम्यान महापालिका हद्दीमध्ये होते त्यानंतर ऍक्सीडेंन्टली ते कॅण्टोन्मेंट बोर्डामध्ये ट्रान्सफर करण्यात आलेले आहे. या भागात महानगरपालिकेकडून आपणच पाणी कनेक्शन त्यावेळेला दिले होते कॅण्टोन्मेंट बोर्डमध्ये गेल्यानंतर पाण्याचा रेट हा कमर्शिअल प्रमाणे, हद्दी बाहेरीलप्रमाणे लावणेत येतो. सिध्दीविनायक नगरी या भागात १२०० फ्लॅटस आहेत. त्यांना मात्र आपण कमी रेटने मंजूर करुन दिले. त्यानंतर तेथील नागरीक नगरसेवकांना भेटले त्यांनी विनंती केली की आमच्या शेजारी साडेतीन रुपयाप्रमाणे पाणी देणेत येते त्याप्रमाणे आम्हांला सुध्दा पाणी देण्यात यावे म्हणून अ प्रभागामध्ये ठराव दिलेला आहे त्यांच्या विनंती प्रमाणे ठराव झालेला आहे. आणि म्हणून त्यांना या रेट प्रमाणे पाणी देण्यात यावे अशी विनंती आहे.

**मा.बाबासाहेब धुमाळ** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. शेजारील ट्रान्सपोर्ट नगरीमधून या लाईन्स गेलेल्या आहेत. पहिल्या लाईन टाकल्या त्यावेळेला पुर्ण पाणी होतं. पण आता ज्या लाईन दिलेल्या आहेत त्या कांबळे साहेबांना मी दाखवलेल्या आहेत. त्यामध्ये अर्ध्या पेक्षा जास्त अनऑथोराईज आहेत मी पाहिजेतर त्या दाखवू शकतो. त्या सर्व लाईन हॉटेलला गेलेल्या आहेत. तेथे काही हितचिंतकाचे परमीट बार आहेत. तेथे बिझनेस करतात. त्याठिकाणी फक्त दहा ते पंधरा फ्लॅट आहेत. फ्लॅटवाल्यांना कमी रेटने पाणी दयावे व हॉटेलवाल्यांना कमर्शिअल रेट पस्तीस रुपये लावावा नाहीतर आम्ही कोर्टात जाणार आहोत. इतर हॉटेल्स आहेत माझ्या हॉटेलला सुध्दा कमर्शिअल रेट आहे. मग त्या हॉटेलला कमर्शिअलचा रेट का नको, त्यांनाही कमर्शिअल रेट लावा. पिण्यासाठी पाणी देतांना तुम्ही आडीच रुपये दया परंतु इतर जे हॉटेल्स आहेत त्यांना ३५ रुपये किंवा त्याच्यापेक्षा जास्त रेटने पाणी दयावे, ते करोडो रुपये कमवतात. कमर्शिअल रेटने पाणी दयावे.

**मा.उल्हास शेट्टी** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. या विषयावर आर.एस.कुमार बोलल्या प्रमाणे रेसीडेन्शीअल झोनला आडीच रुपये प्रमाणे पाणी दयावे असे आहे. धुमाळ साहेबांनी सांगीतले त्याठिकाणी हॉटेल आहेत. सन्मानीयांचे चार पाच हॉटेल आहेत, धंदा करणे गुन्हा नाही. कोणी एक लाख कमवत असेल किंवा दोन लाख कमवत असेल, कोण किती कमवत, कोण काय करतं त्यापेक्षा जे नियमात आहे ते करावे. सभागृहात कोणावर काही बोलण्यापेक्षा आपणही विचार करायला पाहिजे की आपणही त्याठिकाणी धंदा करत असतो. कोण किती धंदा करतो कसा करतो, काही चो-या मा-यातर करत नाहीत. या शहरामध्ये भरपूर व्यापारी आहेत, तुम्ही पण व्यापारी आहेत. तुम्ही पण त्याठिकाणी बिझनेस करता. आम्ही सुध्दा त्याठिकाणी व्यापार करतो. प्रत्येकजण आपआपला धंदा करतो, कोणी चो-या करत नाहीत. सभागृहामध्ये नियम आहेत, प्रत्येकाना कायदा कानुन आहे. आर.एस.कुमार यांनी सांगीतले त्याप्रमाणे त्याठिकाणी रेसीडेन्शीअल झोनमध्ये पाणी देणे क्रमप्राप्त आहे. कायदेशीर जे आहे त्याप्रमाणे रेट लावावेत. श्रीनगरी हा भाग उंचावर असल्यामुळे पाणी जात नाही त्याठिकाणी चांगल पाणी दया आणि जो काही नियमाप्रमाणे रेट असेल तो लावा एवढीच विनंती आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मामहापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ४

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/फक्षेका/काअ/कावि/४९३/२०१४, दि.०४/०८/२०१४

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२४ दि.२०/०८/२०१४

प्रभाग क्र.५ मध्ये अतिक्रमण कारवाईसाठी क्रेन व जे.सी.बी. पुरविणेकामी येणा-या अंदाजे र.रु.१७,००,२४०/- (अक्षरी र.रु. सतरा लाख दोनशे चाळीस फक्त) चे खर्चाचे पुर्वगणनपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता व त्याप्रमाणे काम करणेस तसेच प्रभाग क्र.५ मध्ये अतिक्रमण कारवाईसाठी क्रेन व जे.सी.बी.पुरविणे कामीचे अंदाजे र.१७,००,२४०/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे व सदरचे काम संपूर्ण फ प्रभाग कार्यक्षेत्रासाठी करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुमन नेटके** - मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.आर.एस.कुमार** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.कैलास थोपटे** - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- - ५७१ विषय क्रमांक - ४

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/फक्षेका/काअ/कावि/४९३/२०१४, दि.०४/०८/२०१४

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२४ दि.२०/०८/२०१४

विषय क्रमांक ४ दप्तरी दाखल करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मामहापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ५७२ विषय क्रमांक - ५

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : - १) मा.समीर मासुळकर, मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव -

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२६ दि.२०/०८/२०१४

स्थापत्य विभागातील कार्यकारी अभियंता पदाच्या रिक्त जागांवर सध्याच्या कार्यकारी अभियंत्यांना अतिरिक्त पदभार देण्यात आलेला आहे. कामकाजाच्या सोईच्यादृष्टीने उपअभियंता स्थापत्य पदावरील खालील सेवाजेष्ठ अभियंत्यांना १)श्री.औंभासे प्रमोद सुधाकर, २) श्री.गायकवाड जीवन कृष्णा, ३) श्री.फारुक शेख, ४) श्री.सोनवणे डी.एस. यांना कार्यकारी अभियंता पदावर पदोन्नती देणेस, कार्यकारी अभियंता पदास शासनाची मंजूरी प्रलंबित असल्यास शासनाची मंजूरी मिळेपर्यंत वरील सेवाजेष्ठ उपअभियंत्यांस कार्यकारी अभियंता पदाचा पदभार देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच महानगरपालिकेमध्ये विद्युत दुरध्वनी कक्ष (दुरसंचार) विभागाकडे तांत्रिक सेवेतील "दुरध्वनी पर्यवेक्षक" या अभिनामाचे वर्ग ३ मधील १ पद पदोन्नतीने भरणेकामी मंजूर आहे. सदर पदासाठी वेतनबँण्ड र.रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० मंजूर आहे. "दुरध्वनी चालक" संवर्गामध्ये, "दुरध्वनी चालक" पदानंतर पदोन्नती सोपान "दुरध्वनी पर्यवेक्षक" हे पद पदोन्नती साठी रिक्त असल्याने व आतापर्यंत "दुरध्वनी चालक" या पदावर एस.एस.सी. (इयत्ता १० वी) उत्तीर्ण झालेल्या व टेलिफोन ऑपरेटर कोर्स शासनमान्य संस्थेमधून उत्तीर्ण झालेल्या कर्मचा-यांची महापालिकेमध्ये नियुक्ती केलेली आहे. "दुरध्वनी पर्यवेक्षक" पदासाठी शैक्षणिक अर्हता व पात्रता १)एस.एस.सी. (इयत्ता १० वी) उत्तीर्ण किंवा मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कोणत्याही शाखेचा पदवीधर. २) शासन मान्य संस्थेतील टेलिफोन ऑपरेटर कोर्स उत्तीर्ण, ३) टेलिफोन, ई.पी.ए.बी.एक्स व संबंधित उपकरणाचे प्राथमिक तांत्रिक ज्ञान आवश्यक, ४) "दुरध्वनी चालक" पदावर १५ वर्षाचा अनुभव असणा-या महानगरपालिकेतील कर्मचा-यांना सेवाजेष्ठतेनुसार व गुणवत्तेचा विचार करुन वरील प्रमाणे "दुरध्वनी पर्यवेक्षक" पदासाठी महापालिकेच्या सेवाप्रवेश नियम समिती निश्चित केलेल्या शैक्षणिक अर्हता व पात्रतेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रस्तावात नमुद लिपिक पदासाठी आवश्यक ती अर्हता धारण करणारे कर्मचारी वर्ग ४ मध्ये आहेत. तसेच सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील अधिसूचना दिनांक ३१ मे २००६ नुसार शासन आदेश क्र.एएससी १५१४/प्र.क्र.९७/२०१४/१४-अ तारीख २१ जुलै २०१४ नुसार गट ड संवर्गामधील कर्मचा-यांना लिपिक - टंकलेखक पदावर नियमित स्वरुपात ड वर्गातील कर्मचारी यांना पदोन्नती देण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये

प्रशासन अधिकारी अभिनामाची ८ पदे भरणेसाठी दिनांक ०५/१०/२०१३ रोजी लेखी परिक्षा व मुलाखती घेण्यात येऊन पात्र उमेदवारांची निवड यादी करण्यात आली आहे. यादीवरील ८ उमेदवारांना प्रशासन अधिकारी पदावर नियुक्ती देण्यात आलेली आहे. या यादीमध्ये महानगरपालिकेत प्रशासकीय संवर्गात २० वर्षापेक्षा जास्त सेवा झालेले श्री.अनिल लक्ष्मण खामकर, श्री.प्रवीण सोपानराव बागलाणे व श्री.रमेश भिकाजी चोरघे, यांचा सामावेश असून ते गुणानुक्रमे वरिष्ठ स्थानावर आहेत. त्यामुळे ते प्रशासन अधिकारी तथा गट ब मधील प्रशासन अधिकारी पदाचे समकक्ष पदावर नियुक्ती देण्यास पात्र आहेत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ तथा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूची ड, प्रकरण ३ मध्ये एखाद्या पदाची अर्हता धारण करणारे कर्मचारी उक्त पदावर नेमणूक देण्यास योग्य असेल असे महापालिकेचे मत असेल तर महापालिकेस जाहिरात देऊन पद भरण्याची पध्दत न अनुसरता अशा कर्मचाऱ्यांस नेमणूक करता येईल अशी तरतुद आहे. तसेच मे.मुंबई उच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्रमांक १२९० दिनांक २५/०४/२००७ अन्वये उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार पुणे महापालिकेमध्ये, महापालिका सेवेत नसलेल्या उमेदवारास दिलेली नियुक्ती रद्द करुन महापालिका सेवेतील कर्मचा-यांस नेमणूक देणेबाबत आदेश दिलेला आहे. पुणे मनपाने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली आहे. तथापि महापालिका प्रशासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील सदर तरतुदीचा विचार न करता प्रशासन अधिकारी पदनामाची ८ पदे भरलेली आहेत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ तथा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूची ड, प्रकरण ३ मधील तरतुदीनुसार तसेच मे.मुंबई उच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्रमांक १२९० दिनांक २५/०४/२००७ अन्वये दिलेल्या निकालाचा विचार करुन दिनांक ०५/१०/२०१३ रोजीचे प्रशासन अधिकारी पदाचे यादीवरील प्रशासन अधिकारी पदावर नियुक्ती देण्यास पात्र असलेले श्री.अनिल लक्ष्मण खामकर यांचा प्रशासकिय व लेखा संवर्गातील प्रशासन, एल.बी.टी. व मुलेप विभागातील वर्ग २ व ३ चे पदावरील कामाचा २४ वर्षाचा अनुभव विचारात घेऊन त्यांना प्रशासन अधिकारी पदाचे समकक्ष गट ब मधील भांडार नियंत्रक पदावर, श्री.प्रवीण सोपानराव बागलाणे यांचा प्रशासकिय लेखा, जकात, विद्युत व जनसंपर्क विभागातील वर्ग ३ चे पदावरील कामाचा २३ वर्षाचा अनुभव विचारात घेऊन त्यांना प्रशासन अधिकारी पदाचे समकक्ष गट ब मधील मुख्य आयातकर अधिक्षक पदावर, श्री.रमेश भिकाजी चोरघे, यांचा प्रशासकिय संवर्गातील प्रशासन, जकात, निवडणूक व संगणक विभागातील वर्ग ३ चे पदावरील कामाचा २३ वर्षाचा अनुभव विचारात घेऊन त्यांना प्रशासन अधिकारी पदाचे समकक्ष गट ब मधील विशेष अधिकारी पदावर नियुक्ती देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुमन नेटके** - मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.उल्हास शेट्टी** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- श्री.विमलरॉय कन्हेरे पद कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग हे नियत वयोमानानूसार दि. ३०/११/२०१४ रोजी सेवानिवृत्त होत असून त्यांच्या रिक्त होणा-या कार्यकारी अभियंता, स्थापत्य या पदावर श्री.एफ.बी.शेख पद उपअभियंता (प्रभारी कार्यकारी अभियंता) हे सेवाजेष्ठतेने व शैक्षणिक अर्हता धारण करीत असल्यामुळे कार्यकारी अभियंता, स्थापत्य या पदावर नियुक्ती करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.दत्तात्रय साने** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- श्री.मोहन राजू बबन पद ग्रंथपाल कम लिपिक, सार्वजनिक वाचनालय विभाग हे प्रशासन अधिकारी पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता व प्रशासकीय कामकाजाचा अनुभव धारण करीत असल्यामुळे प्रशासन अधिकारी पदावर नियुक्ती करणेस मान्यता देणेत यावी तसेच पिंपरी चिंचवड मनपा स्थापत्य विभागातील श्री.नरोटे सुनिलदत्त लहानू हे कनिष्ठ अभियंता पदावर काम करीत आहेत. त्यांची शैक्षणिक अर्हता B.E.Civil अशी असून मनपाचे आरक्षण धोरण, पदसंख्या याचा विचार करता ते उपअभियंता या पदावर पदोन्नतीस पात्र आहेत तरी त्यांना उपअभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत यावी.

**मा.नितीन काळजे** - मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.शमीम पठाण** - मा.महापौर साहेब, विषय काय आहे स्थापत्य विभागातील कार्यकारी अभियंता पदाच्या रिक्त जागांवर सध्याच्या कार्यकारी अभियंत्यांना अतिरिक्त पदभार देण्यात आलेला आहे. कामकाजाच्या सोईच्यादृष्टीने या लोकांना अतिरीक्त पदभार तात्पुरत्या स्वरुपात देणेत आलेला आहे त्याला मान्यता घेतात. या लोकांना पदभार देण्यासाठी मान्यता देतोत त्याऐवजी आयुक्त साहेब आपण यांना ऑगष्टमध्येच जादा काम दिलेले आहे या पदाची जबाबदारी तात्पुरत्या स्वरुपात दिलेली आहे. आता हा विषय कसा काय ? ऑगष्टमध्येच मान्यता घ्यायला पाहिजे होती. परंतु ते आचारसंहितेमुळे जमले नाही. जादा पदभार दिलेला आहे व त्याला उपसूचना कशी काय देता येईल. उपसूचनेला विरोध नाही. अतिरीक्त पदभार सोपवणेसाठी उपसूचना द्यायची असेलतर या लोकांचा नियमाप्रमाणे पदोन्नतीचा विषय पुढच्या महिन्यात आणणार आहेत व आता ऑलरेडी पदभार दिलेलाच आहे त्यांची वर्णी या पदावर लागणारच आहे. त्यांना कायमस्वरुपी हा पदभार देणेत यावा, किंवा प्रमोशन देणेत यावे. नियमाप्रमाणे त्यांना प्रमोशन देणेत यावे. अशाप्रकारची उपसूचना आपण दयावी. आता फक्त अतिरीक्त पदभार दिलेला आहे त्यासाठीच्या मान्यतेला हा विषय आलेला आहे याचा खुलासा केलातर बरे होईल म्हणजे सर्वांना ते कळेल.

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब, पठाणताईनी जी सूचना केलेली आहे ती बरोबर आहे. हा विषय जो आलेला आहे तो सदस्य प्रस्ताव आहे. हा विषय प्रशासनाकडून आलेला नाही

सदस्यांचा प्रस्ताव आहे. पठाणताईचा मुद्दा बरोबर आहे. अतिरीक्त पदभार असेलतर तीच उपसूचना घ्यावी ती त्याला सूसंगत होईल आणि विषय क्रमांक ७ ला रितसर उपसूचना देता येईल. पदभार असेलतर पदभाराची उपसूचना दयावी व प्रमोशनचा विषय असेलतर ७ नंबर विषयाला उपसूचना दयावी.

**मा.शमीम पठाण**- मा.महापौर साहेब, हा विषय प्रमोशनचा आहे का याचा खुलासा करावा.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, विधी समितीला अधिकार आहेत. विधी समितीने विषय ठेवलेला आहे मंजूर करायचा का नाही हा सभागृहाने निर्णय घ्यावा याला जेवढी सुसंगत उपसूचना दयायची तेवढीच दयावी आणि विषय मंजूर करावा.

**मा.आयुक्त** - मा.महापौर मॅडम, सन्मा.सभागृह. आताच सन्मा.सदस्यांनी सांगीतल्याप्रमाणे हा विषय विधी समिती मार्फत सदस्य ठराव म्हणून आलेला आहे त्यामुळे प्रशासनाला या विषयाची कल्पना नाही. परंतु वाचल्यानंतर असे दिसते की हा अतिरीक्त कार्यभार आहे त्यासाठी मंजूरीची आवश्यकता नाही. प्रमोशनचे विषय क्रमांक ७ व ८ आहे ते प्रशासनाने ठेवलेले आहेत त्या विषयाला उपसूचना देता येईल. त्या नियमानुसार असेलतर त्याचा विचार करायचा का नाही हाही विचार करता येईल परंतू हा विषय प्रशासनाचा नसल्यामुळे मा.सभागृहाने याच्यावर योग्य तो निर्णय घ्यावा.

**मा.उल्हास शेट्टी** - मा.महापौर साहेब, मी मांडलेली उपसूचना माघारी घेतो.

**मा.दत्तात्रय साने** - मा.महापौर साहेब, मी मांडलेली उपसूचना माघारी घेतो.

**मा.महापौर** - मुळ विषय मंजूर करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.प्रभाकर वाघेरे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - ६

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जा.क्र.स्था/डमु/३५७/२०१४, दि.१६/०८/२०१४

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.३२ दि. ५/०९/२०१४

प्रभाग क्र.४३ पिंपरी येथे जिजामाता हॉस्पिटलची नवीन इमारत बांधणेकामीचे र.रु.३८,४४,००,०००/- (अक्षरी र.रु.अडतीस कोटी चौव्वेचाळीस लाख फक्त) चे पुर्वगणनपत्रकास प्रशासकीय मान्यता व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.†›.संदीप चिंचवडे** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.शत्रुघ्न काटे** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- प्रभाग क्र. ५५ पिंपळे सौदागर येथे मनपा शाळा ते रक्षक चौका पर्यंतचा २० मी. रुंद डी.पी. रस्ता विकसित करणे या कामास र.रु.१,५०,००,०००/- प्रशासकीय मान्यता आहे. सदर कामाअंतर्गत मनपा शाळा ते रक्षक चौका पर्यंतचा २० मी. रुंद डी.पी.रस्त्याच्या दोन्ही बाजुंचे रुंदीकरण करुन डांबरीकरण करणे वाहतुकीच्या दृष्टीने गरजेचे आहे. त्यासाठी वरील कामास र.रु. ४,९९,००,०००/- पर्यंत सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

**मा.प्रशांत शितोळे** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला मी अनुमोदन देतो.

**मा.नितीन काळजे** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे इ क्षेत्रीय कार्यालयाच्या स्थापत्य विभागाच्या सन २०१४-१५ च्या अंदाजपत्रकामध्ये सोबत जोडलेल्या प्रपत्र अ प्रमाणेच्या कामास केलेल्या तरतुदी अपु-या असलेने होणा-या संभाव्य खर्चाचा विचार करता त्यावर तरतूद वर्गीकरण करणे आवश्यक आहे. नगररचना विभागाकडील सन २०१४-१५ चे भुसंपादन निधी लेखाशिर्षावर केलेल्या एकत्रीत तरतूद र.रु. १०० कोटी मधून इ क्षेत्रीय कार्यालयाच्या स्थापत्य विभागाच्या लेखाशिर्षावर होणा-या संभाव्य खर्चाचा विचार करता सोबत जोडलेल्या प्रपत्र अ मध्ये दर्शविलेल्या कामावर र.रु. ६,३४,५०,०००/- इतकी रक्कम वर्ग करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.शांताराम भालेकर** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला मी अनुमोदन देतो.

**मा.शुभांगी लोंढे** - मा.महापौर साहेब, मी पुढील प्रमाणे उपसूचना मांडते - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकामध्ये प्रभाग क्र. ३६ लांडेवाडी मधील ओम नगरी येथील दत्तमंदिराशेजारी मोकळया जागेत व्यायामशाळा विकसित करणे या कामास र.रु. २५ लक्षची प्रशासकीय मान्यता आहे परंतु सदर कामामध्ये व्यायामशाळा इमारत बांधणे, परीसराचे सुशोभिकरण करणे, गार्डन विकसित करणे आदी कामे करणे आवश्यक आहे त्यानुषंगाने अंदाजपत्रक तयार केले असता अंदाजपत्रकीय र.रु. ९५ लक्ष येत आहे. सबब विषयांकित कामाची व्याप्ती लक्षात घेता प्रभाग क्र. ३६ लांडेवाडी मधील ओम नगरी येथील दत्तमंदिराशेजारी मोकळया जागेत व्यायामशाळा विकसित करणे या कामास र.रु.९५ लक्ष ची प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

**मा.दत्तात्रय साने** - मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.आर.एस.कुमार** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- मनपाच्या सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकास मा.महापालिका सभा ठराव क्र. ४७७ दि.२८/२/२०१४ उपसूचनेसह मान्यता मिळालेली आहे. त्यापैकी उपसूचना क्र. ९७ विशेष योजना अन्वये प्राधिकरण स्पाइन

रोड भक्ति शक्ति  चौक ते भेळ चौक चारही लेन काँक्रीटीकरण करणे कामास र.रु. १.०० कोटी तरतूद मान्य आहे. सद्दस्थितीत पावसाळा चालू असूनही, नागरिकांना पिण्याचे पाणी मिळत नसलेने माझे प्रभाग क्र. १४ भक्ति शक्ति  उद्यान सेक्टर २४  LIG कॉलनी, सेक्टर २५,२६ अंतर्गत रस्ते पाणी पुरवठा विभागामार्फत जुन्या जल वाहिन्या दुरुस्ती, नविन जल वाहिनी टाकणे, ई. कामासाठी माहे जुन व जुलै मध्ये खोदणेत आलेल्या आहेत तसेच काही ठिकाणचे रस्तेही खराब झालेले आहेत वर नमुद केलेल्या कामाचे ररु. १.०० कोटीचे तरतुदीपैकी नागरिकांचे सोयीसाठी प्रभाग क्र. १४ भक्ति शक्ति उदयान येथील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणेसाठी रक्कम रु. ५०.०० लाख वर्ग करणेत यावेत तरी नागरिकांचे सोयीसाठी सन २०१४-१५ चे मनपाचे अंदाजपत्रकात पा.क्र./अ.क्र.९९८/३ या लेखाशिर्षावर नमुद केलेले प्र.क्र. १४ मध्ये डांबरी रस्त्याची आकस्मित व तातडीची दुरुस्तीची कामे करणेचे कामास वर नमुद केलेप्रमाणे र.रु. ५० लाख वर्ग करुन अंदाजपत्रकीय र.रु. ५० लाखाचे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

**मा.कैलासभाऊ थोपटे** - मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.प्रभाकर वाघेरे** -  मा.महापौर साहेब,  सर्व उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ५७३ विषय क्रमांक - ६

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जा.क्र.स्था/डमु/३५७/२०१४, दि.१६/०८/२०१४

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.३२ दि. ५/०९/२०१४

प्रभाग क्र.४३ पिंपरी येथे जिजामाता हॉस्पिटलची नवीन इमारत बांधणेकामीचे र.रु.३८,४४,००,०००/- (अक्षरी र.रु.अडतीस कोटी चौव्वेचाळीस लाख फक्त) चे पुर्वगणनपत्रकास प्रशासकीय मान्यता व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे तसेच प्रभाग क्र. ५५ पिंपळे सौदागर येथे मनपा शाळा ते रक्षक चौका पर्यंतचा २० मी. रुंद डी.पी. रस्ता विकसित करणे या कामास र.रु.१,५०,००,०००/- प्रशासकीय मान्यता आहे. सदर कामाअंतर्गत मनपा शाळा ते रक्षक चौका पर्यंतचा २० मी. रुंद डी.पी.रस्त्याच्या दोन्ही बाजुंचे रुंदीकरण करुन डांबरीकरण करणे वाहतुकीच्या दृष्टीने गरजेचे आहे. त्यासाठी वरील कामास र.रु. ४,९९,००,०००/- पर्यंत सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे इ क्षेत्रीय कार्यालयाच्या स्थापत्य विभागाच्या सन २०१४-

१५ च्या अंदाजपत्रकामध्ये सोबत जोडलेल्या प्रपत्र अ प्रमाणेच्या कामास केलेल्या तरतुदी अपु-या असलेने होणा-या संभाव्य खर्चाचा विचार करता त्यावर तरतूद वर्गीकरण करणे आवश्यक आहे. नगररचना विभागाकडील सन २०१४-१५ चे भुसंपादन निधी लेखाशिर्षावर केलेल्या एकत्रीत तरतूद र.रु. १०० कोटी मधून इ क्षेत्रीय कार्यालयाच्या स्थापत्य विभागाच्या लेखाशिर्षावर होणा-या संभाव्य खर्चाचा विचार करता सोबत जोडलेल्या प्रपत्र अ मध्ये दर्शविलेल्या कामावर र.रु. ६,३४,५०,०००/- इतकी रक्कम वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकामध्ये प्रभाग क्र. ३६ लांडेवाडी मधील ओम नगरी येथील दत्तमंदिराशेजारी मोकळया जागेत व्यायामशाळा विकसित करणे या कामास र.रु. २५ लक्षची प्रशासकीय मान्यता आहे परंतु सदर कामामध्ये व्यायामशाळा इमारत बांधणे, परीसराचे सुशोभिकरण करणे, गार्डन विकसित करणे आदी कामे करणे आवश्यक आहे त्यानुषंगाने अंदाजपत्रक तयार केले असता अंदाजपत्रकीय र.रु. ९५ लक्ष येत आहे. सबब विषयांकित कामाची व्याप्ती लक्षात घेता प्रभाग क्र. ३६ लांडेवाडी मधील ओम नगरी येथील दत्तमंदिराशेजारी मोकळया जागेत व्यायामशाळा विकसित करणे या कामास र.रु.९५ लक्ष ची प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच मनपाच्या सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकास मा.महापालिका सभा ठराव क्र. ४७७ दि.२८/२/२०१४ उपसूचनेसह मान्यता मिळालेली आहे. त्यापैकी उपसूचना क्र. ९७ विशेष योजना अन्वये प्राधिकरण स्पाइन रोड भक्ति शक्ति चौक ते भेळ चौक चारही लेन काँक्रीटीकरण करणे कामास र.रु. १.०० कोटी तरतूद मान्य आहे. सद्दस्थितीत पावसाळा चालू असूनही, नागरिकांना पिण्याचे पाणी मिळत नसलेने माझे प्रभाग क्र. १४ भक्ति शक्ति उद्यान सेक्टर २४ LIG कॉलनी, सेक्टर २५,२६ अंतर्गत रस्ते पाणी पुरवठा विभागामार्फत जुन्या जल वाहिन्या दुरुस्ती, नविन जल वाहिनी टाकणे, ई. कामासाठी माहे जुन व जुलै मध्ये खोदणेत आलेल्या आहेत तसेच काही ठिकाणचे रस्तेही खराब झालेले आहेत वर नमुद केलेल्या कामाचे र.रु. १.०० कोटीचे तरतुदीपैकी नागरिकांचे सोयीसाठी प्रभाग क्र. १४ भक्ति शक्ति उदयान येथील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणेसाठी रक्कम रु. ५०.०० लाख वर्ग करणेत यावेत तरी नागरिकांचे सोयीसाठी सन २०१४-१५ चे मनपाचे अंदाजपत्रकात पा.क्र./अ.क्र.९९८/३ या लेखाशिर्षावर नमुद केलेले प्र.क्र. १४ मध्ये डांबरी रस्त्याची आकस्मित व तातडीची दुरुस्तीची कामे करणेचे कामास वर नमुद केलेप्रमाणे र.रु. ५० लाख वर्ग करुन अंदाजपत्रकीय र.रु. ५० लाखाचे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ७

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/५६९/२०१४,

दिनांक **-** २२/०८/२०१४

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.३३ दि. ५/०९/२०१४

श्री.गावडे दिलीप काशिनाथ यांना खुला या प्रवर्गामधून सह आयुक्त या पदावर र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड वेतन र.रु.६९०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.अमिना पानसरे** - मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.उल्हास शेट्टी** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- श्री.विमलरॉय कन्हेरे पद कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग हे नियत वयोमानानूसार दि. ३०/११/२०१४ रोजी सेवानिवृत्त होत असून त्यांच्या रिक्त होणाऱ्या कार्यकारी अभियंता, स्थापत्य या पदावर श्री.एफ.बी.शेख पद उपअभियंता (प्रभारी कार्यकारी अभियंता ) हे सेवाजेष्ठतेने व शैक्षणिक अर्हता धारण करीत असल्यामुळे कार्यकारी अभियंता, स्थापत्य या पदावर नियुक्ती करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- महापालिका अस्थापनेवरील रिक्त होणारे "सहाय्यक आयुक्त" पदासाठी संगणक अधिकारी पदाचे १९ वर्षे सेवा पुर्ण करणारे वर्ग-२ चे अधिकारी म्हणून ई-गव्हर्नन्स विभाग, जे.एन.एन.यु.आर.एम.समन्वयक इ.महत्वाचे पदांवर कामकाज करीत असलेने व वर्ग-२ चे सेवाजेष्ठ अधिकारी म्हणून श्री.निळकंठ धोंडीराम पोमण, संगणक अधिकारी यांना "सहाय्यक आयुक्त" पदावर पदोन्नतीव्दारे नेमणूक करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.शत्रुघ्न काटे** - मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.दत्तात्रय साने** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- श्री.मोहन राजू बबन पद ग्रंथपाल कम लिपिक, सार्वजनिक वाचनालय विभाग हे प्रशासन अधिकारी पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता व प्रशासकीय कामकाजाचा अनुभव धारण करीत असल्यामुळे प्रशासन अधिकारी पदावर नियुक्ती करणेस मान्यता देणेत यावी तसेच पिंपरी चिंचवड मनपा स्थापत्य विभागातील श्री.नरोटे सुनिलदत्त लहानू हे कनिष्ठ अभियंता पदावर काम करीत आहेत. त्यांची शैक्षणिक अर्हता B.E.Civil अशी असून मनपाचे आरक्षण धोरण,

पदसंख्या याचा विचार करता ते उपअभियंता या पदावर पदोन्नतीस पात्र आहेत तरी त्यांना उपअभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत यावी.

**मा.नितीन काळजे** - मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.शमीम पठाण** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते १) औंभासे प्रमोद सुधाकर, २) गायकवाड जीवन कृष्णा ३) फारुक शेख ४) सोनवणे डी.एस. या उपअभियंत्यांना कार्यकारी अभियंता म्हणून पदोन्नती देणेस मान्यता देणेत यावी.

**मा.अनिता तापकीर** - मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.अजीत गव्हाणे** - मा.महापौर साहेब, याठिकाणी उपसूचना मांडलेल्या आहेत. आमची याच्या मागची भूमिका अशी आहे की आपल्या महापालिकेमध्ये अनेक लोकांकडे पदभार आहे त्याच्यामुळे व्यवस्थित कामकाज होत नाहीत. एका सहा.आयुक्तांकडे चार ते पाच डिपार्टमेंट आहेत त्यामुळे कुठल्याही कामाला न्याय मिळत नाही. त्यामुळे आमची विनंती आहे की काही अधिकारी जे आहेत त्यांना तुम्ही हे अधिकार दयावेत आणि कामकाजाची विभागणी केलीतर निश्चितपणे आपल्याला अधिक चांगले काम या शहरामध्ये या अधिका-यांच्या मार्फत करता येईल. आम्हांला उपसूचना का दयावी लागते कारण यात प्रशासन कुठेतरी कमी पडते. प्रशासनाकडून हे विषय आले असतेतर आम्हांला जो काही खटाटोप करावा लागतो तो करायला लागणार नाही. शहरात चांगले काम होण्यासाठी येथून पुढे प्रशासनाकडून तसे विषय आणावेत काही लोकांकडे पाच-पाच चार्ज आहेत. त्यामुळे ज्यांना प्रमोशन देणं शक्य आहे त्यांना प्रमोशन देवून अधिकार दिलेतर त्या लोकांकडून आपल्याला आणखीन अधिक चांगले काम पिंपरी चिंचवड शहरामध्ये करता येईल महापौर साहेब, तशा सूचना आपण आयुक्त साहेबांना दयाव्यात.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, सर्व उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ५७४ विषय क्रमांक - ७

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/५६९/२०१४,

दिनांक - २२/०८/२०१४

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.३३ दि. ५/०९/२०१४

श्री.गावडे दिलीप काशिनाथ यांना खुला या प्रवर्गामधून सह आयुक्त या पदावर र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड वेतन र.रु.६९०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्यास मान्यता

देणेत येत आहे तसेच श्री.विमलरॉय कन्हेरे पद कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग हे नियत वयोमानानूसार दि. ३०/११/२०१४ रोजी सेवानिवृत्त होत असून त्यांच्या रिक्त होणाऱ्या कार्यकारी अभियंता, स्थापत्य या पदावर श्री.एफ.बी.शेख पद उपअभियंता (प्रभारी कार्यकारी अभियंता ) हे सेवाजेष्ठतेने व शैक्षणिक अर्हता धारण करीत असल्यामुळे कार्यकारी अभियंता, स्थापत्य या पदावर नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे तसेच महापालिका अस्थापनेवरील रिक्त होणारे "सहाय्यक आयुक्त" पदासाठी संगणक अधिकारी पदाचे १९ वर्षे सेवा पुर्ण करणारे वर्ग-२ चे अधिकारी म्हणून ई-गव्हर्नन्स विभाग, जे.एन.एन.यु.आर.एम.समन्वयक इ.महत्वाचे पदांवर कामकाज करीत असलेने व वर्ग-२ चे सेवाजेष्ठ अधिकारी म्हणून श्री.निळकंठ धोंडीराम पोमण, संगणक अधिकारी यांना "सहाय्यक आयुक्त" पदावर पदोन्नतीव्दारे नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे तसेच श्री.मोहन राजू बबन पद ग्रंथपाल कम लिपिक, सार्वजनिक वाचनालय विभाग हे प्रशासन अधिकारी पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता व प्रशासकीय कामकाजाचा अनुभव धारण करीत असल्यामुळे प्रशासन अधिकारी पदावर नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे तसेच पिंपरी चिंचवड मनपा स्थापत्य विभागातील श्रीनरोटे सुनिलदत्त लहानू हे कनिष्ठ अभियंता पदावर काम करीत आहेत. त्यांची शैक्षणिक अर्हता B.E.Civil अशी असून मनपाचे आरक्षण धोरण, पदसंख्या याचा विचार करता ते उपअभियंता या पदावर पदोन्नतीस पात्र आहेत तरी त्यांना उपअभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे तसेच १) ओंभासे प्रमोद सुधाकर, २) गायकवाड जीवन कृष्णा ३) फारुक शेख ४) सोनवणे डी.एस. या उपअभियंत्यांना कार्यकारी अभियंता म्हणून पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -५७५ विषय क्रमांक - ८

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/५७३/२०१४,

दिनांक - २२/०८/२०१४

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.३४ दि. ५/०९/२०१४

श्री.गड्डूवार देवन्ना नरसिमल्लू यांना अनुजमाती या प्रवर्गामधून कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड वेतन र.रु.६६०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता--

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -५७६ विषय क्रमांक - ९

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/५७०/२०१४, दिनांक २२/०८/२०१४

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.३५ दि. ५/०९/२०१४

श्री.गवळी संजय जनार्दन यांना खुला (अनु.जमाती) या प्रवर्गामधून उपमुख्यलेखापाल (अंतर्गत लेखापरिक्षक) या पदावर र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड वेतन र.रु.६६०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत तसेच श्री.संजय जनार्दन गवळी यांना खुला (अनु.जमाती) या प्रवर्गामधुन उपमुख्यलेखापाल (अंतर्गत लेखापरिक्षक) या पदावर र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन र.रु. ६६०० या वेतनश्रेणीमध्ये मुख्यलेखापाल यांचे नियंत्रणाखाली महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.पीसीसी-३००५/३००७/प्र.क्र.२१५/२००५/नवि-२२, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक १३ ऑक्टोंबर २०१० मध्ये नमुद केलेले अधिकार देणेसह पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता--

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -५७७ विषय क्रमांक - १०

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/५७१/२०१४,

दिनांक २२/०८/२०१४

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.३६ दि. ५/०९/२०१४

डॉ.देशमुख मनोज मोहन यांना खुला या प्रवर्गामधून वैद्यकीय अधिक्षक या पदावर वेतनश्रेणी र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड वेतन र.रु.७६०० मध्ये पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता--

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -५७८ विषय क्रमांक - ११

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र

क्र.प्रशा/१/कावि/५७२/२०१४,दिनांक २२/०८/२०१४

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.३७ दि. ५/०९/२०१४

डॉ.भगत प्रल्हाद कृष्णा यांना खुला (अनु.जाती) या प्रवर्गामधून वैद्यकीय उपअधिक्षक या पदावर र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड वेतन र.रु.७६०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता--

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १२

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१०/५९२/२०१३ दि.०४/०९/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४७ दि.१८/१२/२०१३

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४५८ दि.२०/०१/२०१४

४) मा.महापालिका सभा ठ.क्र.५१९ दि.०५/०७/२०१४

५) मा.महापालिका सभा ठ.क्र.५३६ दि.०५/०८/२०१४

६) मा.महापालिका सभा ठ.क्र.५५२ दि.१९/०८/२०१४

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत चाकण, देहू, आळंदी, हिंजवाडी, म्हाळुंगे मोई, मारुंजी व इतर परिसराचा समावेश करणेबाबत शासनास मनपाचे अभिप्राय सादर करणेपूर्वी सर्व पदाधिकारी यांची बैठक दि.३०/०८/२०१३ रोजी मा.आयुक्त यांचे कक्षात घेण्यात आली. सदर बैठकीत मनपा हद्यीच्या उत्तरेकडील १४ गावे आणि मनपा हद्दीच्या पश्चिमेकडील ६ गावे मनपा हद्दीत समावेश करणेबाबत सविस्तर चर्चा करणेत आली आणि सदर हद्दवाढीचा प्रस्ताव मा.शहर सुधारणा समिती मार्फत मा.महापालिका सभेपुढे सादर करणेबाबत चर्चा झाली तथापि सद्य:स्थितीत मनपा हद्दीला लागून असलेली गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणे योग्य होईल. त्यानुसार खालील नमुद मनपा हद्दीच्या उत्तरेकडील आळंदी, चिंबळी, कुरुळी, मोई, निघोजे, देहू, विठ्ठलनगर आणि मनपा हद्दीच्या पश्चिमेकडील गहुंजे, जांबे, मारुंजी, हिंजवाडी, माण, नेरे, सांगवडे ही मनपा हद्दीला लागून असलेली एकूण १४ गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.अजित गव्हाणे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ५७९ विषय क्रमांक - १२

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१०/५९२/२०१३ दि.०४/०९/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४७ दि.१८/१२/२०१३

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४५८ दि.२०/०१/२०१४

४) मा.महापालिका सभा ठ.क्र.५१९ दि.०५/०७/२०१४

५) मा.महापालिका सभा ठ.क्र.५३६ दि.०५/०८/२०१४

६) मा.महापालिका सभा ठ.क्र.५५२ दि.१९/०८/२०१४

विषय क्रमांक १२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १३

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. नरवि/कावि/१०/५९८/२०१३ दि.०७/१०/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४८ दि.१८/१२/२०१३

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४५९ दि.२०/०१/२०१४

४) मा.महापालिका सभा ठ.क्र.५२० दि.०५/०७/२०१४

५) मा.महापालिका सभा ठ.क्र.५३७ दि.०५/०८/२०१४

६) मा.महापालिका सभा ठ.क्र.५५३ दि.१९/०८/२०१४

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीच्या उत्तरेकडील आणि मनपा हद्दीला लागून असलेली ७ गावे आणि मनपा हद्दीच्या पश्चीमेकडील ७ गांवे अशी एकूण १४ गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणेबाबत प्रस्ताव मान्यतेकामी पुढील प्रमाणे आहे. मनपा हद्दीत समाविष्ट करावयाचे गांवे- मनपा हद्दीच्या उत्तरे कडील ७ गावे- आळंदी, चिंबळी, कुरुळी, मोई,निघोजे, देहू, विठ्ठलनगर. मनपा हद्दीच्या पश्चीमे कडील ७ गांवे- हिंजवडी, जांबे, माण, मारुंजी, नेरे, गहुंजे, सांगवडे वरीलप्रमाणे प्रस्ताव पत्र क्र.नरवि/कावि/१०/५९२/२०१३ दिनांक ४/९/२०१३ अन्वये मा.शहर सुधारणा समितीमार्फत मा.महापालिका सभेपुढे सादर केलेला आहे. प्रस्तुत विषयी मा.आमदार श्री.दिलीप मोहिते यांनी दि.१०/०९/२०१३ च्या पत्राने खेड तालुक्यातील आळंदी, चाकण, मोई, कुरुळी, निघोजे, चिंबळी, केळगांव, सालुंब्रे, महाळुंगे, खराबवाडी, नाणेकरवाडी, मेदनकरवाडी, कडाचीवाडी या गावांचा पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत समावेश होणेबाबत विरोध केला असल्याचे आणि सदर गांवे मनपा हद्दीत समावेश करु नये असे नमूद केले असून त्यासोबत ग्रामपंचायतीच्या ठरावाची प्रत जोडली आहे. प्रस्तुत विषय मा.महापालिका सभेपुढे सादर केलेला असल्याने या विषयासोबत मा.आमदार श्री.दिलीप मोहिते यांचे पत्र व त्यासोबतचे सहपत्रे मा.महापालिका सभेपुढे सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.अजित गव्हाणे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ५८०  विषय क्रमांक - १३

दिनांक - १०/११/२०१४  विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. नरवि/कावि/१०/५९८/२०१३ दि.०७/१०/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४८ दि.१८/१२/२०१३

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४५९ दि.२०/०१/२०१४

४) मा.महापालिका सभा ठ.क्र.५२० दि.०५/०७/२०१४

५) मा.महापालिका सभा ठ.क्र.५३७ दि.०५/०८/२०१४

६) मा.महापालिका सभा ठ.क्र.५५३ दि.१९/०८/२०१४

विषय क्रमांक १३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ८१  प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १४

दिनांक - १०/११/२०१४  विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/वाकड/१९८/२०१३, दि.२३/१२/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.७ दि.११/०८/२०१४

पिंपरी चिंचवड शहराच्या शासन निर्णय क्रटीपीएस - १८९३/१२७६/सीआर-१७४/९३/ युडी-१३, दिनांक १८ सप्टेंबर १९९५ अन्वये मंजूर विकास योजनेत व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग अधिसूचना क्र.टीपीएस-१८९३/१४१२/युडी-१३, दिनांक २८ नोव्हेंबर १९९५ अन्वये मंजूर तथापि महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग अधिसूचना क्र.पीसीएन-१६९७/९३४/प्र.क्र.८९/नवि-२२, मंत्रालय, मुंबई दिनांक १५ नोव्हेंबर १९९७ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेमध्ये समाविष्ट करण्यात आलेले तसेच शासन निर्णय क्र.टीपीएस -१८०६/१४१/प्र.क्र.१९८६/२००९/नवि-१३, दिनांक २९ मे २०१० अन्वये फेरबदल प्रस्तावानुसार मंजूर विकास योजनेतील खालील तक्त्यात दर्शविलेल्या प्रस्तावित आरक्षणाचे भूसंपादन त्वरित करणे करीता संदर्भिय पत्रान्वये मा.नगरसदस्या यांनी कळविले आहे.

| न अ. क्र. | आरक्षण क्रमांक | आरक्षणाचे प्रयोजन | स.नं. | बाधित होणारे संपादन करावयाचे एकूण सुमारे क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| १ | आरक्षण क्र.३९४ | माध्यमिक शाळा | स.नं.२४५ पैकी, २४६ पैकी व २४७ पैकी | १००००.०० चौ.मी. |
| २ | आरक्षण क्र.३९६ | प्राथमिक शाळा | स.नं.२३१ पैकी. | २०००.०० चौ.मी. |

तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूसंपादन अधिनियम १८९४ अन्वये तातडीने संपादन करणेकामी सदर आरक्षणाचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.प्रशांत शितोळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा विषय नगररचना विभागाचा आहे. याच्यामध्ये आरक्षणाच्या बाबतीत जी मागणी केलेली आहे त्याबाबत संपुर्ण माहिती सभागृहाला देण्यास सांगावे त्यानंतर बोलण्यात येईल.

**मा.प्रतिभा भदाणे (उपसंचालक नगररचना)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सदरचा विषय हा वाकड जुना हद्दीमधल्या आरक्षण क्र.३९४ माध्यमिक शाळा स.नं. २४५ पैकी, २४६ पैकी व २४७ पैकी १ हेक्टर जागेच्या भूसंपादनाचा प्रस्ताव आहे त्यातच दुसरा जो आहे आरक्षण क्र.३९६ प्राथमिक शाळा स.नं.२३१ पैकी. २ हजार चौ.मी.चा प्रस्ताव भूसंपादन करण्यासाठीचा आहे तो जी.बी.च्या मान्यतेसाठी ठेवलेला आहे.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, ही शाळा हायवे लागत आहे हे संपादन कशासाठी करायचे ? का करायचे ?

**मा.प्रतिभा भदाणे (उपसंचालक नगररचना)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ही स्थानिक नगरसेवकांची रिक्वेष्ट आहे.

**मा.प्रशांत शितोळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. या निमित्तान मला एक गोष्ट आपल्या लक्षात आणून दयायची आहे. आपल्या महानगरपालिकेची शेकडो आरक्षणं शाळांची आहेत. जवळपास २०० ते २२५ इमारती आहेत. आज आपल्या शाळेची अवस्था अक्षरश: बिकट आहे. आपल्या शाळेतील टॉयलेटला तेथील विदयार्थी सुध्दा जावू शकत नाहीत

अशी अवस्था असेलतर आपण कोटयावधी रुपये देवून ही आरक्षण ताब्यात घेणं बरोबर आहे का ? शिक्षणमंडळाच्या उबाळे मॅडम आहेत त्यांना विचारा, त्यांच्यावर अतिरीक्त आयुक्त काम करतात त्यांना विचारा शाळांची काय अवस्था आहे. बिलकूल चांगली अवस्था नाही. मग तुम्ही आरक्षण संपादन करुन करणार काय ? याच मॉडीफिकेशन करा, ही आरक्षण बदला. आपल्या शहरातील नागरीक खाजगी क्षेत्रातील शाळाना जर प्राधान्य देत असतीलतर तुम्ही खाजगी स्वरुपांच्या शाळांना का ही मदत करत नाहीत. मी तुम्हांला आठवण करुन देतो, त्यावेळेस मी चेअरमन होतो शर्मा साहेबांनी आपल्या शाळेच्या आरक्षणासाठी निवीदा काढली. नामांकित शाळा या शहरामध्ये याव्यात, आम्ही प्रायोरीटी पुण्याला देतो, पुणे शहराकडे जातो. त्या संस्थांनी आपल्याकडे यावं किंवा तो दर्जा असलेल्या संस्थांनी आपल्याकडे यावं म्हणून त्यांनी निवीदा काढली. त्यामध्ये दोन-तीन संस्था पात्र झाल्या. जागा आपल्याकडे असताना सुध्दा काही अडचणी आल्यामुळे त्या संस्थाना जागा ताब्यात देवू शकलो नाहीत आपण आहे त्या देवू शकत नाहीत मग हे नवीन घ्यायच कशाला ? ताब्यात घेवू नये असं नाही, तुम्ही ताब्यात घ्या परंतु आरक्षण बदल करा. नागरीकांना जर दुसरी सुविधा देता येत असेलतर तर शंभर टक्के हे करा. ताब्यात घेणेबाबत मला वाटत नाही कोणाचा विरोध असेल पण जे प्रयोजन आहे, ज्याच्यासाठी रिझर्व्हेशन ठेवलय तो उद्देश मात्र शंभर टक्के चुकीचा आहे. जे आपल्याकडे आहे ते व्यवस्थीत करु शकत नाहीत आणि नवीन घेवून काय करणार ? सांगवीला एकाच ठिकाणी कमीत कमी माध्यमिक आणि प्राथमिक शाळेंची १३ आरक्षण आहेत. त्यातील डेव्हलप तीन झाले. पिंपळेगुरवच्या दोन शाळा आणि सांगवीची एक शाळा आहे. त्या परिसरात इतर खाजगी शाळा तेरा आहेत. अशी परिस्थिती एकटया आमच्याकडेच नाहीतर सगळी कडे तशी परिस्थिती आहे. वाकड आणि पिंपळे सौदागर हा ऐरीया हायफाय ऐरीया आहे तेथे मराठी शाळा व सेमी इंग्रजी शाळेत कोणी जाणारपण नाही. त्या हायवेला सगळा एज्यूकेशन हब झाला आहे. तेथे मोठमोठया लाखो रुपये फि असलेल्या शाळा आहेत. ती आरक्षण ताब्यात घेवून करणार काय ? त्यामुळे संपादनाला बिलकुल विरोध नाही परंतु संपादन झाल्यानंतर आरक्षण बदल करणे हे सुध्दा आपल काम आहे त्यामुळे माझी तुम्हांला विनंती आहे आरक्षण ताब्यात आल्यानंतर मॉडीफिकेशनचा प्रस्ताव हा तुमच्याकडून आला पाहिजे. प्रशासनाची जबाबदारी, प्रशासनाची जबाबदारी असं म्हणून पण चालणार नाही, समाजाला काय पाहिजे याची जाणीव सुध्दा प्रशासनाला झाली पाहिजे. आम्हांला जे पाहिजे ते तुम्ही दिल पाहिजे, तुमच्याकडे जे आहे ते आम्ही घेणारच आहोत पण आमची सुध्दा गरज तुम्ही ओळखली पाहिजे, आम्हांला काही त्यातून आत्मसात करता येत असेल, त्यातून आम्हांला देशाला पुढ नेता येत असेलतर ते दया त्यामुळे माझा या संपादनाला शंभर टक्के विरोध नाही, त्या उद्देशाला विरोध आहे. तो उद्देश महानगरपालिकेकडून साध्य होत नाही. महानगरपालिकेच्या शाळेची परिस्थिती वाईट आणि बिकट आहे त्यामुळ हे आरक्षण ताब्यात

आल्यानंतर आरक्षणाचा उद्देश बदलावा म्हणून प्रशासनाने कार्यवाही करावी अशी माझी विनंती आहे. मा.महापौर मी विनंती करतो हे आरक्षण ताब्यात घेवून हे आरक्षण बदलण्याचे अधिकार मा.आयुक्तांना देण्यात यावेत आणि या विषयास मंजूरी देणेत यावी.

**मा.धनंजय आल्हाट -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह. सदरच्या विषयासंदर्भात नगररचना हा विभाग शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्वाचा विभाग आहे. आणि हा विभाग जर ठप्प झाला, आणि या विभागाची गती कमी झालीतर नवीन जो ग्रामीण भाग समाविष्ट करण्यात आलेला आहे त्या भागाचा निश्चित विकास मंदावणार आहे. म्हणून नगररचना विभागाची परिस्थिती गेल्या तीन दिवसापुर्वी आयुक्तांनी अचानकपणे व्हिजीट केली, त्या विभागातील अधिकारी, त्यांच्या गैरहजेरी संदर्भात मी आयुक्तंना बोललो, त्याठिकाणची परिस्थिती मी निदर्शनास आणून दिली. दिवाळी झाली त्यापुर्वीची निवडणूक आचारसंहिता आणि दिवाळी झाल्यानंतर २७ तारखेपासून कालपर्यंत नागरीकांच्या मोठया प्रमाणात तक्रारी वाढल्या. अनेकवेळा मी स्वत: त्याठिकाणी आमच्या प्रभागाच्या कामा निमीत्ताने गेलो परंतु त्याठिकाणी कुठल्याही प्रकारचे अधिकारी उपस्थित नव्हते. जर नगरसदस्यांची ही परिस्थिती असेलतर सर्वसामान्य नागरीकांना किती हेलपाटे मारावे लागत असतील याचा आपण विचार करण्याची गरज आहे. आयुक्त साहेब आपल्याला सांगीतल, आपण त्याठिकाणी व्हिजीट केली, वर्तमानपत्रामध्ये बातमी आली. एवढयावरुन हे थांबणार नाहीतर मी आपल्याला सांगीतल होत की, २७ तारखेपासून महापालिकेची परंपरा रुढ झालेली आहे. शासकीय सुट्टी, सणाची सुट्टी असेल आणि शनिवार, रविवार जोडून आला की मधला दिवस कामकाजाचा असतो त्यादिवशी दांडी मारायची अशी संस्कृती रुढ झालेली आहे की सलग चार-चार, पाच-पाच दिवस अधिकारी त्याठिकाणी नसतात व शासनाचे आणि महापालिकेचे प्रचंड नुकसान होते. कुठल्याही अधिका-यांना वाटत नाही की आपण आपले काम जबाबदारीने पार पाडावे. म्हणून अशाप्रकारचा पायंडा या महानगरपालिकेमध्ये पडलेला आहे. कुठल्याही प्रकारची परवानगी न घेता रजा टाकली जाते. प्रत्येक्षात जर नगररचना विभागात आपण गेलो तर ३ ते ५ ही वेळ नागरीकांसाठी दिलेली आहे पण त्याठिकाणी अधिकारी उपलब्ध नसतात. सकाळी गेलेतर अधिकारी व्हिजीटला गेले असे सांगण्यात येते. व्हिजीट बुकमध्ये पाहिलेतर त्यामध्ये कुठल्याही प्रकारची नोंद नसते वरिष्ठांची परवानगी न घेता सर्व्हेअर असतील, जे.ई. असतील ते आपल्या मनमानीप्रमाणे जीकडे जायच तीकडे जातात जे करायच ते करतात. त्यांना वाली कोणीही उरलेला नाही. व्हिजीट बुक पाहिलेतर त्यामध्ये काहीही तपशील नसतो. हा अत्यंत महत्वाचा विभाग आहे. सकाळी किती वाजता यायचे किती वाजता मिटींगला जायच, किती वाजता व्हिजीट करायची हे नियोजन ठरले पाहिजे. सर्व अधिका-यांना व्हिजीटसाठी वेळ ठरवून दयावी. एक तासामध्ये व्हिजीट करुन परत कामाला येवू शकतात. एक तास व्हिजीटला दयावी. त्यांच्या कामकाजासाठी दोन ते तीन तास दया, तुमच्या संदर्भातील ज्या काही महत्वाच्या मिटींग

आहेत त्यासाठी वेळ दया. आणि दुपारी ३ ते ५ या वेळेत फक्त नागरीकांचे काम होतील असे करावे. ब-याचवेळा असे निदर्शनास आलेल आहे की, सहा वाजल्यानंतर दोन विभाग चालतात. महापालिका बंद होते व बांधकाम परवानगी आणि नगररचना विभाग चालू असतात. संध्याकाळी सहा नंतर त्याठिकाणी विशिष्ठ लोक असतात. परंतु ३ ते ५ नागरीकांना वेळ दिली असेलतर, असे कोणते नागरीक आहेत शहरामध्ये की संध्या. ६ नंतर येवून त्याठिकाणी अधिका-याबरोबर बसून काम केली जातात. सहाच्या नंतर तुम्हांला काही काम करायचे असेलतर ते ओव्हरटाईम घेवून एक-दोन तास थांबून केले पाहिजे. त्यादिवशी आपण व्हिजीट केलेली आहे २७ तारखेपासून आजपर्यंतचा तपशील मी मागीतलेला होता. आपण त्याठिकाणी सांगीतल, पत्रकारांना सुध्दा सांगीतल की २७ तारखेपासून आजपर्यंत ज्यांनी परवानगी न घेता, रजा न घेता गैरहजर कर्मचारी आहेत त्यांच्यावर कारवाई करण्याचे आश्वासन आयुक्तानी पत्रकारांना दिलेले होत. या संदर्भात आपण काय कारवाई केलेली आहे याचा खुलासा करावा. तरच ख-या अर्थाने त्या कामाला चांगल्या प्रकारची पुर्तता येणार आहे, या संदर्भात खुलासा करावा अशी मी विनंती करतो.

**मा.साधना जाधव** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. माझ्या प्रभागामधील शाळे विषयी सांगते, गेली अडीच वर्षे पुर्ण झालेले आहे हा विषय मांडते २१ गुंठे जागा शाळेसाठीची ताब्यात आलेली आहे त्यावर कार्यवाही होत नाही. फक्त म्हणतात की बिल्डींग परमीशनला आहे पण आता आडीच वर्ष पुर्ण होवून सुध्दा बिल्डींग परमीशनवाले काही दखल घेत नाहीत. कुदळवाडीला अशी शाळा आहे त्याठिकाणी तुम्ही व्हिजीट मारा ती शाळा पडायला झालेली आहे आणि त्या शाळेला पत्रे आहेत वारे सुटल्यानंतर एवढी पत्रे वाजतात की मुलांच अभ्यासाकड लक्षच राहत नाही. बाथरुमची व्यवस्था नाही, मैदान व्यवस्थित नाही. कुदळवाडीच्या शाळेमध्ये मुलांना खुप त्रास सहन करावा लागतो. जर हे आरक्षण ताब्यात आलेली आहेत तर तुम्ही त्याच्यावर लवकरात लवकर बांधकामाची परवानगी घेवून शाळा लवकरात लवकर चालू करावी. आमच्या अडीच वर्षामध्ये शाळा तयार करावी म्हणजे तेथील मुलांना चांगले शिक्षण घेता येईल अशी विनंती करते.

**मा.कैलासभाऊ थोपटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. भूसंपादनाचा विषय आलेला आहे. मी गेल्या सात-आठ वर्षापासून रोडचे भूसंपादन करावे यासाठी प्रयत्न करत आहे. प्रत्येक विषय येथून पाठविला जातो परंतु त्याच्या पुढची कार्यवाही होते का नाही त्याकडे कोणाचेही लक्ष नसते, असा माझा नगररचना विभागावर एक आरोप आहे. मी सातत्याने सांगतो आमचा १८ मी. रस्ता त्यातला ९० टक्के ताब्यात आलेला आहे दहा टक्के ताब्यात आलेला नाही. त्याकरिता मी अनेकवेळा नगररचना विभागाकडे पाठपुरावा केलेला आहे. त्या विभागाकडून भूसंपादन ऑफीसकडे जो पाठपुरावा करायला पाहिजे तो केला जात नाही

त्याकरिता आपण फक्त आपल्या परिसराचा विकास करत असताना माझ्या प्रभागामध्ये आठ आरक्षण आहेत, आठ डी.पी.रोड आहेत. डी.पी. प्लॅनला आठरा ते एकोणावीस वर्षे झालेले आहे एकाही जागेचे भूसंपादन केलेले नाही त्याच कारण शोधल पाहिजे. नगररचना विभागाच्या कर्मचा-यांना या कामामध्ये इन्ट्रेस्ट नाही. त्यांना बिल्डरच्या कामामध्ये इन्ट्रेस्ट आहे, शेतक-यांच्या कामामध्ये इन्ट्रेस्ट नाही. शेतक-यानी त्यांच्या जागेची मोजणी केल्यानंतर, अभिप्राय मागण्यास गेलेतर सहा- सहा महिने अभिप्राय मिळत नाही, हे दुर्दैव आहे. आमच्याकडे गार्डनचे आरक्षण आहे. साधारणत: ते एक हेक्टर वीस आरचे आरक्षण आहे. असे असताना आपल्या नगररचना विभागाकडे त्याचा ताळमेळच लागत नाही. काही वेळेला म्हणतात आमच्याकडे १०० गुंठे जागा ताब्यात आलेली आहे, काही वेळेला म्हणतात ८० गुंठे जागा ताब्यात आलेली आहे. मी स्वत: भदाणे मॅडमकडे कमीत कमी  पन्नास वेळा गेलेलो असेल. तेथील शेतक-यांनी काही भाग ताब्यात दयावा यासाठी शेतक-यांना सुध्दा घेवून गेलो त्या शेतक-याचा अभिप्राय आपल्या नगररचना विभागाने कमीत कमी सहा महिने दिलेला नाही. आपण मास्टर प्लॅन कशाला तयार करतो. त्याची अंमलबजावणी व्हायला पाहिजे. त्याचे रिझल्ट लागले पाहिजे, नागरीकांना त्याचा फायदा झाला पाहिजे. भूसंपादनासाठी जे प्रस्ताव पाठवितो त्यातीत कमीत कमी दहा प्रस्ताव पाठविलेतर एक तरी पुर्ण शंभर टक्के सक्सेस झाला पाहिजे. गार्डनच्या संदर्भात मी आलेलो होतो त्याचे काय झाले. त्यानंतर राहाटणी गावचा काही पार्ट त्यासाठी अनेकवेळा मी पाठपुरावा केला पण ते भूसंपादना बाबतीत अडचणी सांगतात अणि त्याचा कोणीही पाठपुरावा करत नाहीत. तरी या दोन्ही संदर्भात मला खुलासा करावा.

**मा.अनिता तापकीर** -  मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. शाळेचा विषय निघालेला आहे. पवनानगर, काळेवाडी भागामध्ये  चार वर्षे झाले शाळेच बांधकाम चालू आहे परंतु ते अजून पुर्ण झालेले नाही. महापालिका शाळेमध्ये टॉयलेटची व्यवस्था नाही. बसण्यासाठी बेंचेस नाहीत, सतरंज्या नाहीत, वर्गाला खिडक्या सुध्दा नाहीत. आता थंडीचे दिवस आहेत. पवनानगरमध्ये चार वर्षे झाले शाळेचे बांधकाम चालू आहे ते कधी पुर्ण होणार आहे हे सांगावे.

**मा.शारदा बाबर**  - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मी यापुर्वी शाळेचे निवेदन दिलेले होते. आमच्या प्रभागात शाळेचा ऐरीया आहे तेथील मुलांना रोड क्रॉस करुन जावे लागते. यापुर्वी मी शाळा करण्यासाठी निवेदन दिलेले होते. आयुक्त साहेब, आपण सांगीतले होते मी व्हिजीट देतो म्हणून परंतु ती दिलेली नाही. शाळेच्या संदर्भात लवकरात लवकर आरक्षण पाहून काम करावे ही विनंती.

**मा.मंदाकिनी ठाकरे** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- प्रभाग २८ मासुळकर कॉलनी येथील आरक्षण क्र. ८० स.नं. १०९/११० उदयानाचे आरक्षण असून सदरचे क्षेत्र ०.८०

हेक्टर चौ.मी. आहे. तरी प्रस्तूत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १०६६ चे कलम १२६ व भूसंपादन अधिनियम १८९४ अन्वये तातडीने संपादन करणेकामी सदर आरक्षणाचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेत यावी.

**मा.सविता साळूंके** - मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.रामदास बोकड** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. या सभागृहामध्ये आल्यानंतर मी आठवण करुन देतो दोन वर्षे होवून गेले १९९४ चे माझे आरक्षण आहे, नगररचना विभागाकडे मी इतका पाठपुरावा केला की दिवसातून तीन ते चार वेळा मी त्यांच्या टेबलवर, त्यांच्या केबीनमध्ये जात होतो. आयुक्तांना मी सांगत होतो की ९४ चे आरक्षण आहे. मुलाना ती जागा खेळण्यासाठी लागते. जागा ताब्यात आलेली आहे त्याच्यानंतर त्यांनी काहीही विकासाचा प्रयत्न केलेला नाही. हे आरक्षण किती वर्षे ठेवायचे हे नगररचना आणि आयुक्त साहेब यांनी ठरवावे. आम्ही सांगतो त्याला काही किमंत राहीलेली नाही. त्याठिकाणी संबंधीत लोकांची मिटींग लावून खाजगी वाटाघाटीने का होईन त्यांना परतावा देवून ती जागा ताब्यात घेवून मुलांना खेळण्यासाठी उपलब्ध करुन देण्यास काही अडचण नाही त्यासाठी नगररचना आणि प्रशासन टाळाटाळ करते. त्यात त्यांना काय इन्ट्रेस्ट आहे हे माहित नाही. या विषयाचा प्रत्येक जी.बी.मध्ये आवाज उठविला परंतु नगररचना विभाग त्याची काही दखल घेत नाही. स्थापत्य विभागाशी पाठपुरावा केलातर त्यांचेकडून उत्तर येते की ती जागा ताब्यात आली. १५ गुंठे जागा आहे, ९ गुंठे जागा ताब्यात आलेली आहे. ६ गुंठे जागा ताब्यात यायची आहे. त्याठिकाणी ६०० विदयार्थी शिकतात, मुलानां बसण्यासाठी जागा नाही. ताब्यात जागा आलेली असताना सुध्दा लक्ष दिले जात नाही. त्याठिकाणी शाळेची इमारत मंजूर असताना देखील विदयार्थी शिक्षणापासून वंचीत आहेत. मग आम्ही बोलतो त्याला काही किमंत आहे का नाही, याची दखल प्रशासन घेणार का नाही. खरंतर आम्ही आता जी.बी.मध्ये बोलायचच टाळलेल आहे. कारण बोलून काहीच उपयोग नाही येथून बाहेर गेले की सर्व विसरुन जातात. मला भदाणे मॅडमला विनंती करायची आहे मी आपल्याला कळकळीची विनंती केलेली आहे की त्या आरक्षणाचा जाणीवपुर्वक विचार होत नाही. त्याला जबाबदार आपले डिपार्टमेंट आहे. आपल्याकडून कारवाई होत नाही म्हणून स्थापत्य विभाग काम करत नाही. आपण जागा ताब्यात दयावी, स्थापत्य विभाग डेव्हलप करेल. नगररचना विभागाने टाळाटाळ केलीतर १० वर्षे ते आरक्षण ताब्यात येणार नाही. महापौरांचा जुना वॉर्ड आहे त्यांना त्याची कल्पना आहे. आता निवडणूका संपलेल्या आहेत, कारण सांगण्यासाठी शिल्लक राहीलेली नाही, आचारसंहिता नाही. २०१५ येण्याऐवजी ३१ डिसेंबर २०१४ पर्यंत या गोष्टीचा निर्णय केलातर प्रशासनाचे अभिनंदन करुन स्वागत करेल. मुलांच्या शिक्षणासाठी प्रशासन चांगला निर्णय घेतला म्हणून मी त्याच निश्चितपणे समाधान मानेल. धन्यवाद.

**मा.अजय सायकर** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पत्रकार बंधुनो. एक ते दिड वर्षापुर्वी सन्मा.शिक्षणमंडळ सदस्य, विष्णूपंत नेवाळे आणि मी शाळेच्या भूसंपादनाच्या संदर्भात प्रशासनाला पत्र दिलेले होते. नेवाळेवस्ती शाळा नं. ८८, आमचे सहकारी बोकड साहेबांनी जे सांगीतल त्यांच्या बोलण्यात आणि माझ्या बोलण्यात काही फरक नाही. आमच्याही शाळेची तीच अवस्था आहे. नेवाळे मंडळी ही जागा देण्यासाठी तयार आहेत, ते का थांबले हे समजत नाही. विष्णूपंत नेवाळे आणि आमचे पत्र सुध्दा मिळालेले आहे तरी यामध्ये लक्ष घालावे आणि लवकरात लवकर ताबा घेतलातर इमारत बांधुन मुलांना चांगल्या प्रकारचे शिक्षण देवू शकू, धन्यवाद.

**मा.प्रभाकर वाघेरे** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - मौजे पिंपरी वाघेरे येथील आरक्षण क्र. १७४ प्राथमिक शाळा यासाठी आरक्षीत असून म.प्रा. व अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूसंपादन अधिनियम १८९४ अन्वये तातडीने संपादन करणेकामी भूसंपादन प्रस्तावास मान्यता देणेत यावी.

**मा.शत्रुघ्न काटे** - मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.संजय काटे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. प्राथमिक आणि माध्यमिक शाळेच्या भूसंपादना विषय येथे आलेला आहे. माझ्या प्रभागात बोपखेल गावामध्ये महापालिकेची शाळा आहे त्याच्यामध्ये ब-याचशा खोल्या मोकळया आहेत त्याठिकाणी माध्यमिक शाळा चालविता येईल. सदरची गोष्ट मी तत्कालीन शिक्षणाधिकारी यांच्या लक्षात आणून दिलेली होती परंतु त्यांनी काही लक्ष दिलेल नाही आणि ते तसंच पेन्डीग पडलेल आहे माझ्या प्रभागातील माध्यमिक शाळा लवकरात लवकर सुरु करावी अशी मी विनंती करतो. बोपखेल परिसरामध्ये दहा ते बारा हजार लोकसंख्या आहे. परिसर वाढण्यासाठी त्याठिकाणी स्कोप नाही अशा परिसरामध्ये शाळेचे किती आरक्षण असावेत महापालिकेची एक शाळा व खाजगी दोन अशा त्याठिकाणी तीन शाळा चालू आहेत. आणखीन पांच शाळेचे त्याठिकाणी आरक्षण आहे. कुठला कायदा लावला, कशा पध्दतीने आरक्षण टाकले हे लक्षातच येत नाही. ते आरक्षण बदल करुन योग्य जे करणे गरजेचे आहे त्यात बदल करुन तसा प्रस्ताव करावा अशी याठिकाणी मी सूचना करतो, धन्यवाद.

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ५८१ विषय क्रमांक - १४

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/वाकड/१९८/२०१३, दि.२३/१२/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.७ दि.११/०८/२०१४

पिंपरी चिंचवड शहराच्या शासन निर्णय क्रटीपीएस - १८९३/१२७६/सीआर-१७४/९३/ युडी-१३, दिनांक १८ सप्टेंबर १९९५ अन्वये मंजूर विकास योजनेत व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग अधिसूचना क्र.टीपीएस-१८९३/१४१२/युडी-१३, दिनांक २८ नोव्हेंबर १९९५ अन्वये मंजूर तथापि महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग अधिसूचना क्र.पीसीएन-१६९७/९३४/प्र.क्र.८९/नवि-२२, मंत्रालय, मुंबई दिनांक १५ नोव्हेंबर १९९७ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेमध्ये समाविष्ट करण्यात आलेले तसेच शासन निर्णय क्र.टीपीएस - १८०६/१४१/प्र.क्र.१९८६/२००९/नवि-१३, दिनांक २९ मे २०१० अन्वये फेरबदल प्रस्तावानुसार मंजूर विकास योजनेतील खालील तक्त्यात दर्शविलेल्या प्रस्तावित आरक्षणाचे भूसंपादन त्वरित करणे करीता संदर्भिय पत्रान्वये मा.नगरसदस्या यांनी कळविले आहे.

| न अ. क्र. | आरक्षण क्रमांक | आरक्षणाचे प्रयोजन | स.नं. | बाधित होणारे संपादन करावयाचे एकूण सुमारे क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| १ | आरक्षण क्र.३९४ | माध्यमिक शाळा | स.नं.२४५ पैकी, २४६ पैकी व २४७ पैकी | १००००.०० चौ.मी. |
| २ | आरक्षण क्र.३९६ | प्राथमिक शाळा | स.नं.२३१ पैकी. | २०००.०० चौ.मी. |

तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूसंपादन अधिनियम १८९४ अन्वये तातडीने संपादन करणेकामी सदर आरक्षणाचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग २८ मासुळकर कॉलनी येथील आरक्षण क्र. ८० स.नं. १०९/११० उदयानाचे आरक्षण असून सदरचे क्षेत्र ०.८० हेक्टर चौ.मी. आहे. तरी प्रस्तूत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना

अधिनियम १०६६ चे कलम १२६ व भूसंपादन अधिनियम १८९४ अन्वये तातडीने संपादन करणेकामी सदर आरक्षणाचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे तसेच मौजे पिंपरी वाघेरे येथील आरक्षण क्र १७४ प्राथमिक शाळा यासाठी आरक्षीत असून म.प्रा. व अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूसंपादन अधिनियम १८९४ अन्वये तातडीने संपादन करणेकामी भूसंपादन प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ५८२ विषय क्रमांक - १५

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे पत्र क्र.बक्षेका/२/कावि/७९/२०१४,

दि.३१/०७/२०१४

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.८ दि.११/०८/२०१४

मा.ब प्रभाग समिती सभा ठराव क्र.७ दिनांक १८/०६/२०१४ नुसार थेरगाव येथील सामाजिक कार्यकर्ते नागुभाऊ गतिराम बारणे यांनी सन १९८९ साली महानगरपालिकेला शाळा बांधण्यासाठी १० गुंठे जागा विनामोबदला दिली होती. मागील वर्षी दिनांक २५/०६/२०१३ मध्ये त्यांचे निधन झाले. शाळेच्या परिसरामध्ये त्यांचे स्मरणार्थ अर्धपुतळा बनविणेबाबतचा संपुर्ण खर्च तसेच चौथा-याचा खर्च बारणे कुटूंब करण्यास तयार असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच श्री.नागुभाऊ गतिराम बारणे सामाजिक कार्येकर्ते थेरगांव यांचा अर्धपुतळा बारणे कुटूंबियांनी स्वखर्चाने बनविला असुन त्याचा कोणत्याही प्रकारचा आर्थिक बोजा मनपावर पडणार नसल्याने तो थेरगांव येथील नागू बारणे प्राथमिक शाळा, थेरगांव मुले/मुली या शाळेत बसविण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १६

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/११/चिंचवड/१६८/२०१४, दि.०२/०८/२०१४

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.९ दि.११/०८/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील चिंचवड येथील सर्व्हे नं.२५४ ते २५८ या मनपाच्या मालकीच्या जागेवर BSUP योजनेअंतर्गत झोपडपट्टीचे जागेवर पुनर्वसन प्रकल्प मनपा राबवित आहे. सदर प्रकल्पामध्ये एकूण ६७२ गाळे (६ इमारती) बांधावयाचे आहेत. या पैकी ५ इमारतींचे बांधकाम पूर्णत्वास आलेले आहे. विषयाधिन जागेवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन १९७८ चे मंजूर विकास योजनेनुसार आ.क्र.१३१ भाजी मंडई व शॉपिंग सेंटर, आ.क्र.१३२ खेळाचे मैदान, आ.क्र.१२५ माध्यमिक शाळा, आ.क्र.१२६ प्राथमिक शाळा, आ.क्र.१२७ उद्यान, या प्रयोजनाची आरक्षणे होती. उक्त आरक्षणांची जागा भूसंपादन कायद्यान्वये १९८६ साली महानगरपालिकेच्या ताब्यात मिळाल्या आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन १९९५ च्या सुधारित मंजूर विकास योजनेनुसार या ठिकाणी आरक्षण क्र.२५३ अन्वये माध्यमिक शाळा व आरक्षण क्र.२५४ अन्वये प्राथमिक शाळा आणि आरक्षण क्र.२५१ अन्वये भाजीमंडईसाठी या प्रयोजनासाठी आरक्षणे कायम केली आहेत. तदनंतर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ प्रमाणे शासन निर्णय क्र.टीपीएस-१८९८/६४/प्र.क्र.७/९८/नवि-१३, दि.२२ जून १९९८ अन्वये " माध्यमिक व प्राथमिक शाळेसाठी " आरक्षित जागा मैलाशुध्दीकरण प्रकल्प या प्रयोजनार्थ वापरणेस्तव आरक्षणाचे प्रयोजनात बदल करण्याचा फेरबदलाचा प्रस्ताव शासनाने मंजूर केला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिककेने आरक्षण क्र.२५१ भाजी मंडई आरक्षणाचे एकूण ४७०१.६० चौ.मी. क्षेत्रामधील ३१४९.८६ चौ.मी.क्षेत्रात बी.एस.यु.पी. योजनेअंतर्गत ३ इमारतीचे बांधकाम केले असून भाजी मंडई आरक्षणासाठी १५५१.७४ चौ.मी.क्षेत्र कायम ठेवले आहे. तसेच आरक्षण क्र.२५३ मैलाशुध्दीकरण केंद्राचे एकूण २४८२१.५० चौ.मी. क्षेत्रामधील ५२३७.२३ चौ.मी.क्षेत्रावर बी.एस.यु.पी.योजनेअंतर्गत ३ इमारती प्रस्तावित केल्या असून त्यापैकी २ इमारतींचे काम केले आहे. शासन निदेश दि.२४/१२/२००८ व शुध्दीपत्रक दि.२०/०५/२०१० यास अनुसरुन महानगरपालिका बी.एस.यु.पी. योजनेसाठी २.५ एफ.एस.आय. अनुक्षेय करुन योजना राबवू शकते. परंतु पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने बीएस.यु.पी. योजना मंजूर विकास योजनेच्या आरक्षित जागेवर राबविल्यामुळे सदर प्रकल्पातील इमारतींना भोगवटापत्र देण्यास कायदेशिर

अडचणी येत आहेत. त्यामुळे या प्रकल्पातील सदनिका लाभार्थींना वाटप करणे शक्य होत नाही. सदर प्रकल्पाबाबत मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.७४/२०१३ दाखल आहे. सदर प्रकल्प पुर्णत्वास नेण्यासाठी व लाभार्थींना घरकुले वाटप करणे शक्य होण्यासाठी मंजूर विकास योजनेत फेरबदलाची कार्यवाही करुन प्रकल्पाची जागा आरक्षणातून वगळून निवासी विभागात समाविष्ट करणे क्रमप्राप्त आहे. सबब मौजे चिंचवड स.न.२५४, २५५ पैकी (सि.स.नं.४५०९, ११९३ पैकी) मधील आरक्षण क्र.२५१ भाजी मंडई या एकूण आरक्षणाचे ४७०१.६० चौ.मी.क्षेत्रापैकी बी.एस.यु.पी. योजने अंतर्गत प्रकल्प राबविलेले ३१४९.८६ चौ.मी.क्षेत्र आरक्षणातून वगळून निवासी विभागात समाविष्ट करणे आणि स.नं. २५६, २५७, २५८ पै (सि.स.नं.११९३ ते ११९७ पै) मधील आरक्षण क्र.२५३ मैलाशुध्दीकरण केंद्र क्षेत्र २४८२१.५० चौ.मी. या मधील प्रकल्प भूखंड क्षेत्र ५२३७.२३ चौ.मी. यामधील पवना नदीचे निळी पुररेषेतील ४२५.८७ चौ.मी. क्षेत्र वगळून उर्वरित क्षेत्र प्रकल्प भूखंडाचे उत्तरेकडील ४२५.८७ चौ.मी.असे एकूण ५२३७.२३ चौ.मी. क्षेत्र आरक्षणातून वगळून निवासी विभागात समाविष्ट करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची प्रक्रीया मा.महापालिका सभेच्या मंजूरीने कार्यान्वयीत करणे क्रमप्राप्त आहे. मंजूर विकास योजनेत प्रस्तावित करावयाचे फेरबदल दर्शविणारा विकास योजनेचा भाग नकाशा माहितीसाठी प्रस्तावा सोबत जोडला आहे. यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीचे सुधारित मंजूर विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास, फेरबदलाची सर्व वैधानिक कार्यवाही करुन फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करण्यास आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.सभागृह, याठिकाणी या प्रकल्पाच्या विरोधात मी स्वत: हायकोर्टामध्ये पिटीशनर आहे. खरंतर साहेब, प्रशासनाचा खरा चेहरा आता समोर येतो. आमचे बांधकाम झालेले असतीलतर आमचे आरक्षण बदलता येत नाहीत आणि तुम्ही केलेल्या चुकावर मात्र तुम्हांला सोईस्करपणे पांघरुण घालता येते. या जागेवरचे आरक्षण एकदा बांधकाम झाल्यानंतर नियमीत करता येत नाहीत व त्या संदर्भातील ३७ ची कार्यवाही करता येत नाही. याची बांधकाम परवानगी देताना पासून या प्रकल्पामध्ये अनेक त्रुटी आणि मोठा भ्रष्टाचार याठिकाणी झालेला आहे आणि म्हणून हायकोर्टात दाद मागीतलेली आहे. मला सांगावे आयुक्त साहेब, आतापर्यंत किती आरक्षणा संदर्भात आपण हायकोर्टात गेलात, ज्या ठिकाणी गोरगरीबांनी घरे बांधलेली आहेत. तुम्ही केलेल्या चुकावर आम्ही पांघरुन घालायच का. २५ कोटीचे काम आपण डायरेक्ट दिलेले आहे. आज एका ईमारतीसाठी आपण निवीदा काढलेली आहे. आपण केलेल्या अनधिकृत कामाना आम्हांला कोर्टात जावुन दाद मागावी लागते

आणि मग प्रशासनाचे डोळे उघडल्या जातात. साहेब, येथे आपण काहीजरी केलतरी तिथे मात्र मीच आहे. मी आजपर्यंत हायकोर्टात अशी कोणती मागणी केलेली नाही. मे.कोर्टाचा पुर्णपणे आदर करुन आणि माझे अधिकार अबाधित ठेवून कोर्टने सुध्दा तुमच्या निदर्शनास आणून दिले. तुम्ही गुन्हे करायचे आणि आम्ही का लपवायचे. महापौर साहेब, आपण ज्या भागात राहतात त्या भागावरती अनेक आरक्षणावर बांधकाम झालेले आहेत ते प्रशासन काढणार का ? ना बांधकाम ठेवू शकणार, ना प्रशासन असा प्रस्ताव ठेवणार. आणि असे विषय आल्यानंतर तुम्ही मात्र बिनबोभाट मंजूरी देताय. मा.महापौर साहेब, आपण माहिती घेता का ? या विषयात काय झालेले आहे, कोर्टाने काय सांगीतले, कोणत्या स्टेजला आहे याची माहिती आपण न घेता डायरेक्ट मंजूर म्हणता. मा.महापौर, या शहरात तुम्हांला प्रशासन निवडून देत नाही, या शहरामधील सर्वसामान्य नागरीक निवडून देतो. आणि त्या नागरीकांनी जर चुकून-माकून आरक्षणावर बांधकाम केलेले असतीलतर त्यांचे बांधकाम पाडण्यासाठी मागच्या सभेत आपण पोलीस फोर्स नेमण्यास मंजूरी दिलेली आहे. मला हायकोर्टाचं कधी कधी कौतूकच वाटतंय. आणि खास करुन प्रशासन म्हणून तुमच. एकीकडे हायकोर्टाने सर्वसामान्यांचे बांधकाम तोडा म्हणून १५० लोक नेमायचे तुमच्यावर निर्बंध लादले, आणि नाही केलतर महापालिका बरखास्त का करु नये म्हणून तुमच्यावर नोटीस बजावली. त्याठिकाणी तुम्हांला बळजबरी का होईना, तूमच नाक दाबून तोंड उघडायला हायकोर्टाने भाग पाडलं. आणि दुसरीकडे मात्र तुम्ही तुमच्याच कामामध्ये हेरफेर करुन कोर्टापुढे खोटया माहित्या सादर करुन आपण अशाप्रकारचे विषय सभागृहापुढे आणता. सांगायच तात्पर्य एकच आहे की जे नियम तुम्ही स्वत:साठी करता तुमचा भ्रष्टाचार लपवण्यासाठी करता, तुमचा खोटेपणा लपवण्यासाठी करता, तो आमच्या सर्वसामान्य नागरीकांसाठी एकदातरी करुन बघा, ते आपण करणार नाहीत. या सगळया विषयामध्ये आपण एकदम तातडीने, उत्साहाने आपण सहभागी होता. मा.महापौर साहेब, ज्या दिवशी या बीएसयुपी प्रकल्पाची बांधकाम परवानगी दिली त्या दिवसापासून मी या प्रकल्पाचा पाठपुरावा करते. काय करणार अधिका-यावर कारवाई. काही कारवाई केलेली नाही. कारवाई करायला पाहिजे होती. तुम्ही असेच करणार असालतर मी सुध्दा तेवढयाच ताकदीने या विषयाच्या पाठिशी लागणार आहे. मा.महापौर साहेब, माझा काही बांधाला बांध आहे म्हणूनचा विषय नाही, परंतु नियम जसा तुमच्यासाठी आहेना तसाच सर्वसामान्य नागरीकांसाठी सुध्दा आहे. त्यांच्यासाठी तुम्ही काहीच करत नाही. परवा तुम्ही अनधिकृत बांधकाम पाडायचे म्हणून बैठक घेतली. एकीकडे बैठक घेतो आणि दुसरीकडे हरकती, सूचना मागवतो, नेमक करायच काय हे तुम्हांलाही माहिती नाही. एक काय ते ठरवा नां साहेब. एकीकडे पोलीस फोर्स नेमला, हायकोर्टाला आपण माहिती दिली त्यांचा पगार या महिन्यापासून चालू झाला असेल. हे बांधकाम होवू नयेत म्हणून ते १५० लोक नेमले आहेत. नवीन बांधकाम जे होतातना सरसगट अनधिकृतपणे ते थांबवा. पाडायच काय ते नंतर करा. पण ते होवू नयेत म्हणून बघा. आणि

अशाप्रकारच तुम्हीजर का हे लादणार असालना तर याचा दाखला देवून ज्यांचे ज्यांचे आरक्षणावर घर आहेत त्यांच्यासाठी मी सुध्दा कोर्टात दाद मागणार आहे. धन्यवाद.

**मा.आर.एस.कुमार** - मा.महापौर साहेब, हा विषय शहर सुधारणा समितीमध्ये आलेला होता. त्यावेळी आम्ही विषय मांडला होता आणि त्याला तेथे अधिका-यांनी उत्तर दिलं नाही. भाजीमंडई आणि मैला शुध्दीकरण केंद्राचे आरक्षण यामध्ये पाच बिल्डींग उभ्या आहेत. बिल्डींग परमीशन दयायच्या अगोदर आरक्षीत जागेवर बांधकाम करतो हे त्यावेळेसच्या अधिका-यांनी बघीतले नाही का ? आरक्षीत जागेवर महापालिका करोडो रुपये खर्च करुन बांधकाम कशी करते, बिल्डींग परमीशन कसे दिलेले आहे. आम्ही कमिटीमध्ये त्या अधिका-यांना विचारले, त्या अधिका-यावर कारवाई झाली का ? कोर्टात केस सुरु करायच्या अगोदर तूमच्या लक्षात आणुन दिले त्यावेळेला इन्क्वॉयरी का केलेली नाही, एवढया मोठया चुका. जर एखादया प्रायव्हेट माणसाने आरक्षणावर बांधकाम केले असतेतर तुम्ही ते पाडले असते. असे अनेक बांधकाम तुम्ही पाडलेले आहेत मग तुम्ही केलेली चुक कशी काय माफ करायची. ३७ चे मॉडीफिकेशन केल्याशिवाय बिल्डींग परमीशन दिलीच कशी ? याचे उत्तर पाहिजे. शहर सुधारणा समितीमध्ये काय सांगीतले याचा निर्णय आम्ही देवू शकणार नाही, हा विषय जी.बी.मध्ये येणार, त्यावेळेस तुम्ही कमीशनरांना विचारा. मग आता विषय मंजूर केलातर आम्हांला कुठल्या प्लॅटफॉर्ममध्ये उत्तर मिळणार. एवढ मोठ २५ कोटीच बांधकाम बिल्डींग परमीशन घेवून हे बांधकाम बांधता, बिल्डींग परमीशन घेताना माहिती पडल नाही का ? तुम्ही पब्लिकच्या विषयामध्ये नगररचना विभागाचा अभिप्राय घेता प्रत्येक प्लॅनला खाली लिहून पाठविता अभिप्राय घ्या. मग यामध्ये घेतला का ? घेतला असेलतर नगररचना विभागाने काय अभिप्राय दिला. खालच्या अधिका-यांनी सांगीतले या संदर्भात आयुक्तांकडे मिटींग झाली आणि त्याठिकाणी हे बिल्डींग परमीशनने पास करावे म्हणून सांगीतले, अशा किती चुका केलेल्या आहेत. चोरी एकदा पकडली म्हणून आमच्या लक्षात आलं. पण अशा किती चुका बिल्डींग परमीशनने केल्या. याच मला तुमच्याकडून उत्तर पाहिजे. त्यावेळेला जे बिल्डींग परमीशन मध्ये अधिकारी होते त्यांच्याकडून खुलासा पाहिजे आरक्षण असताना तुम्ही बिल्डींग परमीशन दिले कसे ? नागरीकांना एक रुल आणि तुम्हांला एक रुल कसा काय ? किती अंदाधुंदी कारभार आहे हा. मॅडम कोर्टात जाऊ शकल्या आम्ही जाऊ शकत नाहीत, कारण आम्ही रुलींग पार्टीमध्ये आहोत. बिल्डींग परमीशन आरक्षीत जागेवर कसे काय दिले ? कोर्टाच्या निर्णयाबद्दल मी कमिटमेंट करु शकत नाही. तुम्हांला आता कोर्टाने ३७ करायला सांगीतले आहे. या विषयावर आता या सभागृहात उत्तर पाहिजे. तुम्ही बिल्डींग परमीशन कसे पास केले ? ३७ चे मॉडीफिकेशन केल्याशिवाय कसे काय पास केले. संबंधीत अधिका-यांवर काय कारवाई करणार हे सुध्दा सांगीतल पाहिजे.

**मा.आयुक्त** - मा.महापौर मॅडम, सन्मा.सभागृह. या विषयी मी सभागृहात सांगू इच्छितो की मा.उच्च न्यायालयाच्या सूचनेप्रमाणे हा विषय आणलेला आहे. वस्तुस्थिती आहे की सन्मा.सदस्य मॅडमनी मा.उच्च न्यायालयात रिट पिटीशन केलेले होते. बीएसयूपी अंतर्गत घरे बांधण्यासाठी आणि त्याच्या मागचा उद्देश चांगला असल्यामुळे मा.उच्च न्यायालयाने झालेल्या गोष्टी रेग्यूलराईज करुन घ्या असे सांगीतल्यामुळे हा विषय सभागृहापुढे आणलेला आहे सन्मा.सदस्यांना विनंती आहे की या मागची भावना बघुन आपण तो मंजूर करावा. माझी सन्मा.सदस्यांना विनंती आहे की काही मॅटर मा.उच्च न्यायालया समोर गेल्यानंतर परत आपण त्यावर जास्त ऊहापोह करणे योग्य नाही.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हायकोर्टात गेले म्हणून इन्क्वॉयरी करायची नाही असं कुठ आहे का ? असे कोर्ट सांगत नाही.

**मा.आयुक्त** - मा.महापौर मॅडम**,** माझी सभागृहाला विनंती आहे की आपण सार्वभौम आहात. हा ठराव मंजूर करताना तुम्ही कन्डीशनल केलातर प्रशासन म्हणून नक्कीच मी तुमच्या निर्णयाची अंमलबजावणी करेल.

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह. आयुक्त साहेब तुम्ही †फेडेव्हीट काय केल, की हाय कोर्टाला असं वाटल याच ३७ कराव म्हणून. जसं त्यांचे †फेडेव्हीट पॉवरफुल आहे तसे †फेडेव्हीट शहरातील नागरीकांसाठी का केले गेलेले नाही ? शहरासाठी का केले गेलेल नाही ? सर्वसामान्य नागरीकांसाठी कोर्टात जाव, एखाद असं †फेडेव्हीट दाखल कराव असं का वाटल नाही ?

**मा.आयुक्त -** मा.महापौर मॅडम, अनधिकृत बांधकामाच्या दोन्ही बाजू सांगीतल्या. काही गोष्टी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करताना करतो आहोत, काही गोष्टीत शासनाने नेमलेल्या कमिटीचा सदस्य म्हणून शहराचे काही सामाजीक प्रश्न असतील, अनधिकृत बांधकामाचे प्रश्न असतील त्याही बाबतीत मी माझी भूमिका अतीशय प्रामाणीकपणे पार पाडतो एवढच सांगतो. शासनाने दिलेले कामही मी करतो आणि मा.उच्च न्यायालयाने दिलेले कामही करतो एवढच माझ म्हणण आहे.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, सन्मा.हायकोर्टाने सांगीतल्यामुळे आपण ३७ ची कार्यवाही करतो आहोत. माझी सभागृहाला अशी विनंती असेल की शहरामध्ये जेवढे आरक्षणावरती बांधकाम आहेत त्याच्या संदर्भात सुध्दा महानगरपालिकेनी स्वतःच †फेडेव्हीट दाखल कराव. आणि त्या संदर्भात सुध्दा हरकती व सूचना मागवाव्यात. जेणेकरुन लोकांच्या डोक्यावरती जी काही अनधिकृत बांधकामाची टांगती तलवार आहे त्यातून तात्पुरती सुटका होईल. याचा डीपीआर आहे आपण जो प्लॅन टाकला आहे तो फेल होवून येवू नये म्हणून त्याच्यामध्ये तत्कालीन आयुक्त अशिष शर्मा यांनी आणि त्यांच्या टिमने केलेल हे काम आहे. २५ कोटीच

बांधकाम आपण डायरेक्ट दिलेल आहे. आता आपण रिटेंडर केल, रिटेंडर कस करणार टेंडरच केलेल नाही.

मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते २०/९/२०१४ रोजी तहकूब सभेचे विषय क्र.१६ मध्ये मनपा न्यायालयामध्ये मनपा राबवत असलेल्या गृहप्रकल्पामध्ये बांधकाम नियमीत व्हावे म्हणून कोर्टामध्ये जसे †फेडेव्हीट केले आहे तसेच त्यांनी मनपा हद्दीमध्ये आरक्षणावरती असलेल्या बांधकामा संदर्भात BSUP Link Road सारखे †फेडेव्हीट देवून कलम ३७ ची कारवाई करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.आशा शेंडगे** - मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देते.

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब, वास्तविक पाहता प्रशासनाकडून झालेली ही खुप मोठी चुक आहे. आणि प्रशासनाने केलेली चुक ही माफ करावी आणि इतरांची माफ नाही करावी अस नाही, नागरीकांचीही बांधकाम पडू नयेत यासाठी साहेब सुध्दा त्या समितीमध्ये आहेत. माझी सदस्यांना विनंती आहे की आपल्याला ज्या सुचना दयायच्या आहेत त्या आपण आता दयाव्यात. वास्तविक पाहता या सभागृहाने १६/८/२०१४ ला १ के खाली या विषयाला मंजूरी दिलेली आहे. माझी सभागृहाला विनंती आहे की आता कुमार साहेबांनी जी सूचना दिली किंवा सिमाताईनी जी सूचना दिली त्यामध्ये आपल्याला काही अधिकृत करता येते का हे मा.आयुक्त साहेब, आपण त्या समितीमध्ये सदस्य आहात ते निश्चित करावे. आणि माझी सभागृहाला अशीही विनंती आहे की, हा विषय पुन्हा सजेशन ऑब्जेक्शन घेवून सभागृहापुढे याव लागतं त्यामुळे मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- ३७ फेरबदलाची मान्यता देण्यात येत आहे व सदर विषयाबद्दलच्या हरकती, सूचना मागवून मु.प्रां. अधिनियम १९६१ प्रमाणे नियमानुसार ३७/१ ची कारवाई पुर्ण करुन सदरचा विषय पुन्हा सर्वसाधारण सभेसमोर न आणता सदरचा अधिकार मा.आयुक्त यांना सर्वानुमते देण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.किरण मोटे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, दोन्ही उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ५८३ विषय क्रमांक - १६

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/११/चिंचवड/१६८/२०१४, दि.०२/०८/२०१४

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.९ दि.११/०८/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील चिंचवड येथील सर्व्हे नं.२५४ ते २५८ या मनपाच्या मालकीच्या जागेवर BSUP योजनेअंतर्गत झोपडपट्टीचे जागेवर पुनर्वसन प्रकल्प मनपा

राबवित आहे. सदर प्रकल्पामध्ये एकूण ६७२ गाळे (६ इमारती) बांधावयाचे आहेत. या पैकी ५ इमारतींचे बांधकाम पूर्णत्वास आलेले आहे. विषयाधिन जागेवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन १९७८ चे मंजूर विकास योजनेनुसार आ.क्र.१३१ भाजी मंडई व शॉपिंग सेंटर, आ.क्र.१३२ खेळाचे मैदान, आ.क्र.१२५ माध्यमिक शाळा, आ.क्र.१२६ प्राथमिक शाळा, आ.क्र.१२७ उद्यान, या प्रयोजनाची आरक्षणे होती. उक्त आरक्षणांची जागा भूसंपादन कायद्यान्वये १९८६ साली महानगरपालिकेच्या ताब्यात मिळाल्या आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन १९९५ च्या सुधारित मंजूर विकास योजनेनुसार या ठिकाणी आरक्षण क्र.२५३ अन्वये माध्यमिक शाळा व आरक्षण क्र.२५४ अन्वये प्राथमिक शाळा आणि आरक्षण क्र.२५१ अन्वये भाजीमंडईसाठी या प्रयोजनासाठी आरक्षणे कायम केली आहेत. तदनंतर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ प्रमाणे शासन निर्णय क्र.टीपीएस-१८९८/६४/प्र.क्र.७/९८/नवि-१३, दि.२२ जून १९९८ अन्वये “ माध्यमिक व प्राथमिक शाळेसाठी ” आरक्षित जागा मैलाशुध्दीकरण प्रकल्प या प्रयाजनार्थ वापरणेस्तव आरक्षणाचे प्रयोजनात बदल करण्याचा फेरबदलाचा प्रस्ताव शासनाने मंजूर केला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिककेने आरक्षण क्र.२५१ भाजी मंडई आरक्षणाचे एकूण ४७०१.६० चौ.मी. क्षेत्रामधील ३१४९.८६ चौ.मी.क्षेत्रात बी.एस.यु.पी. योजनेअंतर्गत ३ इमारतीचे बांधकाम केले असून भाजी मंडई आरक्षणासाठी १५५१.७४ चौ.मी.क्षेत्र कायम ठेवले आहे. तसेच आरक्षण क्र.२५३ मैलाशुध्दीकरण केंद्राचे एकूण २४८२१.५० चौ.मी. क्षेत्रामधील ५२३७.२३ चौ.मी.क्षेत्रावर बी.एस.यु.पी.योजनेअंतर्गत ३ इमारती प्रस्तावित केल्या असून त्यापैकी २ इमारतींचे काम केले आहे. शासन निदेश दि.२४/१२/२००८ व शुध्दीपत्रक दि.२०/०५/२०१० यास अनुसरुन महानगरपालिका बी.एस.यु.पी. योजनेसाठी २.५ एफ.एस.आय. अनुक्षेय करुन योजना राबवू शकते. परंतु पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने बी.एस.यु.पी. योजना मंजूर विकास योजनेच्या आरक्षित जागेवर राबविल्यामुळे सदर प्रकल्पातील इमारतींना भोगवटापत्र देण्यास कायदेशिर अडचणी येत आहेत. त्यामुळे या प्रकल्पातील सदनिका लाभार्थींना वाटप करणे शक्य होत नाही. सदर प्रकल्पाबाबत मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.७४/२०१३ दाखल आहे. सदर प्रकल्प पुर्णत्वास नेण्यासाठी व लाभार्थींना घरकुले वाटप करणे शक्य होण्यासाठी मंजूर विकास योजनेत फेरबदलाची कार्यवाही करुन प्रकल्पाची जागा आरक्षणातून वगळून निवासी विभागात समाविष्ट करणे क्रमप्राप्त आहे. सबब मौजे चिंचवड स.न.२५४, २५५ पैकी (सि.स.नं.४५०९, ११९३ पैकी) मधील आरक्षण क्र.२५१ भाजी मंडई या एकूण आरक्षणाचे ४७०१.६० चौ.मी.क्षेत्रापैकी बी.एस.यु.पी. योजने अंतर्गत प्रकल्प राबविलेले ३१४९.८६ चौ.मी.क्षेत्र आरक्षणातून वगळून निवासी विभागात समाविष्ट करणे आणि स.नं. २५६, २५७, २५८ पै (सि.स.नं.११९३ ते ११९७ पै) मधील आरक्षण क्र.२५३ मैलाशुध्दीकरण केंद्र क्षेत्र २४८२१.५० चौ.मी. या मधील प्रकल्प भूखंड क्षेत्र ५२३७.२३ चौ.मी. यामधील पवना नदीचे निळी पुररेषेतील ४२५.८७ चौ.मी. क्षेत्र वगळून उर्वरित क्षेत्र प्रकल्प भूखंडाचे उत्तरेकडील ४२५.८७ चौ.मी.असे एकूण ५२३७.२३

चौ.मी. क्षेत्र आरक्षणातून वगळून निवासी विभागात समाविष्ट करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची प्रक्रीया मा.महापालिका सभेच्या मंजूरीने कार्यान्वयीत करणे क्रमप्राप्त आहे. मंजूर विकास योजनेत प्रस्तावित करावयाचे फेरबदल दर्शविणारा विकास योजनेचा भाग नकाशा माहितीसाठी प्रस्तावा सोबत जोडला आहे. यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीचे सुधारित मंजूर विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास, फेरबदलाची सर्व वैधानिक कार्यवाही करुन फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करण्यास आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच २०/९/२०१४ रोजी तहकूब सभेचे विषय क्र.१६ मध्ये मनपा न्यायालयामध्ये मनपा राबवत असलेल्या गृहप्रकल्पामध्ये बांधकाम नियमीत व्हावे म्हणून कोर्टामध्ये जसे †फेडेव्हीट केले आहे तसेच त्यांनी मनपा हद्दीमध्ये आरक्षणावरती असलेल्या बांधकामा संदर्भात BSUP Link Road सारखे †फेडेव्हीट देवून कलम ३७ ची कारवाई करण्यास मान्यता देणेत येत आहे तसेच ३७ फेरबदलाची मान्यता देण्यात येत आहे व सदर विषयाबद्दलच्या हरकती, सूचना मागवून मु.प्रां. अधिनियम १९६१ प्रमाणे नियमानुसार ३७/१ ची कारवाई पुर्ण करुन सदरचा विषय पुन्हा सर्वसाधारण सभेसमोर न आणता सदरचा अधिकार मा.आयुक्त यांना सर्वानुमते देण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १७

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.उल्हास शेट्टी, मा.आर.एस.कुमार यांचा प्रस्ताव -

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.१० दि.११/०८/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आकुर्डी रुग्णालयामध्ये प्रसुतीगृह कुटूंबकल्याण, जन्ममृत्यू व दैनंदिन रुग्ण तपासणीची कामे केली जातात सदर रुग्णालय हे भविष्यात अपुरे पडणार असल्याने सदर भागात आणखी एक रुग्णालय होणे आवश्यक आहे. रुग्णालयाच्या लगत मनपाचे आ.क्र.२७१ माध्यमिक शाळा व आ.क्र.२६८ बेघरांसाठी घरे, दुकानदारांचे पुनर्वसन, दुकान केंद्रची काही जागा पूर्वी ताब्यात आलेली आहे. आ.क्र.२६८ बेघरांसाठी घरे, दुकानदारांचे पुनर्वसन, दुकान केंद्र तसेच ठेऊन आ.क्र.२७१ माध्यमिक शाळेच्या आरक्षणातील

दक्षिणेकडील ताब्यात आलेली जागा माध्यमिक शाळेच्या आरक्षणातून वगळून सदर जागेवर नव्याने दवाखान्याचे आरक्षण टाकण्यात यावे. वरील सर्व प्रकरणी म.प्रा. व न.र.अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव तयार करुन तो शासनास सादर करण्यास मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** - मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.मंदाकिनी ठाकरे** - मा.महापौर साहेब, मी पुढील प्रमाणे उपसूचना मांडते- प्रभाग २८ मासुळकर कॉलनी येथील आरक्षण क्र. ७७ व ७९ स.नं. १०९/११० असून सदरचे क्षेत्र अनुक्रमे ०.६४ हेक्टर चौ.मी. व ०.४४ हेक्टर चौ.मी. आहे ते बेघरासाठी घरे यासाठी आरक्षित आहे. सदर जागा महापालिकेच्या ताब्यात आहे. अधिनियम १९६६ ते कलम ३७ अन्वये फेरबदलचा प्रस्ताव तयार करुन तो शासनास सादर करण्यास मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.अपर्णा डोके -** मा.महापौर साहब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ५८४ विषय क्रमांक - १७

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.उल्हास शेट्टी, मा.आर.एस.कुमार यांचा प्रस्ताव -

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.१० दि.११/०८/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आकुर्डी रुग्णालयामध्ये प्रसुतीगृह, कुटूंबकल्याण, जन्ममृत्यू व दैनंदिन रुग्ण तपासणीची कामे केली जातात सदर रुग्णालय हे भविष्यात अपुरे पडणार असल्याने सदर भागात आणखी एक रुग्णालय होणे आवश्यक आहे. रुग्णालयाच्या लगत मनपाचे आ.क्र.२७१ माध्यमिक शाळा व आ.क्र.२६८ बेघरांसाठी घरे, दुकानदारांचे पुनर्वसन, दुकान केंद्रची काही जागा पूर्वी ताब्यात आलेली आहे. आ.क्र.२६८ बेघरांसाठी घरे, दुकानदारांचे पुनर्वसन, दुकान केंद्र तसेच ठेऊन आ.क्र.२७१ माध्यमिक शाळेच्या आरक्षणातील दक्षिणेकडील ताब्यात आलेली जागा माध्यमिक शाळेच्या आरक्षणातून वगळून सदर जागेवर नव्याने दवाखान्याचे आरक्षण टाकण्यात यावे. वरील सर्व प्रकरणी म.प्रा. व न.र.अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव तयार करुन तो शासनास सादर करण्यास मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग २८ मासुळकर कॉलनी येथील आरक्षण क्र. ७७ व ७९ स.नं. १०९/११० असून सदरचे क्षेत्र अनुक्रमे ०.६४ हेक्टर चौ.मी. व ०.४४ हेक्टर चौ.मी. आहे ते बेघरासाठी घरे यासाठी आरक्षित आहे. सदर जागा

महापालिकेच्या ताब्यात आहे. अधिनियम १९६६ ते कलम ३७ अन्वये फेरबदलचा प्रस्ताव तयार करुन तो शासनास सादर करण्यास मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ५८५ विषय क्रमांक - १८

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.उल्हास शेट्टी, मा.सुमन नेटके यांचा प्रस्ताव.

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.१४ दि.११/०८/२०१४

मौजे थेरगाव येथील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे सन १९९५ ची मंजूर विकास योजना तथापि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेत सन १९९७ रोजी समाविष्ट करणेत आलेल्या मंजूर विकास योजनेत स.नं.३६ व ३७ पै.मध्ये रस्ता दाखविणेत आलेला नाही. त्यामुळे त्या भागातील शेतकरी व जमिनमालक यांना जागेवर जाणेकरीता रस्ता उपलब्ध नाही व जाणे येणेकरीता अडचणीचे होत आहे. त्यामुळे सं.नं.३६ व ३७ पै. २४ मी. रुंद रस्तापासून खेळाचे आरक्षणालगत पुढे नाल्यापर्यंत पूर्व पश्चिम १२.० मी. रुंद रस्ता करणेत यावा. तसेच स.नं.३६ मधील नाल्यापासून स.नं.३८ मनपा उपयोग या आरक्षणापर्यंत उत्तर दक्षिण ९.० मी. रस्ता करणेत यावा. सदरचा रस्ता म.प्रा.व न.र.अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १९ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ५८६ विषय क्रमांक - १९

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/३/कावि/३४२/२०१४, दि.१६/०८/२०१४

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र. १७ दि. २०/०८/२०१४

महाराष्ट्र शासनाने दि.२ मे २०१४ रोजी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) (सुधारणा) अधिनियम २०१४ पारित केला आहे. सदर अधिनिमाद्वारे महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम १९७१ दुरुस्त्या करण्यात आलेल्या आहेत. उपरोक्त अधिनियमातील दुरुस्तीस अनुसरुन गृहनिर्माण विभागामार्फत क्रझोपुयो-१००१/प्र.क्र.१२५/१४/झोपसु-१ दि.२२ जुलै २०१४ अन्वये शासन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. सदर दुरुस्त्या व त्यानुषंगाने दि२२ जुलै २०१४ रोजी पारित झालेल्या शासन निर्णयातील ठळक बाबी पुढील प्रमाणे आहेत. १) झोपडी दि.०१/०१/२००० अथवा त्यापूर्वीपासूनची संरक्षणप्राप्त असल्याचे ठरविण्याबाबत तसेच त्यात प्रत्यक्ष राहणा-या झोपडी वासियांचा निवारा निश्चित करणे. २) सध्या अस्तित्वात असलेली झोपडी दि.०१/०१/२००० रोजी अथवा त्यापूर्वीपासूनची असणे आवश्यक असलेने त्याबाबतच्या तपासणीकरीता आणि त्या झोपडीत प्रत्यक्ष राहणा-या झोपडीवासींयाचा निवारा निश्चित करण्याच्या कागदपत्रांच्या / अभिलेखाच्या यादीत व कार्यपध्दतीत सुधारणा करणे, ३) दि.०१/०१/२००० रोजी अस्तित्वात असलेल्या झोपडीत राहणा-या संरक्षणपात्र झोपडीवासियांचे महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम १९७१ मधील कलम ३ झेड खाली पुनर्वसन व पुनःस्थाननिश्चयन संदर्भात निदेश देणे. तरी उपरोक्त दि. २ मे २०१४ रोजीचा महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) (सुधारणा) अधिनियम २०१४ व त्यानुषंगाने पारित झालेला दि.२२ जुलै २०१४ चा शासन निर्णय अवलोकन करणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर-** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २० वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - २०

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.सुमन नेटके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र. १८ दि. २०/०८/२०१४

पिंपरी येथील भाटनगर पुनर्वसन प्रकल्प महानगरपालिकेमार्फत राबविण्यात आला. त्याअंतर्गत झोपडपट्टीधारकांना १८० चौ.फुट बहुउद्येशिय खोली देण्यात आलेली आहे. प्रकल्पातील इमारती ब-याच प्रमाणात नादुरुस्त झालेल्या असून मोडकळीस आलेल्या आहेत. तसेच सदर प्रकल्पा जवळील बौध्दनगर, भाटनगर, रमाबाईनगर, भिमनगर, आंबेडकर कॉलनी, एमआयडीसी (बौध्दनगर), इ. झोपडपट्टीचे पुनर्वसन करणे गरजेचे आहे. या सर्व बाबींचा विचार करता भाटनगर पुनर्वसन प्रकल्पातील सर्व इमारती पाडून तेथे SRA (झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे व पिंपरी चिंचवड ) मार्फत नव्याने इमारती बांधणेकामी कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, सन्मा.आयुक्त साहेब, अजंठानगर याठिकाणी जेएनएनयुआरएम अंतर्गत बांधलेल्या इमारती ताब्याच्या संदर्भात मला आयुक्त साहेबांना सुचना करायची आहे की, हा विषय गावडे साहेबांच्या माध्यमातून त्याठिकाणी चर्चा करत असतो, झोपडपट्टी पुनर्वसन संदर्भात आहे. त्याठिकाणी दोन बिल्डींग बांधुन उभ्या आहेत परंतु काही कारणास्तव त्याठिकाणी पुनर्वसन करता येत नाही. गावडे साहेबांना मी वेळोवेळी पाठपुरावा केलेला आहे. पाठपुरावा करत असताना काही अडीअडचणी आहेत. माझी नम्र विनंती आहे की, झोपडपट्टी पुनर्वसन करत असताना त्याठिकाणी आपण ट्रॅन्झीट कँप लावलेला आहे. त्यांना शिफ्ट करायचे आहे पण गेली कित्येक वर्षे काही नां काही कारणास्तव त्याठिकाणी अडचणी येतात. पुनर्वसन करण्याचे धोरण खुप पुर्वी ठरलेले आहे आणि आता काही कुटूंबाच्या व्यक्तीनी कुठतरी एक, अर्धा गुंठा जागा घेतल्यामुळे याठिकाणी त्यांना त्या कायदयामुळे अडचणी येतात. गावडे साहेबांच म्हणण आहे की असा जी.आर. आल्यामुळे अशी मिळकत शहरामध्ये असेलतर त्यांना घेता येणार नाही. यावर काहीतरी पळवाट, तोडगा काढला पाहिजे. कुटूंब वाढल्यानंतर दहा-पंधरा वर्षानंतर एखादया मुलांसाठी एक, अर्धा गुंठा जागा घेतली असेलतर व त्यामुळे अडचणी येत असतीलतर त्यांनी दुस-याच्या नावावर जागा केलीतर ते ॲडजेस्ट करता आलं पाहिजे. जेणेकरुन या दोन तीन बिल्डींग शिल्लक आहेत त्याठिकाणी त्यांना पुनर्वसन केलतर उरलेल्या जागेत आपल्याला सुखसोई देता येईल. ट्रॅन्झीट कँपामुळे तुम्हांला मी सांगू इच्छितो कारण सगळयाच गोष्टी तुमच्या ऑफिसमध्ये येवून सांगन, बोलन योग्य नाही म्हणून सभागृहाच्या माध्यमातून या ठिकाणी निदर्शनास आणून देतो ट्रॅन्झीट

कँपात सगळी घुसखोरी झालेली आहे. झोपडपट्टी विरहीत शहर करण्याचे आपले जे धोरण आहे ते साध्य होत नाही. आपण बिल्डींगमध्ये शिफ्ट करणार, परत ट्रॅन्झीट कँपामध्ये कोणीतरी घुसखोरी करतं. आपल्या धोरणानुसार ट्रॅन्झीट कँपामध्ये सुखसोई देता येत नाही काही अडचणी येतात, आपले पैसे वाया जातात. माझी विनंती आहे की, त्या दोन बिल्डींगचे लवकरात लवकर पुनर्वसन करावे. जेणेकरुन थरमॅक्स चौकापासून जो रोड आहे त्यात बाधीत होणारे आहेत तेही पुनर्वसन होईल. गावडे साहेबांनी किंवा त्यांच्या अधिका-यांनी सांगावे काय अडचण आहे त्यावर तुम्ही एकत्रीत बसून चर्चा करावी व तोडगा काढावा. तेथे आता लाईट नाही, काचा फुटलेल्या आहेत अशा अनेक अडचणी आहेत. हे आपण जनतेसाठी केलेले असल्यामुळे ते देवून मोकळे झाले पाहिजे. कोणीतरी छोटी छोटी मिळकत घेतली म्हणून या छोटया छोटया गोष्टी आहेत. आपली प्रॉपर्टी आहे ती प्रॉपर्टी गोरगरीबांना दयावी. ट्रॅन्झीट कँपात माझी विनंती राहील कारण महापालिकेला काम करता येत नाही. तुमच्याकडे फंडस अव्हेलेबल नाहीत, झोपडपट्टीचे फंडस अव्हेलेबल नाहीत, टॉयलेटचा प्रॉब्लेम आहे. त्याठिकाणी दोन पैसे वाया गेलेतरी चालेल परंतु आपले धोरण आहे झोपडपट्टी विरहीत शहर हे त्यामुळे साध्य होणार आहे. आठ दिवसात हे करावे. आणि हा विषय मार्गी लावावा.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आता जो उल्हास शेट्टी यांनी विषय सांगीतलेला आहे. ट्रॅन्झीट कँप अक्षरश: भाजीमंडईच्या प्लॉटवर या कँपच्या पत्र्याची शेड मारलेली आहे. दहा वर्षे झाले तो ट्रॅन्झीट कँप बांधुन त्याठिकाणी परत परत लोक येवून राहतात. घुसखोरी होत चाललेली आहे, ते लोक तेथे राहतात आणि आम्हांला घर दया त्याशिवाय खाली करणार नाहीत, असे ते म्हणतात. ही जी भूमिका आहे हे कुठेतरी थांबले पाहिजे. ट्रॅन्झीट कँप म्हणजे तुमची इमारत होईपर्यंत ही तात्पुरती सोय केलेली आहे. त्याठिकाणी ड्रेनेजलाईन नाही. भाजीमंडईला ड्रेनेजलाईन नव्हती. हे ड्रेनेजलाईनचे जे पाणी आहे ते पाणी पुढे थरमॅक्स चौकामध्ये येते. रोज हा प्रश्न निर्माण झालेला आहे समोरच्या कमर्शिअल शॉपिंग सेंटर आणि सोसायटीमध्ये पाणी घुसते कितीवेळा याची तक्रार केली आहे. सोसायटीवाल्यांना त्याचा त्रास का ? ओपन गटाराला हे ड्रेनेजचे पाणी जोडलेले आहे. हे किती वर्षानुवर्ष चाललेल आहे. त्याच्या मधुन प्लॅस्टीक बुट, चप्पला हा कचरा सगळा येतो. आम्हांला पण असं वाटत की हे पुर्वीचे लोक आहेत, झोपडपट्टी भागातली लोक आहेत त्यांच्या विरोधात बोलायला नको म्हणून आम्ही दरवेळेला गप्प बसतो, हा विषय काढत नाही. त्या भागातील नगरसेवकांच सुध्दा म्हणण आहे की तुम्ही हा ट्रॅन्झीट कँप काढून टाका. तेथील लोकांना त्या बिल्डींगमध्ये जाऊ दयावे आणि तो ट्रॅन्झीट कँप काढा. रस्त्यावर चिकनवाले बसलेले आहेत, फ्रुटच्या गाडया आहेत त्यांना त्याठिकाणी दया. उल्हास शेट्टी त्या वॉर्डाचे नगरसेवक आहेत तो त्रास आम्हांला सुध्दा होतो. परंतु ते आमचे सुध्दा पुर्वीचे मतदार आहेत म्हणून आम्ही गप्प बसतो. तेथील सोसायटीमध्ये पाणी येते व ते पाणी सोसायटीमध्ये थांबते नाहीतर त्या

सोसायटीला काहीतरी सोय करुन दया की जेणेकरुन ते पाणी उताराने निघुन जाईल असे करावे. पाणी आले की लोक रोज आम्हांला फोन करणार आम्ही तुम्हांला फोन करणार असे चाललेले आहे, हे बंद झाले पाहिजे. माझ्या सहकारी पठाणताई यांच्या वॉर्डामध्ये सुध्दा हाच विषय आहे. नवीन बिल्डींग झालेल्या आहेत, तो ट्रॅन्झीट कँप काढून टाकावा अशी सूचना आहे व वरील विषय मंजूर करावा.

**मा.शमीम पठाण** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, किती वेळा तोच तोच विषय बोलल्यावर, आपल्या कानी, कपाळी ओरडल्यावर आपण त्याची दखल घ्याल हो, नाही म्हणजे, काय कराव म्हणजे तुम्ही दखल घ्याल. मोर्चा आणू का ? झोपडपट्टीतील महिला माझ्या बरोबर असतात त्या काय करतील हे मी सांगू शकणार नाही. पण आता आमची सहनशक्ती संपलेली आहे. आपण येतात आणि कोप-यावरुन परत जातात. तुम्ही आयुक्त म्हणून येवू नका, एकटेच या आणि माझ्या बरोबर आपण तेथे फिरुया. नाही तुम्हांला तेथे नळाव्दारे दारु मिळाली तर माझ नाव बदलून ठेवा, नाही तुम्हांला तेथे जुगाराचे अड्डे दिसले तर बघा. एकच महिना झाला भागाराम चौधरी या व्यक्तिला आपण तेथे पत्राशेड दिलेले होते. त्याला फ्लॅट मिळाला ती पत्राशेड त्यानी भाडयाने दिलेली आहे. जवळ जवळ सगळेच भाडयाने आहे, आपला कोणावरही कंट्रोल नाही, प्रशासन म्हणून शुन्य आहे. त्याठिकाणी कर्नाटक वरुन पोलीस आले आणि त्यांनी विचारले की पत्राशेड कुठे आहे. कर्नाटक मध्ये दळवीनगर प्रसिध्द झालेले आहे, आपल्या प्रशासनाच्या कृपेने. १४ वर्षाची मुलगी आणून त्याठिकाणी ठेवलेली होती, पत्राशेड भाडयाने घेवून. तिथल्या पोलीसांनी विचारत विचारत त्या माणसाला आणलं त्यालाही अटक केली. परंतु साहेब, यापेक्षा वाईट अजून काय धंदे चलायला पाहिजेत. किती गेंडयाच्या कातडया असाव्यात. किती वर्षे चालणार एक-एक प्रोजेक्ट. दळवीनगरचे तेथील पुनर्वसनाचे २००७ साली भूमिपूजन झालेले आहे. मोठया थाटात तुम्ही पुनर्वसनाच भूमिपुजन केलं. आठ वर्षे झालेले आहे दळवीनगरमध्ये बिल्डींग झालेली नाही पण वेताळनगरची सुरु झाली. वेताळनगरचा पसारा तेथे आणून टाकला आहे. बांधकामाच स्पीड किती आहे, आठ वर्षात चार बिल्डींग झालेल्या आहेत. कोण आहेत कार्यकारी, कोण आहे त्याही पेक्षा वरचे त्यांचा जरा तुम्ही लेखाजोखा घ्यावा. आपण यांना प्रमोशन देता, विभाग बदलता एखादयाची बदली होत असताना त्यानी अगोदरचा चार्ज दुस-याना देतांना अगोदरची जबाबदारी पुर्ण दयायची असते आणि घेणा-यांनी सुध्दा बघुन घ्यायची असते. याच्यावर विचार करणार का नाही. वेताळनगरला आठ वर्षे झाले तेथे फक्त चार बिल्डींगचे बांधकाम पुर्ण झालेले आहे. दोन वर्षात एक बिल्डींग, काय चालले आहे हे, त्याचा खर्च वाढलेला नाही का ? झालेल्या बिल्डींग फक्त २०. झोपडया उठवायच्या त्याठिकाणी ड्रेनेज लाईन टाकायची ती सुध्दा सहा सहा महिने होत नाही. ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी बिल्डींग वापरायची राहिलेली आहे. याला वर्ष वर्ष उशिर लागतो, बिल्डींगच नुकसान होतं, याला कोण जबाबदार आहे. साहेब, हा फक्त एकच प्रोजेक्ट आहे का ? तुम्ही

विठ्ठलनगरच बघा त्यानी पण जागेवरच बांधलय. तीथल्या तीथच ट्रान्सफर करतात. लोकांच्या नावावर झोपडी आहे पण त्याना ती सदनीका  मिळू शकत नाही. कोण करतय हे सगळ. साहेब, तुमचे अधिकारी अजीबात काम करत नाहीत. काम करतात ते क्लार्क. जागेवर सर्व्हेसाठी जाणारे आहेत तेच काम करतात. एकतर ते करतात नाहीतर मग आयुक्त करतात. असं लिहीलेल असतं, मा.आयुक्त यांच्या तोंडी आदेशानुसार पुढील कार्यवाही करत आहे. काही बघायच आहे की नाही, का असंच चाललेल आहे. तुमच्या पुढे फक्त आकडेमोड मांडली जाते. तुम्हांला वाटते काय स्पीड आहे, कशाचा फक्त आकडे लिहायचा. ३१४ लोक पत्राशेडमध्ये आले.  लहान मुलांचे ग्राऊंड आहे, माझ्या प्रभागात दुसरे ग्राऊंड नाही. तुम्हांला लहान मुलांची किव येत नाही. बसू का येथे लहान मुल आणून साहेब, घ्यानां फाईलावर,  एखादयावर कारवाई करावी म्हणजे सगळे जागेवर येतील. साहेब तुम्ही फांदया हालवत बसता, खुप बोलता साहेब तुम्ही यांना, परंतु ईथलं पुर्वीच प्रशासन इतक निगरगट्ट आहे ते तुमच्या बोलण्याला वाटाण्याच्या अक्षता लावतात. श्रीकर परदेशी साहेब होते त्यांच्या कारवाईमुळे जस धाबं दणाणलं होत तसं पुन्हा एकदा एक दोनवर कारवाई करा, सभागृह तुमचे कौतूक करेल माझ्या तेथील पत्राशेडमध्ये साहेब, तुम्ही फक्त पुढे चार पाऊल गेले असतेतर ती पत्राशेड दिसली असती की मी अनेकवेळा त्यावर बोललेले आहे. तुम्हांला जर घाम फुटत नसेलतर पुढचा मी ईलाज लवकरच करणार आहे. आमचे हात काळे झालेतरी चालतील पण मी यांचे तोंड काळे केल्याशिवाय राहणार नाही. त्याठिकाणी इतकी गुंडगीरी चालते, माझ्याकडे एक अधिकारी आलेले होते त्यांना मी सांगीतले या पत्राशेडमध्ये इतकं भयानक चाललेले आहे. मी माझ्या भांडेवालीला बोलावलं, १९७० पासून दळवीनगरची झोपडपट्टी आहे. काय परिस्थिती झोपडपट्टीची आहे हे विचारलतर ती म्हणाली तेथे संध्याकाळी आठ नंतर आम्ही दार बंद करुन घेतो, कधीही गुंड येतात झोपडीवरचे पत्रे काढतात, कोणालाही मध्ये बसले असेलतर लाथ मारुन जातात, आणि हातात काय असते हे कदाचित ते अधिकारी तुम्हांला भेटलेतर सांगतील साहेब, ते शस्त्र घेवून त्याठिकाणी फिरतात. त्या बिचा-या आमच्याकडे कामाला येतात. तीन-चार, पाच हजार देवून त्यांनी काळेवाडी, थेरगांव, सगळीकडे कुठे मिळेल तेथे भाडयाने घर घेतल आहे, तेथे राहतात आणि कामाला मात्र त्या बायाबाभडया दळवीनगरमध्ये, प्रेमलोकपार्कमध्ये त्या परिसरात येतात. साहेब, थोडी किव करा, थोडी माणूसकी दाखवा, थोडासा पाझर तुम्हांलाही फुटू दयात. आमची तेथील मुळ वस्ती उठू लागलेली आहे. भाडेकरी त्यांना ठेवू देत नाहीत, भाडेकरुना सुध्दा ते लोक हुसकावून लावतात काय काय सहन करायचं आणि किती सहन करायचं. ज्यांनी हे पत्राशेड वाटल तेव्हा १४ पत्राशेड खाली होते. ते सुध्दा गेले तरी यांच लक्ष नाही. त्यानंतर लोक भाडयान ठेवले हे आपण लक्षात घ्याव. मी तुम्ही आल्यापासून सांगते की सर्व्हे करा. सर्व्हे केला नाही,  साहेब तेथे जे लोक राहत नाहीत तेथे या लोकांनी हागणदारी केली. अजून किती घाण करायला पाहिजे. तुम्ही मला येथे शब्द दयावा

की किती दिवसात तुम्ही तेथील पत्राशेड हटवणार हे सांगावे. जे संबंधीत अधिकारी आहेत त्यांना बोलवावे आणि सांगावे की किती दिवसात हे हाटवणार आहेत. अजेंठानगरमध्ये उल्हास शेट्टींच्या वॉर्डमध्ये पत्राशेड आहे आणि माझ्या वॉर्डात विजयनगरमध्ये, चाफेकर चौक ते चिंचवड स्टेशन, रोडला झोपडपट्टी आहे. त्याठिकाणच्या पाच वर्षापुर्वी झोपडपट्टया उठविल्या आणि अजेंठानगरला नेवून ठेवलेल्या आहेत साधारणतः ७० ते ७२ झोपडया आहेत याची यादी दिलेली आहे. त्या लोकांनी त्याठिकाणी झोपडया, दुकान बांधलेली आहेत. रस्त्याने जाताना येताना हे डोळे बंद करुन गाडीतून फिरतात का ? रस्त्यावर दुकान बांधलेली दिसत नाहीत का ? काय करतात हे लोक, ज्यांच्या काळात हे झाले त्यांना जाब विचारा. त्यांना नोटीस दिली, नोटीस देवून कारवाई होते का ? फुटपाथवर पक्की दुकान बांधलेली दिसतात तरीही प्रशासन अगदी ढिम्म आहे. अजेंठानगरची पत्राशेड त्यांनी भाडयाने दिलेले आहे आणि येथे मात्र ते राजरोषपणे राहतात. प्रशासन काय करतयं हेच कळत नाही. आम्हांला आता माहिती दयावी की, माझ्या वॉर्डातील पत्राशेड कधी हलवणार आहेत. आख्या वॉर्डचा प्रश्न आहे, लोकांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. आणखीन एक उदाहरण सांगते हे पोर काय करतात पाणी भरलेले ड्रम एक हत्यार मारल की सगळ धो धो धो पाणी वाहून जात. म्हणजे राहणंच अशक्य झालेल आहे.

**मा.राजन पाटील -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता जी पठाणताईनी माहिती विचारलेली आहे त्याबाबत सांगतो. वेताळनगरमध्ये एकूण १२ इमारती आहेत त्यातील चार इमारती पुर्ण होऊन वाटप झालेल्या आहेत. चार इमारती पैकी दोन बिल्डींगचे काम पुर्ण झाले त्याचे परमीशन घेवून लवकरात लवकर वाटप करु. पत्राशेडमध्ये वेताळनगरचे लोक त्याठिकाणी जातात पत्राशेडमधील लोक परत बिल्डींगमध्ये येतात ही त्या प्रोजेक्टची अपरिअर्हता आहे. जेव्हा प्रोजेक्टची आखणी झाली त्याचवेळेला हे पत्राशेड करायचे, त्यामधील वेताळनगरचे लोक शिफ्ट करायचे, जशा बिल्डींग होतील तसे हे लोक शिफ्ट करायचे आहेत. २००७ पासून आपली जी प्रोजेक्टची आखणी केलेली आहे ती तशीच आहे.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, किती लोक गेले, परत किती आले उरले किती रिकामे पत्राशेड, अन†थोराईज लोक आहेत की नाहीत हे सगळ त्यांनी सांगू दयात. हे तीकडे जातच नाहीत, त्यांना जाणे शक्य होत नाही. येथे अलीशान ऑफीस आहे. कशाला जायच तेवढय घाणीत त्यांची अपरिअर्हता ही आहे. कुठल्याही अधिका-याना तेथं जाण शक्य हात नाही. एक लेडीज आहे वाघ मॅडम जे.ई. आहेत त्यांच मी कौतूक करेल. त्यांनी तरी डेअरींग करुन ११ पत्राशेड हालविलेले आहेत. पण त्याच्या अदिचे अधिकारी झिरो. आपण आण्णासाहेब मगर स्टेडीअम, कामगार कल्याण मंडळाकडून घेतलेले आहे. त्या मोबदल्यात कामगार कल्याण मंडळाला आपण ती जमिन दिलेली आहे, ते ग्राऊंड दिलेल आहे.

**मा.आयुक्त -** मा.महापौर मॅडम, सन्मा.सदस्य मॅडमनी ज्या काही भावना व्यक्त केलेल्या आहेत त्या त्यांनी यापुर्वी देखील ब-याचशा वेळा माझ्याकडे व्यक्त केलेली होती. त्यापुर्वी तांबे हे कार्यकारी अभियंता होते. राजन पाटील यांनी आणि तांबे या दोघानी त्यांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केलेला होता. तथापि काही प्रश्न सुटले, काही राहीलेले आहे ही वस्तुस्थिती आहे. मी सन्मा.सदस्यांना सांगू इच्छितो की, हा प्रकल्प काही ठिकाणी इन्सेन्टीव्ह होता त्याठिकाणच्या झोपडया हाटवून तेथे इमारती बांधण्याची आवश्यकता होती. आज सन्मा.सदस्यांनी जे प्रश्न उपस्थित केलेले आहेत त्यामध्ये महापालिकेचा प्रश्न आहे. तथापि काही प्रश्न हे गूंडागर्दीचे किंवा कायदा व सुव्यवस्थेचे आहेत ते पोलीसाशी संबंधीत आहेत. त्याबाबतीत सुध्दा महापालिकेनी मागेच पोलीसांची मदत घेवून योग्य त्या उपाययोजना करायला पाहिजे होत्या. मी जबाबदारीने सांगू इच्छितो की, या प्रकल्पाचा दोन दिवसात आढावा घेण्यात येईल आणि दोन दिवसात आढावा घेतल्यानंतर जर आमचे इंजिनीअरींग डिपार्टमेंट, ते कॉन्ट्रॅक्टर तो प्रकल्प पुर्ण करु शकत नसतीलतर, किंवा काही अडचणी असतीलतर तो प्रकल्प आम्ही फोरप्लस करणार आहोत. आणि फोरप्लस सोडून तो प्रकल्प जिथे पुर्ण झाला तिथेच तो बंद केला जाईल आणि त्या पत्राशेडमधुन ती जागा मोकळी केली जाईल. सगळ पत्राशेड काढून टाकण्यात येईल, त्यांच पुनर्वसन झाल, नाही झालतर त्याला महापालिका जबाबदार राहणार नाही. आम्हांला जर तो प्रकल्प करताच येत नसेलतर किती दिवस असं कामकाज करा. लोकांची पण नाराजी, यांची पण नाराजी हे काही योग्य नाही. मी या मताचा आहे की आयुक्त म्हणून याचा आढावा घेवून तो प्रकल्प जर अर्धवट असेलतर तो फोरप्लस करण्याची आमची तयारी आहे आणि त्यानंतर आपण उरलेल्या पत्राशेडच्या बाबतीत विचार करता येईल.

**मा.शमीम पठाण** - मा.महापौर साहेब, आयुक्त साहेबांची दिशाभूल अधिकारी करतात आणि आयुक्त आमची दिशाभूल करतात. त्याठिकाणी काहीही केलेले नाही, जे लोक गेलेले आहेत ते काढून टाकायला नको होते का, त्याठिकाणी लॉक सुध्दा नाहीत, बेजबाबदारपणे सगळ हे काम आहे. तुम्ही त्यांना पाठीशी घालताय का. त्यांनी काय कारवाई केली हे विचारा.

**मा.आयुक्त -** मा.महापौर मॅडम, सन्मा.सभागृहाला सांगू इच्छितो की, मी कोणालाही पाठीशी घालत नाही. तुमचा प्रश्न सोडवण्यासाठी मी शेवटचा प्रयत्न करतो, माझ्यासह आम्ही त्याठिकाणी जाऊ, त्याठिकाणी जे शक्य आहे ते सगळं केले जाईल एवढ सांगतो आणि शक्य नसेलतर मी परत २० तारखेच्या महापालिका सभेला सांगणार आहे की हे शक्य नाही हे होत नाही याच्याबद्दल काय निर्णय घ्यायचा तो घेवूयात.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आयुक्त साहेब आपण आता खुलासा केला, मला असं वाटत की तुम्ही खुलासा करताना काही चुकताय की काय हे पहिल्यांदा तपासून बघाव. समोर जबाबदार नगरसेवक बसलेले आहेत, आपण सुध्दा जबाबदार आयुक्त आहात, तुम्ही हा आठ दिवसात प्रकल्प बंद करतो म्हणतात. जेवढे झाले

तेवढे झाले त्यानंतर मी बंद करतो, असं तुम्हांला करता येत का ? एखादया सदस्यानी प्रश्न विचारल्यानंतर तुम्ही त्याच्यावर पर्याय काय आहे, कसं करायला पाहिजे, काय करायला पाहिजे, त्याच्यावर तुम्ही असं बोलू शकता का ? याच पहिल्यांदा आत्मपरिक्षण करायला पाहिजे. तुम्ही आता म्हणता हा प्रकल्प आठ दिवसात बघुन तो प्रकल्प बंद करुन टाकतो. असा कधी प्रकल्प बंद होतो का ? आताचा जो ट्रॅन्झीट कॅंपचा प्रश्न आहे की पुर्वीचे जे लोक आहेत, बरोबर आहे दोन बिल्डींगसाठीची जी जागा आहे तेथील लोक आहेत ते ट्रॅन्झीट कॅंपमध्ये येतात. ते तेवढीच आहेत का, तेथून परत ते तेवढीच गेलेत का ? हे बघण काम आहे. आता त्याच्यामध्ये जर अनधिकृत लोक राहत असतीलतर तुम्ही तो ट्रॅन्झीट कॅंप काढू शकता. परंतु जर लोकांना झोपडपट्टीधारक ते जर लोक त्या ट्रॅन्झीट कॅंपमध्ये राहत असतील आणि तुम्ही जर त्यांना इमारती देणार नसताल तर साहेब तुम्ही असं कस काय बोलू शकता

**मा.आयुक्त -** मा.महापौर मॅडम, सन्मा.सभागृह. आपल्याकडे ईडब्ल्यूएसमध्ये १३ हजार घर बांधायची होती परंतु काही कारणास्तव आपल्याला ६७२० घर बांधता आली म्हणून आपण फोरप्लस केला. फोरप्लस म्हणजे मॅडम फार जोरात बोलल्या म्हणून मी लगेच काहीतरी त्याला रिप्लाय दिला आणि तो प्रकल्प बंद करणं असा माझा उद्देश नाही. से.२२ मध्ये आपल्याकडे रेडझोन आहे. काही काही प्रश्न हे प्रशासन किंवा तुमच्या आमच्या हाताच्या बाहेरचे असे असतात त्यामुळे तो प्रकल्प किती ओढायचा, किती ताणायचा त्याला कुठेतरी बंद केले पाहिजे. त्यामुळे आपण बरेच रस्ते अशाप्रकारे फोरप्लस केलेले आहेत. आणि या प्रकल्पाच्या बाबतीत ईडब्ल्यूएसचे ६७२० ला आपण फोरप्लस केले. से.२२ आता फोरप्लस करण्याच्या मार्गावर आहोत. मला काही दुसरा मार्ग दिसत नाही कारण रेडझोन कधी संपेल हे माहित नाही. हायकोर्टाची ऑर्डर कधी निघेल हे माहित नाही. त्यामुळे तेथील बिल्डींग आणि तिथल जे काही एसक्लेशन आणि त्या कॉन्ट्रॅक्टरचा ससेमीरा आहे तो संपविण्यासाठी तो प्रकल्प आहे त्या स्थितीत बंद करण्याशिवाय पर्याय नसतो. मी अगदी हेही सांगू इच्छितो की बीएसयूपीमध्ये आपल्याकडे विठ्ठलनगर, उदयोगनगर, वेताळनगर हे प्रकल्प आहेत त्यापैकी उदयोगनगर प्रकल्प सुध्दा होण्यासारखा नाही त्याठिकाणी झोपडया आहेत, तिथं आणखीन कामच सुरु नाही आता सांगीतल्याप्रमाणे ते प्रकल्प २००६-०७-०८ असे सुरु आहेत. आणि त्यांची रेग्यूलर लाईफ तीन वर्ष होती तीन वर्षानंतर त्याला किती दिवस आपण एसक्लेशन दयायच. म्हणून आपण उदयोगनगर सुध्दा फोरप्लस करण्याच्या मार्गावर आहोत. पत्राशेड आणि हे घर आहेत ते एकमेकाशी रिलेटेड आहेत. म्हणून आता जसा आपण बाकीचा आढावा घेतला तसा या प्रकल्पाचा पुर्ण आढावा घेवून मार्ग नसेलतर फोरप्लस केल्याशिवाय पर्याय नाही. आपल्याला त्या प्रकल्पाचा अंतीम निर्णय घ्यावा लागेल.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, मला बाकी प्रकल्पाच घेणं देणं नाही, तुम्ही अजून कोटयावधी त्याच्यावर खर्च करा. मला आमच्या वॉर्ड मधले लोक इकडे तीकडे स्थलांतर करु

लागलेले आहेत तेतरी आपण थांबवावे. प्रशासनाने पत्राशेडची घाण करुन ठेवलेली आहे तेवढीच काढावी ही माझी विनंती आहे.

**मा.आयुक्त -** मा.महापौर मॅडम, मी दोन दिवसामध्ये त्याचा आढावा घेतो.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर, सन्मा.सभागृह. आयुक्त साहेब, आपण जेवढया प्रकल्पाचे नाव घेतलं आहे ते बीएसयूपीचे नसून एसआरएचे आहेत. बीएसयूपीची परवानगी देण्याचा अधिकार महापालिकेचा असतो आणि एसआरएचा अधिकार एसआरएच्या सीईओचा असतो. त्यामुळे आताच पठाणताईनी सांगीतल्याप्रमाणे पहिली ज्यांनी दिशाभूल केली असेलतर त्यांना पहिलं घरी पाठविलं पाहिजे. साहेब, तुम्ही कमीशनर आहात तुमचा अपमान करावा म्हणून नाही, परंतु लाज वाटली पाहिजे एखादया अधिका-याला की आपण आपल्या सिनीअर अधिका-याची किती दिशाभूल करतो किंवा किती खोट सांगतो, याची काहीतरी लाज राखा. सगळयाची नाव घेतली त्यात फक्त सतरा एकोणीस तो बीएसयूपीचा प्रकल्प आहे. आपण ते केलेले आहे, शासनाने केलेले नाही, केंद्रशासनाने केलेले नाही. हा सदस्य प्रस्ताव आहे माझा प्रस्तावास विरोध नाही. भाटनगरचा प्रकल्प आहे, शंभर टक्के खरं आहे सगळया बिल्डींग पाडायला आलेल्या आहेत. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी आहेत. पुनरबांधणी झाली पाहिजे. डीपीआर टाकला का विचारा त्यांना, सदस्यांनी डीपीआर पाठवायचा असतो का. सदस्यांनी पाठवायचा असतो का डीपीआर. त्यांना कळल नव्हतं का. आज संपुर्ण बिल्डींग पाडायला आलेल्या आहेत. एखादी मोठी दुर्घटना त्याठिकाणी होवू शकते आणि आता जाग आली आहे. त्यावेळच्या डीपीआर मध्ये पाठवू शकलो असतोतर हा सुध्दा पुनर्वसन प्रकल्प करु शकलो असतो. आणि राग, पठाणताईना असेल किंवा मंगलाताईना असेल, राग काही तुमचा नाहीये त्यामागे घडणा-या राजकारणाचा आहे, त्यामागे खोट जे सांगतात त्याचा आहे. कोर्टान फक्त सांगीतल वाटप करु नका. मी कोर्टाला म्हणले नाही पाडा म्हणून, की वाटप थांबवा म्हणून. मी फक्त रिक्वेष्ट केली से.२२ मध्ये लाईन करुन दया. तेवढीच माझी मागणी आहे. आणि हे शंभर टक्के खरं आहे की त्यामध्ये झालेल्या भ्रष्टाचारा संदर्भात मी हायकोर्टाकडे मागणी केलेली आहे. मिलींदनगर पुररेषेमध्ये आहे. सर्वसामान्य नागरीकांना पुररेषेत आपण परवानगी देतो का ? नाही, आणि तुमचे मात्र सगळे बेकायदेशिर काम कायदेशिर करुन घेता. सर्वसामान्य नागरीकांना कुठेतरी घर दयायचे म्हणून. आहो, आमचे तर ते मतदार आहेत. आम्ही वाट्टेल ते देवू त्यांना. तुम्ही का देता, तुमची का मेहरबानी एवढी. त्या गरीबांच्या टाळूवरचं लोणी खान्याचा जो प्रकार चाललेला आहे नां, म्हणून मी विरोधात गेलेली आहे. आताचा सदस्यांचा विषय आहे तो शंभर टक्के मंजूर करा. परंतु त्या अगोदर प्रशासनाने सांगावे की राजीव गांधी पुनरआवास योजना राहणार का ? का ती संपलेली आहे. नवीन गव्हर्मेंट आलेल आहे. नवीन योजना येणार त्यामध्ये व्यवस्थितपणे मांडा. गरीबांना घर देतात म्हणून विरोध करत नाही तर योग्य व्यक्तीला दया. उदया तुमच्या ठिकाणी दुसरे श्रीकर परदेशी जर आलेतर सगळयाच्या

डोक्यावरचे घर काढून टाकतील. चुका तूमच्या, भोगायच्या आम्ही. पत्राशेड, पत्राशेड आता साहेब तुम्ही म्हणताय लिंकरोडचे पत्राशेड आहे. त्याठिकाणी भाटनगरचेच आहेतना. त्याठिकाणी घुसखोर घुसले आणि जे बाहेर होते ते बाहेरच राहिले आहेत. शेवटपर्यंत तुम्ही त्यांना बाहेर नाही काढू शकला. जे राहीलेत ते राहू दे परंतु हेच प्रकार वारंवार घडणार असेलतर बोलायच नाही का. बोललं पाहिजे नां. तुम्ही समजा एक प्रकल्प दोन, तीन, चार, पाच, सहा मागचे पंचवार्षीक आणि आताचे हे आडीच वर्षे आम्ही बोंब मारतो का तुम्ही पोर्टफोलीयो बदलत नाहीत. इतक झेलायच कारण काय. विठ्ठलनगरचा प्रकल्प शंभर कोट मंजूर केले. रेड झोनमध्ये पुर्ण प्रकल्प उभा केलेला आहे. या गव्हर्मेंटमध्ये मी कॅटमध्ये मागणी केलेली आहे. मी कुठल्या गरीबांच्या विरोधात जाणार नाही पण १०० टक्के त्या काळात जे जे बगळे बसलेले होतेना त्यांच्या विरोधात मात्र मी नक्की जाणार आहे. वर्षे झाले साहेब तुम्ही येवून आमच्याकडे, तरी तुम्ही काही पोर्टफोलीओ बदलत नाहीत. पोर्टफोलीओ बदलाना. जे.ई. आमच्याकडे पंधरा दिवसापुर्वी आलेला असतो त्या जे.ई.ला फोन केला की तो म्हणतो ताई आता मी दुसऱ्या वॉर्डात आहे. नॉनस्टॉप आपल सेफ्लींग चालू आहे. मग याच सेफ्लींग का होत नाही. प्रकल्प पुर्ण होत असताना जे अपुर्ण राहीलेले आहेत, तुम्ही आताच रामदास तांबे यांची बदली केली. प्रत्येक गोष्टीची घाई केलेली आहे. डीपीआर पासून झालेल्या चुका आहेत. त्या कुठल्या कुठल्या चुका तुम्ही सुधारणार आहात. माझी महापौरांना विनंती आहे की नवीन शासनाची आवास योजना आलेल्या आहेत. या सगळया झोपडपट्ट्या असतील यांचे खरंच पुनर्वसन करा. या शहराच्या मध्यवस्ती ठिकाणी अजीबात योग्य दिसत नाही, किमान डागडूजी तरी करा, धन्यवाद.

**मा.सविता साळूंके** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- मोरवाडी प्र.क्र. २७ मधील इंदिरानगर झोपडपट्टीचे २५ वर्षापुर्वी पुनर्वसन झालेले आहे. तथापि तेथील घरांची अत्यंत दुरावस्था झालेली असून नागरीकांचे जिवतास धोका असलेने वरील झोपडपट्टीतील घरांचे ही पुनर्वसन करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.मंदाकिनी ठाकरे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ५८७ विषय क्रमांक - २०

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.सुमन नेटके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र. १८ दि. २०/०८/२०१४

पिंपरी येथील भाटनगर पुनर्वसन प्रकल्प महानगरपालिकेमार्फत राबविण्यात आला. त्याअंतर्गत झोपडपट्टीधारकांना १८० चौ.फुट बहुउद्येशिय खोली देण्यात आलेली आहे. प्रकल्पातील इमारती ब-याच प्रमाणात नादुरुस्त झालेल्या असून मोडकळीस आलेल्या आहेत तसेच सदर प्रकल्पा जवळील बौध्दनगर, भाटनगर, रमाबाईनगर, भिमनगर, आंबेडकर कॉलनी, एमआयडीसी (बौध्दनगर), इ. झोपडपट्टीचे पुनर्वसन करणे गरजेचे आहे. या सर्व बाबींचा विचार करता भाटनगर पुनर्वसन प्रकल्पातील सर्व इमारती पाडून तेथे SRA (झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे व पिंपरी चिंचवड) मार्फत नव्याने इमारती बांधणेकामी कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मोरवाडी प्र.क्र. २७ मधील इंदिरानगर झोपडपट्टीचे २५ वर्षापुर्वी पुनर्वसन झालेले आहे. तथापि तेथील घरांची अत्यंत दुरावस्था झालेली असून नागरीकांचे जिवतास धोका असलेने वरील झोपडपट्टीतील घरांचे ही पुनर्वसन करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २१ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ५८८ विषय क्रमांक - २१

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.प्रशासन अधिकारी यांचेकडील पत्र क्र.अप्र/११/कावि/२६१/२०१४, दि.२१/०८/२०१४
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र. २२ दि. ०९/०९/२०१४

मा.अ प्रभाग समिती ठराव क्रमांक २५ दिनांक १०/०७/२०१४ नुसार प्रभाग क्र.१५ दत्तवाडी मधील क्रांतीनगर भागात मस्जिदसमोर असणा-या आरक्षण क्र.५४७ ची जागा भूसंपादित करुन त्या ठिकाणी महापालिकेची योजना राबविणेस मान्यता देणेत येत आहे तसेच आरक्षण क्रमांक ५४७ ची जागा भूसंपादित करुन त्या ठिकाणी महापालिकेची योजना राबविणेकामी येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुमन नेटके** - मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुमन नेटके -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २२ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - २२

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.प्रशासन अधिकारी यांचेकडील पत्र क्र.अप्र/११/कावि/२६१/२०१४, दि.२१/०८/२०१४

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र. २३ दि. ०९/०९/२०१४

मा.अ प्रभाग समिती ठराव क्रमांक २८ दिनांक १०/०७/२०१४ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१९ किवळे येथील सर्व्हे नं.९२ येथे स्मशानभूमीकडे जाणा-या १२ मी.रस्त्याचे आरक्षण प्रस्तावित केले आहे. या आरक्षणामुळे येथील कायम स्वरुपी रहिवाशी असलेल्या लोकांची घरे बाधीत होणार आहेत. महापालिकेने यापूर्वी जाहिर केलेल्या प्रारुप आराखडयामध्ये हा १२ मी. रस्ता सर्व्हे नं.९१ मध्ये होता. सर्व्हे नं.९१ मध्ये कोणतेही घर नाही व नंतर पालिकेने विकास आराखडयात हा रस्ता सर्व्हे नं.९१ व ९२ च्या सिमेवरुन टाकणेत आला आहे. त्यामुळे सर्व्हे नं.९२ ची घरे व शेतक-यांवर अन्याय होत आहे. त्यामुळे हा रस्ता महानगरपालिका नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करुन पूर्वीच्या सर्व्हे नं.९१ मधील मोकळया जागेमध्ये स्थलांतरीत करणेस तसेच सर्व्हे नं.८२ किवळे १८ मी. रस्त्याचे आरक्षण आहे. त्यामुळे एका शेतक-यावर अन्याय होत आहे. त्यामुळे तो रस्ता सर्व्हे नं.८१ व ८२ मध्ये समांतर टाकणेबाबत पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.मंदाकिनी ठाकरे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा. सविता साळूंके -** मा.महापौर साहेब, सूचनेस मी अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता–

ठराव क्रमांक - ५८९ विषय क्रमांक - २२

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.प्रशासन अधिकारी यांचेकडील पत्र क्र.अप्र/११/कावि/२६१/२०१४, दि.२१/०८/२०१४

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र. २३ दि. ०९/०९/२०१४

विषय क्रमांक २२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनूकूल- ८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - २३

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेक्डील पत्र क्र.पअक/१०/कावि/८५४/२०१३ दि.१९/१०/२०१३

२) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४४० दि.१८/०१/२०१४

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.५२४ दि.०५/०७/२०१४

४) मा.महापालिका सभा ठ.क्र.५४० दि.०५/०८/२०१४

५) मा.महापालिका सभा ठ.क्र.५५४ दि.१९/०८/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये कासारवाडी येथे मनपामार्फत मैलापाणी शुद्धीकरणासाठी टप्पा क्र. १,२ व ३ असे एकुण तीन Sewage Treatment Plant आहेत. सदर प्लॅन्टमध्ये सद्यस्थिती सर्वसाधारण ७४ ते ८० एम.एल.डी. मैलापाण्यावर प्रक्रिया केली जाते. सद्यस्थितीत प्रक्रियायुक्त पाण्याचा पुर्नवापर काही प्रमाणात मनपाचे उद्यानासाठी करणेत येतो व उर्वरित पाणी नदीपात्रामध्ये सोडणेत येते. CME येथे कासारवाडी STP पासून पंपिंगद्वारे पाणी पुरविणेच्या कामाचे अंदाजपत्रक तयार केले असून सदर कामाची एकुण अंदाजपत्रकीय रक्कम २,४७,४८,२११/- इतकी येत असलेबाबत, त्यांना यापूर्वी कळविलेले आहे. त्यानंतर त्यांनी दिनांक २५/०७/२०१३ रोजीचे पत्रानुसार सदर कामासाठी आवश्यक असणारी रक्कम मनपाकडे

डिपॉझीट म्हणून जमा करणेची, तसेच या रक्कमेतून काम पूर्ण झालेनंतर देखभाल, दुरुस्तीकामी प्रति महिना आवश्यक ती रक्कम देणेची संमती दर्शविलेली आहे. तसेच सदरचे काम त्यांनी त्वरीत पूर्ण करुन देणेबाबत कळविलेले आहे. परंतु सदर कामासाठी CME यांचेकडून सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकानंतर (म्हणजे २५ जुलै २०१३ रोजी) पत्र मिळाले असून या विभागामार्फत सदर कामाचे खर्चासाठीची तरतुद या वर्षाच्या मनपाच्या अंदाजपत्रकामध्ये करणेत आलेली नाही. परंतू सदर कामासाठी आवश्यक असणारी रक्कम CME कडून मनपाकडे जमा होणार असलेने त्या रक्कमेतून सदर काम मनपामार्फत करुन घेणेस येणारे अंदाजे सुमारे र.रु.२,४८,००,०००/- चे रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.संजय काटे -** मा.महापौर साहेब, हा विषय तेरा ते चौदा महिन्या पासून सभागृहा समोर येतो. सदर विषयाला मी विरोध केला आणि प्रलबिंत ठेवलेला होता. परंतु आता मी सभागृहासमोर काही गोष्टी मांडू इच्छितो हा विषय प्रलंबीत ठेवण्या मागचे कारण काय, ऑगष्ट-१२ मध्ये सीएमईचे अधिका-यांची भेट घेतली होती. बोपखेलला जाणारा जो रस्ता आहे त्याची अवस्था वाईट होती म्हणून तो रस्ता दुरुस्त करावा आणि पीएमपीएमएल बस सुरु कराव्यात अशा संदर्भात मी त्यांना एक पत्रही दिलेल होतं. त्यांनी आठ दिवसातच ऑगष्ट-१२ मध्ये मला पत्र दिल आणि सदरचा रस्ता हा वर्षभरात आम्ही दुरुस्त करु आणि पीएमपीएमएल बस सुध्दा सुरु करु असं त्यांनी मला लेखी स्वरुपात कळविल होत. परंतु ऑगष्ट-१२ ते ऑगष्ट-१३ आला तरी काहीही झालेल नाही. मधल्या काळात मी त्यांना पंचवीस ते तीस वेळा भेटलेलो होतो काहीही झालेलं नाही. पण नंतर ऑक्टोबर-१३ मध्ये हा विषय आपल्यासमोर आला की हा सीएमईसी संबंधीत विषय होता. परंतु हा सीएमईचा विषय असल्या कारणाने याला थोड आडमुठ धोरण घेतल तरी चालेल असं म्हणलतरी हरकत होणार नाही. कारण मी माझ्या नागरीकांसाठी ती भूमिका घेतलेली होती. माझ्या प्रभागातील नागरीकांना तो त्रास होत होता म्हणून मी सीएमईला जे पाणी दयायचे ते पाणी दयायचेच नाही जोपर्यंत माझा रस्ता रिपेअर होत नाही तोपर्यंत मी हा विषय मंजूर करु देणार नाही. त्याला प्रशासनाची हरकतही होती, माझे काही सहकारी नाराज झाले, किरण मोटे असतील, प्रशासनाचे लोक असतील परंतु माझ्या प्रभागातील नागरीकांसाठी तो विषय मी अडवून ठेवलेला होता. एक सप्टेंबर रोजी मा.आयुक्त, मा.चेअरमन, महापालिकेचे काही अधिकारी आम्ही सीएमईमध्ये जावून मिटींग घेतली त्यावेळेस सीएमईच्या अधिका-यांनी आयुक्त साहेबांना विनंती केली व आयुक्त साहेबांनी मला सांगीतले की हे टेंडर फ्लोट करु दया, काहीतरी मार्ग काढू. त्याप्रमाणे खरंतर या विषयी साहेबांनी सांगीतल म्हणून मलाही पुढ जाण भाग पडलं परंतु तो विषय अडविल्यामुळे काय झाले जुलैमध्ये त्यांनी टेंडर काढले. सीएमईमधले अंतर्गतही बाकी काम काढली ८ कोटी ६० लाखाचे त्यांनी काम काढली. त्यामध्ये बोपखेलचा जाणारा

रस्ता सुध्दा त्याचही काम काढलं. त्याच २० लाखाच काम घेतलेल आहे आणि तो सदरचा रस्ता ते रिपेअरींग करुन देणार आहेत, रुंदीकरण करुन देणार आहेत. त्यामुळे आता माझी जी अडचण होती ती दुर झालेली आहे. एक महत्वाचा मुद्दा अजून राहीलेला आहे प्रत्यक्ष काम झालेले नाही. आयुक्त साहेबांनी सांगीतल्यानुसार मी आयुक्त साहेबांना निश्चित त्यामध्ये सहकार्य करणार आहे. हा विषय जर आपण वाचलातर महापालिकेला याचा काहीही खर्च येणार नाही. सीएमई पैसे भरणार आहे, सीएमईकडून पैसे येणार आहेत. आलेले पैसे भरुन घेणे आणि त्याच टेंडर काढून त्या विषयास मंजूरी देणे. मुळात पैसे पुर्वीच आलेले आहेत त्यामुळे आपण पैसे भरुनही घेतले, टेंडरही काढले. तांत्रिकदृष्टया हे खरतर चुकीचे आहे, असो. मला प्रशासनाला अडचणीत आणायचे नाही. माझ काम मार्गी लागतयं. मला कालच सीएमईने लेखी पत्र पाठविलेले आहे, तो प्रश्न मार्गी निघतो आहे त्यामुळे मी आयुक्तांचे आभार मानतो हा विषय मंजूर करावा.

**मा.रामदास बोकड -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरतर आता जो नाना काटेनी विषय घेतला याला मी देखील सामील होतो आणि सहभागी होतो. माझ्याकडे मिलीटरी ऐरीया आहे. हा विषय मंजूर झाला या विषयाला माझा विरोध नाही परंतु पुन्हा मी नगररचना विभागाकडे येतो ते आश्वासन देतात. माझ्याकडे मिलीटरीमध्ये रस्ता आडविला आहे तो १२ मी. चा रस्ता आहे त्याठिकाणी राजन पाटिल साहेबांनी बीआरटीएस चालू केलेल आहे. आता त्याठिकाणी मिलीटरीचा रस्ता अडविल्यामुळे अपघात होतात आणि रोज त्या समोरच्याला तोंड दयावं लागतय. नगररचना विभागाने पाठपुरावा केलेला नाही, याची नोंद करुन घ्यावी. चार ते सहा महिने हा विषय तहकूब होता आणि सहा महिन्यापासून हा विषय मांडला होता. आता नाना काटेंचा विषय केला, माझा विषय पुढच्या जी.बी.ला करुन दयावा अशी मी सभागृहाच्या वतीने आपल्याला विनंती करतो व हा विषय नाना काटे जसे बोलले तसा मंजूर करणेत यावा.

**मा.किरण मोटे -** मा.महापौर साहेब, सन्मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ख-या अर्थाने प्रशासनाचे आणि आयुक्त साहेबांचे मी मनापासून आभारी आहे की अशाप्रकारचे विषय सभेपुढे त्यांनी आणले. आदरणीय अजीतदादा पवार साहेबांनी ज्यावेळेस या एसटीपी प्लॅन्टचे उद्‌घाटन केलेले होते त्यावेळेला त्यांनी ईच्छा व्यक्त केली होती. सन्मा.योगेश बहल त्यावेळेला महापौर असतील. बाहेर देशामध्ये ज्या पध्दतीने सिव्हेज ट्रिटमेंट केलेल्या पाण्याचा पुनर्वापर करण्यात येतो तसे आपल्याकडे करण्यात यावे. हा विषय पर्यावरण विभागाने पुढे आणलेला आहे.

या विषयाला मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पवना नदीवरील पिंपळे सौदागर येथील डेअरी फार्म लगतचा बंधारा मनपा मार्फत तोडणेत आलेने मिलीटरी डेअरी फार्मचे नदीतून पंपींग करणेत येणारे पाणी बंद होऊन, त्यांची दैनंदिन पाण्याची गरज लक्षात घेता तसेच शुध्दीकरण केलेले सांडपाण्याचा पुर्नवापर करणे बंधनकारक असल्याने “कासारवाडी

मैलाशुध्दीकरण केंद्रामधील प्रक्रिया केलेले पाणी सदर मिलिटरी डेअरी फार्म येथे पुरविणे" या कामास येणा-या अंदाजे रुपये २.०० कोटीच्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

**मा.रामदास बोकड -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ५९० विषय क्रमांक - २३

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पअक/१०/कावि/८५४/२०१३ दि.१९/१०/२०१३

२) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४४० दि.१८/०१/२०१४

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.५२४ दि.०५/०७/२०१४

४) मा.महापालिका सभा ठ.क्र.५४० दि.०५/०८/२०१४

५) मा.महापालिका सभा ठ.क्र.५५४ दि.१९/०८/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये कासारवाडी येथे मनपामार्फत मैलापाणी शुद्धीकरणासाठी टप्पा क्र. १,२ व ३ असे एकुण तीन Sewage Treatment Plant आहेत. सदर प्लॅन्टमध्ये सद्यस्थिती सर्वसाधारण ७४ ते ८० एम.एल.डी. मैलापाण्यावर प्रक्रिया केली जाते. सद्यस्थितीत प्रक्रियायुक्त पाण्याचा पुर्नवापर काही प्रमाणात मनपाचे उद्यानासाठी करणेत येतो व उर्वरित पाणी नदीपात्रामध्ये सोडणेत येते. CME येथे कासारवाडी STP पासून पंपिंगद्वारे पाणी पुरविणेच्या कामाचे अंदाजपत्रक तयार केले असून सदर कामाची एकुण अंदाजपत्रकीय रक्कम २,४७,४८,२११/- इतकी येत असलेबाबत, त्यांना यापूर्वी कळविलेले आहे. त्यानंतर त्यांनी दिनांक २५/०७/२०१३ रोजीचे पत्रानुसार सदर कामासाठी आवश्यक असणारी रक्कम मनपाकडे डिपॉझीट म्हणून जमा करणेची, तसेच या रक्कमेतून काम पूर्ण झालेनंतर देखभाल, दुरुस्तीकामी प्रति महिना आवश्यक ती रक्कम देणेची संमती दर्शविलेली आहे. तसेच सदरचे काम त्यांनी त्वरीत पूर्ण करुन देणेबाबत कळविलेले आहे. परंतु सदर कामासाठी CME यांचेकडून सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकानंतर (म्हणजे २५ जुलै २०१३ रोजी) पत्र मिळाले असून या विभागामार्फत सदर कामाचे खर्चासाठीची तरतुद या वर्षाच्या मनपाच्या अंदाजपत्रकामध्ये करणेत आलेली नाही. परंतू सदर कामासाठी आवश्यक असणारी रक्कम CME कडून मनपाकडे जमा होणार असलेने त्या रक्कमेतून सदर काम मनपामार्फत करुन घेणेस येणारे अंदाजे सुमारे र.रु.२,४८,००,०००/- चे रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच पवना नदीवरील

पिंपळे सौदागर येथील डेअरी फार्म लगतचा बंधारा मनपा मार्फत तोडणेत आलेने मिलीटरी डेअरी फार्मचे नदीतून पंपींग करणेत येणारे पाणी बंद होऊन, त्यांची दैनंदिन पाण्याची गरज लक्षात घेता तसेच शुध्दीकरण केलेले सांडपाण्याचा पुर्नवापर करणे बंधनकारक असल्याने "कासारवाडी मैलाशुध्दीकरण केंद्रामधील प्रक्रिया केलेले पाणी सदर मिलिटरी डेअरी फार्म येथे पुरविणे" या कामास येणा-या अंदाजे रुपये २.०० कोटीच्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - २४

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- **१)** मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.प्रशासन/८/कावि/७०९/२०१४ दि. ६/०९/२०१४

श्री.बळवंत तुकाराम बनकर पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेमधून गट अ दर्जाच्या कार्यकारी अभियंता पदावरुन दिनांक ३१/१०/२०१२ रोजी स्वेच्छानिवृत्त झालेले आहेत. पोलिस उप-आयुक्त/पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांनी दिनांक २१/०४/२०१४ रोजी सादर केलेल्या अहवालान्वये श्री.बनकर यांनी स्वत:चे, पत्नीचे व मुलांचे नावे एकुण र.रु २,०६,९४,६६४/- किंमतीची मालमत्ता असून पैकी सन २००६-०७ या आर्थीक वर्षात -४.८९%, सन २००७-०८ या आर्थीक वर्षात -१.५०%, सन २००८-०९ या आर्थीक वर्षात -०.०८%, सन २०१०-११ या आर्थीक वर्षात -४.८५%, सन २०११-१२ या आर्थीक वर्षात -२.७२% अपसंपदा संपादित केल्याचे निष्पन्न झाले असल्याबाबत कळविले आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील कलम १९ नुसार प्रत्येक शासकीय कर्मचा-यास स्वत:च्या नावाने किंवा कोणत्याही कुटूंबियाच्या नावाने कोणतीही स्थावर मालमत्ता भाडे पट्ट्याव्दारे, गहाणाव्दारे, खरेदीव्दारे, विक्रीव्दारे भेट म्हणून किंवा अन्य मार्गाने संपादित करता येत नाही किंवा तिची विल्हेवाट करता येत नाही. त्यासाठी त्याला विहित प्राधिकरणाला लेखी स्वरुपात अगोदर कळवावे लागते इतकेच नव्हे तर या पैकी कोणताही व्यवहार कार्यालयीन व्यवहार करणा-या व्यक्तीबरोबर केला असेल किंवा नेहमीच्या अथवा प्रसिध्द व्यापा-याच्या मार्फत केलेला नसेल तर मात्र विहित प्राधिकरणाची पूर्व मंजूरी देखिल मिळविणे बंधनकारक आहे.

शासकीय कर्मचा-याशी कार्यालयीन व्यवहार करणा-या व्यक्तीबरोबर नसलेला तसेच नेहमीच्या किंवा प्रसिध्द व्यापा-यामार्फत करावयाचा कोणताही व्यवहार वर्ग-एक किंवा वर्ग-दोनचे पद धारण करणा-या शासकीय कर्मचा-याच्या बाबतीत र.रु २०,०००/- हून जास्त किंमतीचा असेल तर विहित प्राधिकरणाला त्याने कळवायचे असते, परंतु त्याहून अन्यप्रकारचा कोणताही व्यवहार करण्यापूर्वी विहित प्राधिकरणाची पुर्व मंजूरी मिळविणे आवश्यक आहे. परंतु श्री.बनकर यांनी संपादित केलेल्या मालमत्तेची माहिती सादर केलेली नाही अथवा पूर्व परवानगीही घेतलेली नसल्याने श्री.बनकर यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील कलम १९ चा भंग केल्याने विभागीय चौकशी करण्याबाबत पोलिस उप-आयुक्त/पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांनी कळविलेले आहे.

तरी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील २७ (२) (ब) नुसार कर्मचारी सेवानिवृत्त होण्यापुर्वी विभागीय कार्यवाही चालू झाली नसेल तर शासनाच्या मंजूरीशिवाय ती चालू केली जाणार नाही. अशी तरतुद आहे. त्यामुळे महापालिका अधिका-यांच्या बाबतीत सेवानिवृत्तीनंतर विभागीय कार्यवाही करण्यासाठी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. श्री.बळवंत तुकाराम बनकर, कार्यकारी अभियंता (निवृत्त) यांच्या विरोधात महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम २७ मधील तरतुदींच्या प्रयोजनार्थ महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील नियम ८ मध्ये विनिर्दिष्ठीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार, प्रकरणात दोषारोपपत्र दाखल करणे, चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नियुक्ती करणेबाबत व एकुण प्रकरणी विभागीय कार्यवाही प्रस्तावित करण्यास आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्याबाबत मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा. संजय काटे -** मा.महापौर साहेब, सूचनेस मी अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ५९१ विषय क्रमांक - २४

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- **१)** मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.प्रशासन/८/कावि/७०९/२०१४ दि. ६/०९/२०१४

विषय क्रमांक २४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २५ मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ५९२ विषय क्रमांक - २५

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.नगरसचिव

**मा. विधी समिती**

अ) दिनांक २१/२/२०१४ व २६/२/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक ७/३/२०१४, २१/३/२०१४, ४/४/२०१४, २१/४/२०१४, २/५/२०१४, २३/५/२०१४, ६/६/२०१४ व १६/८/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) दिनांक ०४/०४/२०१४, २१/०४/२०१४, ०२/०५/२०१४, २३/०५/२०१४, ०६/०६/२०१४ व १६/०८/२०१४ रोजी झालेल्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ख) दिनांक १९/०४/२०१४, २१/०४/२०१४, ०२/०५/२०१४, २३/०५/२०१४, ०६/०६/२०१४ व १६/०८/२०१४ रोजी झालेल्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ग) दिनांक १६/०५/२०१४, २३/०५/२०१४, ०६/०६/२०१४ व १६/०८/२०१४ रोजी झालेल्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

घ) दिनांक २/८/२०१४ रोजी झालेल्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

च) दिनांक १६/०८/२०१४ रोजी झालेल्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

छ) दिनांक २०/०८/२०१४ रोजी झालेल्या विशेष सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.प्रभाकर वाघेरे** - मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा. उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २६ मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ५९३ विषय क्रमांक - २६

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.नगरसचिव

**<u>मा.महिला व बालकल्याण समिती</u>**

अ) दि. २३/४/२०१४, १५/५/२०१४ व २८/५/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे

ब) दि. २/८/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) दि. १३/८/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ख) दि. २७/८/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.प्रभाकर वाघेरे** - मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २७ मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ५९४ विषय क्रमांक - २७

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.नगरसचिव

**<u>मा.शहर सुधारणा समिती</u>**

अ) दि. २/४/२०१४, १६/४/२०१४, ७/५/२०१४, २२/५/२०१४, ४/६/२०१४ व ५/६/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.२/८/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) दि.६/८/२०१४ व ११/८/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.प्रभाकर वाघेरे** - मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २८ मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ५९५ विषय क्रमांक - २८

दिनांक - १०/११/२०१४ विभाग- मा.नगरसचिव

**<u>क्रिडा समिती</u>**

अ) दि. २१/५/२०१४, ४/६/२०१४ व ६/८/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि. ६/८/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.प्रभाकर वाघेरे** - मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.महापौर** - सर्वांचे आभार मानून आजची सभा संपली असे जाहीर करणेत येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/९/कावि/३/१४
दिनांक - ५ / १ /२०१४

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.